म. ग्रं. सं. ठाणें
विषय अध्यात्म
सं. नं. २८५
१८८९

॥ परमामृत

ब्रह्म परमेश्वरायनमः ॥


॥ प्रसन्नोभव. * वरदोभव. ॥

॥ श्री ॥

# ॥ मुकुंदरायकृत परमामृत ॥

॥ हें ॥

भवसागरांतून पार तरून नेणारें असें एक तारू आहे.



॥ श्री ॥

## ॥ परब्रह्म परमेश्वरास ॥

॥ प्रार्थना ॥

॥ मी अपराधी खरा, परंतु, तारि दया सागरारे ॥ १ ॥
॥ बुडतों मी, भवसागरीं, दयाळा तारीरे महाराजा ॥ २ ॥

*

सूचना.

हें पुस्तक सोंवळ्यांत वाचतां यावें ह्मणून रेशमा... ...he temple ...olapur. ...श्री गौरी-

( १ ) ॥ जागे व्हा, जागे [illegible]. अँः करूं नका.॥

---

॥ जन्मास आल्याचे सार्थक करा. ॥

---

॥ श्लोक ॥

॥ अनित्यानि शरीराणि—वैभवं नैवशाश्वतं ॥
॥ नित्यसान्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥

॥ भावार्थ ॥

ज्ञानी मानवदेह अतिदुर्लभ व त्याचे देहायुष्य अगदीं क्षणभंगुर आहे. वैभव तर निःसंशय अशाश्वत आहे.

ह्मणून

परमार्थ साधा, प्रपंचांतच केवळ गर्क होऊं नका.
मरतांना समःगमे कांहीं येत नाहीं.

---

स्वकुटुंब पोषणार्थ, पातकाचरणें केलीं तरी त्याचे विभागी कोणीही होत नाहींत.

---

व्यवहारदृष्टी सर्वांना आहे. वेदांतदृष्टी प्रायः नाहींच.

हें

भव्य पुस्तक एकवार मन लावून सायंत वाचा.

---

ह्मणजे

मनाची थोडीशी गोडी कळेल.

# PURAMAMRUT

OR

# DEVINE PHILOSOPHY

AN OLD WORK

BY

## MUKUND RAYA

THE

GREAT HOLY SAINT OF

JOGAI AMBA

IS IMPROVED & PUBLISHED

BY

GUNESH BABAJI MATE

A PLEADER, SHOLAPUR.

FIRST EDITION.

Price 4 Annas.

PRINTED AT THE "ARYA VIJAYA" PRESS.
POONA:

*THE RIGHT OF THIS IMPROVED WORK RESERVED*
BY
**MR. G. B. MATE UNDER ACT XXV of 1867.**

The sale proceeds of this work will be devoted to the temple purposes only at the Mateshwar Garden at Sholapur.

॥ श्लोक ॥

॥ धनानिभूमौ, पशवश्चगोष्ठे, दारागृहद्वार, जनस्मशाने ॥
॥ देहश्चितायां, परलोकमार्गे, कर्मानुगोगच्छति, जीव एकः ॥

अँः करूं नका

ह्यांत काय आहे ? त्यांत काय आहे ? हें इम्पासिबल् ! ! तें नान्सन्स् ! ! हें अबसर्ड ! ! तें रेडिक्यूलस. असले परद्वीपांतील उसने शब्द वृथा उपयोगांत आणूं नका. तशानें अभेद सिद्धांताचा यत्किंचितही भेद होणार नाहीं.

---

सर्व कामांत ज्ञान घमेंड कदाचित चालेल परंतु मृत्युच्या कामांत तें ज्ञान थिजून जातें. धिक्काररूपी मदांधपणा टिकत नाहीं.

---

मरताना, धनस्थानीं धन, भूमी घरें जेथील तेथेंच राहातात पशू, गोठ्यांत व प्रिय पत्नी गृहद्वारा पावेतो आणि मित्र स्मशाना-पर्यंत व देह चितेपर्यंत असतो. एकटा जीव कर्मासहित जातो. जगांत आपले ह्मणून कांहीं सुद्धां नाहीं. मी व माझें हें वृथा आहे.

---

प्रपंच वृथा सुखदर्शी परंतु अत्यंत दुःखरूपीच आहे. यद्यपि त्यांतच राहणें भाग असतें तरी आसक्त असूं नये.

---

माया हीच प्रत्यक्ष निशा असून त्यांतही रात्र निशा आहे. तशांत निद्राही मृतवत् असून अंधःकाररूपी निशा आहे. अशा एकांत एक निशा असतांना आणखी निशा कां इच्छावी. मरणरूपी महानिद्रा अखेरीस घ्यावयाचीच आहे. प्रस्तुत सावध व्हा.

---

जागे व नीट सावध होऊन अंतःकरण प्रकाशित करा आणि परमेश्वराकडे लक्ष लावा.

---

॥ श्री ॥

# मुकुंदरायकृत परमामृत.

वेदांत ज्ञान थोडक्यांत व सुलभ रीतीनें उत्तम कळेल असा
हा उत्कृष्ठ ग्रंथ आहे.

* * *

॥ °ओवी ॥

॥ °ग्रंथ असे हा, परमामृत ॥ °जाणा हाची, मुकुंदरायकृत ॥
॥ °वाचावया, केवळ प्राकृत ॥ °जगदोद्धारा, केला असे ॥

हा जुनाट ग्रंथ

व्यवस्थित रीतीनें, ठिकठाक जमवून, जुनाट शब्दार्थीं नवे शब्द योजून, जुन्या टिकार्थीं नव्या,
अशा ओंव्या, एकत्र करून, विषय सरणी नीट राखून, समस्या पूर्ण करून
भाविक लोकांच्या पारमार्थिक हितासाठीं

## गणेश बाबाजी माटे वकील, सोलापूर

ह्या

एका नामधारी मानव देहानें तयार करून

पुणें येथील "आर्यविजय" छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति पहिली, किंमत ८४ आणे.

शालिवाहन शके १८११, इसवी सन १८८९.

* * *

ह्या सुधारलेल्या ग्रंथ स्वामित्वाचे सर्व हक्क, गणेश बाबाजी माटे वकील यांनीं सन १८६७ च्या ॱवने-
२९ व्या आक्टाप्रमाणें आपणाकडे ठेविले आहेत.

ह्या ग्रंथाचे निश्शेष उत्पादित द्रव्य सोलापूर येथील माटेश्वर नांवाच्या बगीच्यांतील श्री
शंकराच्या देवालयार्थ शिवार्पण केलें आहे.

 ॥ जागे व्हा. जागे व्हा. अँः करूं नका ॥

प्रपंचास वेळ व धन पुरत नाहीं. आणि परमार्थास वेळ व धन उरत नाहीं. असेंच मायेचे भ्रमपटल लोकांच्या दृष्टीवर आहे.

॥ यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवती तादृशी ॥
॥ जसा भाव तसा देव ॥ जसा भाव तसा माल ॥ असेल तसें आरशांत दिसेल.

॥ मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः ॥
बंध मोक्षास ज्याचें मन त्यालाच कारणीभूत होते. मन शुद्ध ठेवा.

॥ जडास्तपोभिः शमयंति देहं, बुधामनः सर्व विकारहेतुं ॥
॥ श्वामुक्तमस्त्रं दशतीह कोपात्, मोक्तारमुद्दीश्य हि नास्ति सिंहः ॥

॥ भावार्थ. ॥

मूढजन हे, उग्र तपानें इंद्रियें वृथा क्षीण करतात. आणि ज्ञानी हे इंद्रियांचा मुख्य स्वामी जें मन त्याला क्षीण करून परमार्थ साधतात. सिंह हा, शरसंधान कर्त्याचा प्राण घेतो आणि कुत्रें हें मूर्खपणानें, भोंसकलेल्या शरास डसत बसतें. तद्वत् हा भेद आहे.

॥ निरपेक्षंमुनिंशांतं, निर्वैरं, समदर्शिनं ॥ अनुव्रजाम्यहं तस्य, पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥

॥ भावार्थ ॥

निरिच्छ, शांत, निर्वैर, समदर्शी, अशा साधुंचे चरणरज देव मस्तकीं घेतात. असे साधू ख्याती, प्रतिष्ठा, व पूजा इच्छित नाहींत.

नुसत्या सद्वर्तनानें जगांत मान मिळतो. मग साधूचे महत्व काय वर्णावें.

॥ ओंवी ॥

॥ करूनि संताचा, अनादर ॥ जो माझी पूजा, करी पामर ॥
॥ पूजा नव्हे तो, लत्ता प्रहार ॥ त्यानें मजला, समर्पिला ॥

असें भगवान श्री कृष्णाचें वाक्य भक्तिविजयांत निर्दिष्ट आहे. असा संताचा महिमा आहे.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | ओंव्या. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ० | प्रारंभी सन्मान पत्रावर ओंवी ... ... ... ... | १ | १ |
| १ | प्रस्तावना ... ... ... ... ... ... | ० | ९ |
| २ | संक्षिप्त इतिहास... ... ... ... ... ... | ० | १३ |
| ३ | श्री सद्‌गुरु मकुंदराय यांचे स्तवन व प्रार्थना ... ... ... | ५ | १६ |
| ४ | ब्रह्मवृक्षाची वंशावळ. ... ... ... ... ... | ० | १७ |
| ५ | वृत्तीच्या पात्रतेसाठीं, सिद्धांत वाक्यें व ओंव्या ... ... ... | १३ | २७ |
| ६ | कठिण, जुनाट व अप्रसिद्ध शब्दार्थांचा तांत्रिक कोश ... ... | ० | २९ |
| | पुढें ग्रंथांतील विषय. | १९ | |
| १ | मंगलाचरण व गुरुस्तवन ... ... ... ... ... | २५ | ३१ |
| २ | अन्य पाखांडमतखंडण ... ... ... ... ... | २० | ३३ |
| ३ | महावाक्य विवरण ... ... ... ... ... ... | २५ | ३५ |
| ४ | स्थूलदेहविवरण ... ... ... ... ... ... | ३५ | ३७ |
| ५ | सूक्ष्म (लिंग) देहविवरण ... ... ... ... ... | ४५ | ४० |
| ६ | कारणदेहविवरण ... ... ... ... ... ... | २० | ४५ |
| ७ | महाकारणदेहविवरण ... ... ... ... ... | २० | ४७ |
| ८ | शून्यविवरण ... ... ... ... ... ... | २० | ४९ |
| ९ | दृश्यभासखंडण (माया) ... ... ... ... ... | ३५ | ५१ |
| १० | अज्ञाननिरसन ... ... ... ... ... ... | ४० | ५४ |
| ११ | अभ्यास निदिध्यास निरूपण ... ... ... ... | २५ | ५७ |
| १२ | स्वानुभव सौख्य वर्णन ... ... ... ... ... | २० | ५९ |
| १३ | मुक्तरहस्य निरूपण... ... ... ... ... ... | ३० | ६१ |
| १४ | साक्षात्कार निरूपण... ... ... ... ... ... | ३५ | ६४ |
| १५ | परब्रह्म परमेश्वराची वेदांतपर आरती (नवीन) ... ... | २२ | ६७ |
| जुन्या ओंव्या ३२२ समस्या पूर्णता ९३<br>शिष्यानें केलेल्या ओंव्या नव्या ११४ | मिळून एकंदर ओंव्या | ४३६ | |


**सूचना**—मळपृष्ठ व सन्मानपत्रें दोन व सिद्धांतपर श्लोक, वाक्यें, आणि ओंव्या व प्रस्तावनेसुद्धां सहा प्रकरणें व आरती आणि अनुक्रमणिका इतके नवीन आहे.

## ॥ वेदांत ग्रंथावलोकन करा ॥

सर्व विद्यांत ब्रह्म विद्या श्रेष्ठ आहे. तिचा आश्रय करा.

---

इतर सर्व विद्या प्रापंचिक आहेत. त्या प्रपंचार्थी व पोटार्थी शिका.

---

प्रापंचिक विद्या देहसंरक्षणार्थी व ब्रह्मविद्या देहसार्थकतेसाठीं आहे ह्मणून दोन्ही शिकून प्रपंच व परमार्थ उत्तम साधा.

---

सज्ञान सप्रेम भक्ति व निष्काम उपासना व सेवार्चनेकडून पुण्य संपादन करून भोगेच्छा तृप्त करून घ्या व मुक्ती हवी असली तर तेंच पुण्यफल ब्रह्मार्पण करा ह्मणजे पुरे.

---

ब्रह्मानंदाचा अनुभव आल्यावर प्रपंचानंद तुच्छ वाटेल.

---

सौख्य भोगतृत्व ज्ञानाधीन आहे. अज्ञान्यास सौख्य नसतें.

---

ब्रह्मज्ञाना परतें कोणचेच श्रेष्ठ ज्ञान नाहीं ह्मणूनच अत्यंत सौख्य आहे. पोरांस खेळण्याचे, तरुणांस संभोगाचे, मध्यमास प्रपंचाचे व वृद्धास ईश्वरी लाभाचे असे वयोधर्मानुसार सुख वाटत असते.

---

तरुण असून ज्ञानानें जो श्रेष्ठ असतो तो वृद्धाहूनही वृद्ध व श्रेष्ठ होतो
आणि
वृद्ध असून जो अज्ञानी असतो तो पोराहूनही पोर असा कनिष्ठ होतो.

---

कोणचीही गोष्ठ सद्सद्विचार करणाराला सत्य मिथ्या कळते.

---

ह्या देहानें "ब्रह्मविद्या प्रबोधरत्न" नांवाचा एक ग्रंथ छापला आहे. त्याच्या वाचनानें बहुतेक वेदांत विचार चांगले कळतील. तो निव्वळ मराठींत आहे हवा तर तो ग्रंथ वाचा. हवा तर मागवून न्यावा.

---

[library stamp]

# प्रस्तावना

१ अध्यात्म किंवा ब्रह्मज्ञानाचा वेदांत विषय फारच खोल व अतिशय गहन आणि मोठ्या चातुर्याचा असाच गूढ आहे. नुसता तो अल्हादकारक आहे इतकेंच केवळ नाहीं तर तो अंतीं अत्यंत महत्फलदायकही तसाच महत्वाचा आहे व ही गोष्ट सानुभव असून त्याविषयीं यत्किंचित् सुद्धां संशय घेण्यास जागा नाहीं.

२ श्री मुकुंदराय ह्मणून पूर्वी एक मोठे विख्यात साधू होऊन गेले. त्यांनीं ब्रह्मतत्वाचें विवेचन दर्शवून साधनादि मार्ग सोपे व साधे असें फारच सुलभ व उत्तम रीतीनें अनुभवसिद्ध व मार्मिक असें निवेदन केले. ते ज्या ग्रंथांत निवेदन केले ह्मणून प्रसिद्धी आहे तोच हा परमामृत नांवाचा ग्रंथ आहे. ग्रंथ लहान परंतु ज्ञानप्राप्ति अत्युत्तम आहे.

३ ह्या उत्तम ग्रंथाची आतां खरी प्रत ह्मणून कशीती प्रायः कोणाजवळ व कोठेंही फार करून राहिली नाहीं. व कोठें तरी जी प्रत आढळते ती इ. स. १८७७ सालीं एका नारायण शेटी सोनारानें जी प्रत छापली तीच आढळते व तीही क्वचितूच दृष्टीस पडते. जरी ह्या छापील प्रतीनें लोकांचा बराच उपयोग झाला तरी व्हावातसा झाला नाहीं.

४ नारायण शेटीच्या छापील प्रतीवर दोषारोप करावा असा मुळींच हेतु नाहीं तथापि सत्य अभिप्राय कळविणें हें दोषार्ह होणार नाहीं.

( १ ) त्याला शुद्ध प्रत मिळाली नाहीं. छापील प्रतींत अशुद्धें फारच आहेत. व तीं नीट तपासलीं नाहीं. ओंवीच्या छंदानुरोधानें दीर्घ ऱ्हस्व असणें यांत विशेष अर्थ नाहीं. तरी आवांतर हयगय फार दिसते.

( २ ) वेदांतपर ग्रंथ छापण्यास ज्ञानी, अनुभवी, आणि अधिकारी असाच मनुष्य लागतो. परंतु तशाची योजना झाली होती असें दिसून येत नाहीं. लेखकानें लिहिले व छापणारानें कागद काढले. असें झालें.

( ३ ) ओंवीचे तीनच चरण कित्येक ठिकाणीं आढळतात. चवथा चरण नसल्यानें प्रतिपाद्य विषयच अपुर्ता राहिला असें घडलें.

( ४ ) नवव्या प्रकरणास दाहावें व दाहाव्यास अकरावें आणि अकराव्यास नववें प्रकरण केलें तेणेंकरून ग्रंथ विषयानुक्रम बिघडला.

( ५ ) फार तर काय पण शेवटली समाप्ति देखील उलटी छापली गेली आहे. हें हयगयीचें उघड प्रमाण आहे. असें गढूळ काम दिसत आहे.

( ६ ) किरकोळ अनेक चुका कळविण्यांत वृथा शीण मात्र आहे.

( ७ ) केरकचरा पडल्यानें केवळ साखरेची गोडी कमी होत नाहीं. तद्वत् असल्या ग्रंथानें ग्रंथमाधूर्य नष्ट झालें नाहीं. तरी तो स्वच्छ नाहीं.

( ८ ) अबोध स्थलीं वाचकच अज्ञानत्व घेतात. व मुकुंदरायांचा मानच ठेवतात. लेखकाच्या हस्तदोषानें ग्रंथकार दूषित ठरत नाहीं.

( ९ ) रायजीनीं तर दुर्बोध कोठेंच ठेवलें नाहीं. निष्कपटानें स्पष्ट मार्ग दर्शवून जगावर उपकारच केले आहेत. ह्मणून लोक त्यांचे आभारच मानतात. व मानणें हेंच योग्य आहे.

(१०) ह्या सर्व गोष्टी मनांत आणून, चांगल्या प्रतीच्या शोधास लागलों इतकें ह्या कलमाच्या अखेरीस कळवून हें कलम पुरें करतों.

५ श्रीक्षेत्र पंढरपूर हें साधुसंतांचें माहेरघर व ब्रह्मानंद विलासाचें वसतिस्थान आहे; त्यापेक्षां ह्या ग्रंथाची प्रत तेथें मिळेल ह्मणून शोधास लागलों. कालगतीनें एक फाटकीतुटकी व कसरीनें खाल्लेली अशी जीर्ण व जुनाट चालीच्या हस्तलिखित लिपीची पण एक प्रत मिळाली. तरी ती अशुद्ध नव्हती. त्या व सोनारशेटीच्या छापील प्रतींत पुष्कळ अंतर दिसून आलें तें वरच्या कलमांत दर्शविणें भाग झालें. त्याबद्दल नारायण शेटी निरभिमानानें क्षमा करतील.

६ जीर्ण प्रतींतील विषयानुक्रम व मुद्देसूद रचना पाहून ग्रंथकर्त्या मुकुंदरायाची धन्यताच वाटली आणि परमामृत हें नांव ह्या ग्रंथास अत्यंत साजरें आहे, अशीच खातरी झाली. अशा परमामृताचें सेवन अपस्वार्थाभिलाषानें केवळ ह्या एकल्याच देहानें करावे हें बरें न वाटून तो अत्युत्तम लाभ ह्या देहाचा परममित्र एक देहधारी पुण्यांत आहे ज्याला रा. रा. वामनराव केशव भट असें ह्मणतात त्या प्रसिद्ध व सदाचार संपन्न अशा सत्पात्र गृहस्थास प्रथम द्यावा. अनंतर छापून सर्वांस द्यावा व ह्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं ह्मणून ही स्वहस्तलिखित प्रत त्या परममित्रास अर्पण केली आहे. ही त्यांच्या ग्रंथसंग्रहांत चिरकाल

राहो व छापील प्रती अन्यजन वाचोत व रक्षण करोत व परमामृत सेवनानें अत्युत्तम लाभ साधून सर्व धन्य होवोत अशी परब्रह्मपरमेश्वरास अनन्य भावानें प्रार्थना आहे.

७ अशा अत्युत्तम ग्रंथाची ह्या क्षुद्र अज्ञानी पामरानें सुधारणा ती काय केली ? असा सहजी प्रश्न उद्भवतो त्या अर्थी त्याचें स्पष्टीकरण करणें भाग आहे. वस्तुत: सुधारणा ह्मणण्यासारखी ह्या देहानें तर कांहींच केली नाहीं. मूळ ग्रंथास अंशतः ठाकठीक अलंकृत केलें आहे. एवढेंच कायतें केलें व तेंही पुढें स्पष्ट कळवतों.

( १ ) उंद्रानें शालीस भोकें पाडलीं तेथें बोजड धाग्यानें तुणलें तद्वत् ग्रंथ फाटलेल्या ठिकाणीं अन्वय संदर्पानुसार समस्या पूर्ण केली. तसेंच शब्द फाटून गेल्या ठिकाणीं नव्या शब्दाची योजना केली.

( २ ) जुनाट शब्दार्थी सांप्रतचे प्रचारांतील शब्द योजून टीका टाळली. आणि गूढार्थी शब्द काढणें योग्य नसल्यामुळें त्यांचा कोश दिला.

( ३ ) विषयाच्या स्पष्टतेसाठीं, ह्या देहानें, टीकार्थी, यथामति नव्या नव्या ओंव्या करून जेथील तेथें घालून विस्तृत टीका करणें टाळलें आणि नव्या ओंवीमागें व समस्या पुरी केलीं त्या तुकड्या मागें ° असें पूज्य देऊन खूण दर्शविली आहे त्यांतील हेत्वर्थ असा कीं, जर ओंवी अयोग्य ठरली तर कर्त्याचें ज्ञान अवळ्या एवढें पूज्य आहे आणि योग्य ठरली तर ती पूज्यच आहे. पूज्य ज्ञानास पूज्यत्व देणें हें गुरुकृपेवर आहे ज्यांच्या ग्रंथ प्रसारार्थ हेतु धारण केला आहे ते व परमेश्वर पाठबळ ठेवतील.

( ४ ) अशा नव्या ओंव्या करून मूळच्या ग्रंथांत घुसडणें हा उघड प्रमाद दिसतो तथापि स्पष्टार्थासाठीं तसें केल्यावांचून भाग नाहीं. असें वाटून चित्तास फार तळमळ होई आणि चिंताग्रस्ततेनें रायजीकडे लक्ष लागे व कसें करावें हे विचार घोळत. अशा स्थितींत तंद्रा लागावी व एकाग्रतेची अवस्था प्राप्त व्हावी आणि त्यांत स्वप्नवत् रायजी दिसावे व कधीं त्यांनीं सांगितल्यासारखें भासावें व कधीं तशा दर्शनाबरोबर ओंवींचें समर्पक वेदांतपर कवित्व सुचावें अर्थात् अशी कवित्व स्फुर्ती होणें हीच त्यांच्या कृपेची व आज्ञेची खूण समजून केवळ सत्यभावनेनें त्या ओंव्या घातल्या आहेत वस्तुतः हा देह कवी नाहीं व तशी

शक्तीही त्याच्यांत नाहीं. असें असतां हें जें घडलें तें चमत्कारिक घडलें. या विषयीं कोणी हसोत किंवा वेडे ह्मणोत परंतु सद्भावनेनें शिष्याच्या देहांत गुरू कसा उतरतो याचा मात्र अनुभव आला व त्या प्रमाणास ओंव्या प्रत्यक्ष आहेत. वाचक हो, हें वेदांतज्ञान वक्तृत्वासाठीं नाहीं तें सद्भावनेनें अनुभवण्यासाठीं आहे व साक्षात्काराचा लाभ सत्भावनाधीन आहे. ह्या ग्रंथाची पारायणें केलीं तर ओंव्या सार्थ आठवतील व ज्ञान प्रदीप्त राहील, व तेंच उपयोगीं पडेल.

( ५ ) प्रत्येक विषयारंभीं मथळा नवीन घातला व गीतादि आधार दर्शविले.

( ६ ) ओवींत छंदोभंग न होण्यासाठीं कामे , अशा खुणा नवीन घातल्या.

( ७ ) ग्रंथहृद्गतार्थ कळण्यासाठीं ब्रह्मवृक्षाची वंशावळ नवीन घातली.

( ८ ) वृत्तींच्या पात्रतेसाठीं सिद्धांत वाक्यें व नवीन ओंव्या घातल्या.

( ९ ) चवदा (चव देणारीं) प्रकरणें गुरूंचीं व पंधरावें प्रकरण आरतीचें ह्या शिष्यानें नवीन घातलें. आरति द्वारें गुरूंनीं सेवा घेतली.

( १० ) असल्या टापटिपीच्या नुसत्या व्यवस्थेस गुरूची अमान्यता संभवत नाहीं. ह्मणून दोषापासून हा शिष्य मुक्त आहे.

८ गुरू ते गुरूच आहेत शिष्य मात्र लघु आहे ह्मणून मुकुंदरायाच्या स्तवनगौरवार्थ पांच ओंव्या नवीन करून क्षमा भाकली आहे.

९ देवालयाचा जीर्णोद्धार आणि गुरू ग्रंथाचें पुनरुज्जीवन करणें सारखेंच आहे. असें जाणून शिष्यधर्म आचरण केला आहे.

१० ब्रह्मानंदाच्या लाभाची सर्वांस अपेक्षा आहे; परंतु मार्ग उमगत नाहीं. तो ह्या अल्प ग्रंथानें कळेल व साधनें आणि युक्ती मिळतील.

११ वाचकांच्या पारमार्थिक हिताचें रक्षण हा ग्रंथ करील.

१२ ह्या ग्रंथोत्पादित निश्शेष द्रव्याचा विनियोग शिवालयाकडे योजिलेला आहे.

हे प्रभो, वाचकांस परमामृताचें सेवन करण्याची बुद्धी दे आणि जे भक्तीनें तुला जाणतील व भजतील त्यांना तुझ्या कृपेचा लाभ देऊन त्यांची सार्थकता कर. एवढे तुला प्रार्थून ही प्रस्तावना पुरी करतों.

स्थळ... 

# संक्षिप्त इतिहास २

१ मुकुंदरायजी हे एक देशस्थ ब्राह्मण होते. ते यवनी राज्यांतच अंबे जोगाईकडेसच एका प्रांताचे मोठे अधिकारी होते. पूर्व संचित ज्ञानाच्या ओघब-लानें एकाएकीं त्यांना उपरती झाली. व त्यांनीं आपल्या अधिकाराचा व प्र-पंचादि व्यवहारादि वैभवादिकांचा एकदम सर्वस्वी त्याग केला आणि केवळ एक-निष्ठपणानें ते श्री परमेश्वराच्या भक्तीस लागले. पूर्व संचित योगानें व ओघ-बलानें सर्व तयारी होतीच होती त्यामुळें अल्प कालांतच ते मोठे अध्यात्मवेत्ते किंवा ब्रह्मतत्वज्ञानी असेच होऊन साधुत्वांत अत्यंत प्रवीणता पावले आणि केवळ ब्रह्मरूप होत्सातां ते मोठे साक्षात्कारीही झाले. परमेश्वराच्या कृपेनें ह्या गोष्टी त्यांना वरच्यावर सत्वरच साधत व लाभत गेल्या. तेणेंकरून त्यांची प्रख्यातीही सहजीच होत गेली. त्याकाळीं यवनी राज्यांत मुकुंदराय व अमृ-तराय हीं मोठीं दोन रत्नेंच जणूं काय साधुत्वांत प्रकाशमान झालीं होतीं व उभयतांचा प्रतापही तसाच गाजत होता. या दोघांची प्रसिद्धी विशेषेंकरून मोगलाईंतच फार झाली होती. व अद्यापि इतर ठिकाणापेक्षां मोगलाईंतच फार प्रसिद्धी आहे. तथ्य इतिहास आतां मिळूं शकत नाहीं; यासाठीं वृद्ध गृहस्थांच्या मुखानें जो दंतकथेप्रमाणें इतिहास सर्वतोमुखीं सारखा मिळतो त्यांत प्रायः तथ्यांश असतो असें दृढ अनुमान आहे त्या आधारानें हा इतिहास जुळला आहे.

२ योगेश्वरी आणि अंबा ही देवीची नामाभिधानें स्पष्ट आहेत. तिच्या पीठस्थानास अपभ्रंशानें "जोगाईचें अंबें" असेंच नांव त्या क्षेत्रास पडलें, तें अद्यापि तसेंच चाललें आहे. तेथें निजाम सरकारची मोठी फौज व रिसाला अद्यापि आहे. हें क्षेत्र प्राचीनपासून प्रसिद्ध आहे. येथेंच रायजीचें ठाणें व रहाणें होतें. विरक्त झाल्यावर रायजी हे येथेंही असत व कधीं कधीं त्याच प्रांतीं अंवढ्या नागनाथाचें महास्थान आहे तेथील शिवालयांतही जाऊन रहात असत, रायजी हे महान् शैव होते व रूपानें, देखणे पुष्ट व भव्य होते. जटा व रुद्राक्ष धारणेनें ते केवळ शिवावतारीच दिसत असत. ते पन्नाशीच्या सु-मारास विरक्त झाले, त्यांनीं अनेकांस अनुग्रह करून कृतार्थ केलें व पश्चातूही

परमामृत ग्रंथद्वारें कृतार्थ करूं इच्छित आहेत. आम्हीच होऊं इच्छित नाहीं. शिष्य वर्गांच्या विनंतीवरून त्यांनीं हा परमामृत ग्रंथ केला. हा ग्रंथ फार टुका, सुबोध, ज्ञानगांभीर्यार्थी, मुद्देसूद, व्यवस्थित, मुख्य मुख्य विषयांचा संगतवार अनुक्रम, स्वानुभव प्रकाशक व अन्य वाचकांस अनुभव आणून देणारा, रसाळ आणि ईश्वरी कृपेचा लाभप्रद असाच केला आहे. ह्या ग्रंथावरून रायजींच्या व्यवस्थित स्वभावाचें व विस्तीर्ण ज्ञानावरण शक्तीचें अंशतः तरी अनुमान होतें. अर्थात देशाधिपतित्व ते उत्तम करीत असतील यांत कांहीं संशय दिसत नाहीं. व तशी योग्यता असल्यावांचून कोणीही राजा अशा कामावर नेमणारच नाहीं.

३ रायजींच्या प्रसिद्धीस आणखी एक विशेष गोष्ट घडून आली. ती अशी कीं, तिकडच्याच एका मांडलिक राजानें अनेक साधुसंत कारागृहांत ठेवले होते. ज्या त्या साधुला ब्रह्म दाखवा असें तो ह्मणे आणि न दाखविलें ह्मणजे त्याला तो कैदेंत ठेवी. एके समयीं रायजीवरही हा प्रसंग येऊन ठेपला. तेव्हां रायजी राजास ह्मणाले. तुझी अट्ट मी पाळतों तशी माझी तूं पाळशील तर मी तुला ब्रह्म दाखवीन. राजानें तें मान्य केलें. सज्य घोडा तेथें होताच त्यावर राजास चढण्यास रायजींनीं सांगितलें परंतु एका रिकीबींत पाय ठेवल्यापासून दुसरींत पाय ठेवण्याच्या मध्य कालांत मन एकाग्र कर न केलेस तर तुझा शिरच्छेद मी करावा असा मला अधिकार दे. आणि तशी एकाग्रता तूं केली असून मी ब्रह्म न दाखविलें तर माझा शिरच्छेद तूं कर. राजानें तें मान्य करून रिकीबींत पाय ठेवला व मरण्याच्या भीतीनें मन भडकले व एकाग्र होईना. रायजींनीं राजास एक काठी पाठीत मारिली त्याबरोबर राजास समाधी लागली. व एक पाय रिकीबींत ठेवून राजा हलेनासा झाला. प्रहर दीडप्रहर तो तसाच राहिला. अलम दुनिया हा तमाशा पहात आहे पुढें राजाची व्यवस्था नीट नाहीं. असें वाटून सर्व राण्या चुडेदान द्यावे ह्मणून रायजींच्या पायीं लोळूं लागल्या. तेव्हां रायजींनीं त्याची समाधी उतरली. राजा पूर्व स्थितीवर येऊन, अनुपम ब्रह्म सौख्यांतून मला माघारें कां आणलें असें म्हणून दुःख प्रदर्शन करूं लागला. अंतरीं परम पुरुषाचें दर्शन घडलें ह्मणाला. ह्या ब्रह्मानुभवानें तो लीनदीन होऊन रायजींचे चरणीं लोटांगणें घालूं लागला. मग रायजींच्या आज्ञेनें सर्व साधू कैदेंतून मुक्त केले व त्यांना मंगलस्नानें घालून भोजनें देऊन धनार्पणानें संतुष्ट

केले. व राजा हा रायजींचा शिष्य होऊन कृतार्थही झाला. तेव्हांपासून रायजींची फारच प्रसिद्धि झाली. असें योगमार्गाचें महत्फल असतां तो कोणास साधत नाहीं ह्मणून खोटे ह्मणतात. व पाखांड्यास तसें ह्मणण्यास सवड झाली आहे.

४ ह्या पुढचें चवथें प्रकरण मननपूर्वक वाचून पहा ह्मणजे परब्रह्म कैवल्य मुक्ति सर्व मुक्तींत श्रेष्ठ आहे अशी खातरी होईल. सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता ह्या चारी देवमुक्ति आहेत. ते देव तरी कैवल्य मुक्तिच इच्छित आहेत व सर्व ज्ञात्यांचें मत तसेंच आहे त्यापेक्षां कैवल्य मुक्ति साधावी हेंच उत्तम आहे. तरी ती अनुक्रमानें साधतां येईल. केशरी भात साध्या भाताहून श्रेष्ठ व उत्तम आहे खरा परंतु साधा केल्याशिवाय केशरी व्हावयाचा नाहीं. मार्ग क्रमता क्रमता थेट ठिकाणाप्रत प्राविष्ट होण्याचा संभव आहे असें विद्यारण्य ह्मणतात.

५ शालीवाहन शके ११०० पासून १२०० च्या आंत काशी क्षेत्रांत श्री रामानंदस्वामी, कबीर, कमाल हे होते. त्या रामानंदांनीं विठ्ठलपंतास सन्यास दिला व पुढें तो पत्नी त्यागून आल्याचें समजतांच पुनः त्याला ग्रहस्थाश्रमांत घातलें. नंतर त्याला निवृती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हीं चार रत्नें झालीं. हीं रत्नें व नामदेव तेराव्या शतकांत होते. १२१२ त ज्ञानेश्वरी ग्रंथ झाला. चवदाव्या शतकांत ब्रह्मानंद स्वामी झाले हे श्रीधरस्वामींचे पूर्वज होते. एकनाथ १५०६ व १५३० पासून १६०० च्या आंत रामदास, तुकोबा, मुक्तेश्वर व चिंचवडचे मोरया गोसावी आणि वामन पंडित हे झाले. सतराव्या शतकांत मुकुंदराय, अमृतराय, श्रीधरस्वामी, महिपतीबोवा आणि मोरोपंत झाले. असे ऐतिहासिक दाखल्यावरून दिसून येतें. हे दाखले ग्रंथोग्रंथीं ठेवण्यानें भावी समजूतीस बरे पडेल ह्मणून हें टिपण येथें दिलें आहे.

६ आपणांस जें कळलें व ज्या मार्गानें परमेश्वरी लाभ झाला तें लोकांस कळावें व त्यांनीं तो लाभ साधावा म्हणून साधूसंतांनीं निरपेक्ष हेतुनें केवळ लोकोपकारार्थ जे ग्रंथ लिहून ठेवले त्यांवर विश्वास ठेवून तदनुसार वर्तावे असेंच सत्य ज्ञानी जाणतात. परंतु मूर्ख पाखांडी तसें जाणत नाहींत.

७ पाखांडी तर्कटी नास्तिकांस त्यांच्या तसल्याच बोथट ज्ञानानें वृथा मोठी घमेंडी असते. आणि ह्मणूनच ते अतीशय वाचाळपणा करतात तथापि त्यांचें मूर्खत्व ज्ञाते लोक तेव्हांच ताडतात. जसें नृत्याच्या भरांत पिसारा वर करून

मयूर नाचतो त्याकाळीं त्याचें पश्चमद्वार प्रेक्षकांस सहज दृष्टीस पडतें. मयुराच्या तें लक्षांत येत नाहीं तद्वत् असल्या लोकांना घमेंडींत त्यांचें मूर्खत्व व न्यूनत्व कळत नाहीं.

८ सत्यज्ञानी व भावीक हे सदैव तरतच गेलें आणि पाखांडवादी हे सदैव बुडतच आले असें अनेक रीतीच्या अनुभवानें सिद्ध झालेलें आहे.

९ सदैव सुख असावें व दुःख कधींच नसावें असें सारे जीव इच्छितात परंतु असें स्थान कोणचें हें मात्र त्यांना कळत नाहीं. तें ह्या ग्रंथद्वारें कळेल.

१० हे प्रभो, सर्वांना सत्यज्ञान देऊन अक्षयी सुखी कर.

---

## ॥ श्री सद्गुरु मुकुंदराय यांचे स्तवन व प्रार्थना ३ ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥
॥ ° जयजयाजी, मुकुंदराजा ॥ ° परमामृत हे, उद्धारकाजा ॥
॥ ° तुह्मी करोनि, दर्शविली मजा ॥ ° ब्रह्मप्राप्त्यर्थ, आह्मांशीं ॥१॥
॥ ° बोध न होतां, ग्रंथची व्यर्थ ॥ ° ह्मणती मूर्ख, न जाणो अर्थ ॥
॥ ° जुनाट ग्रंथाचा, स्पष्टार्थ ॥ ° करितों हा देह, तव कृपें ॥ २ ॥
॥ ° माटे गणेश, बावाजी ॥ ° प्रपंचामाजीं, एक पाजी ॥
॥ ° तुमच्या कृपें, ह्या ग्रंथामाजी ॥ ° शिष्य तुमचा, असे कीं ॥ ३ ॥
॥ ° गुरु ग्रंथाचें, पुनरुज्जीवन ॥ ° तेंची मुमुक्षूंचें, रंजन ॥
॥ ° दर्शवावें परब्रह्माचें, स्तवन ॥ ° हाची धर्म, शिष्याचा ॥ ४ ॥
॥ ° सांप्रत भाषा, अनुलक्षून ॥ ° केल्या समस्या परिपूर्ण ॥
॥ ° चुकलें मुकलें, संपूर्ण ॥ ° क्षमा करी तूं, जगदीशा ॥ ५ ॥
॥ इति श्री गणेश शिष्येण विरचिते गुरु प्रार्थना संपूर्ण. ॥

---

वाचकांस विनंति—मुकुंदरायजींनीं, परमामृत ग्रंथांत, ओंवीच्या रूपानें जें कांहीं संक्षेपानें प्रदर्शित केले आहे त्याचा अर्थ ओंवी वाचतांनाच सहज कळत जावा ह्मणून अशा गूढ विषयाचें स्पष्टिकरण प्रथमतः करणें भाग आहे. यासाठीं "ब्रह्मविद्या प्रबोधरत्न" ह्या ग्रंथांतील एका कलमाचा उतारा येथें देतों. तेणें-करून परमामृताचें हृद्गत झटकर कळेल.

सूचना—ह्या अध्यात्मांत सहा मुख्य स्थानें आहेत. १ परब्रह्मपरमेश्वर. २ स्फुर्ति आदिमाया, ३ प्रकृति महामाया. ४ पुरुषईश्वर. ५ प्रमुख देवतात्रय ( ब्रह्म-देव, विष्णु, महेश ) आणि ६ पुढें सारी सृष्टि. या साहींचे पोटभाग ज्यांच्या त्यांच्या अंगभूत आहेत.

कलम ३७१ सिद्धांत १ याचा उतारा.

१ ॥ यत् ब्रहत् तत् ब्रह्म ॥ सर्वांत जें मोठें तें ब्रह्म असा अर्थ आहे.

( १ ) अनंतकोटी ब्रह्मांडांचा नायक किंवा स्वामी असे ज्याला ह्मणतात तोच **"परब्रह्म"** **"परमात्मा"** **"परमेश्वर"** **"सदाशिव"** आहे. तोच सर्वांचें आ-दिकारण असून भव्य जगत् पसाऱ्याचे ह्मणजे जगत् रूपी वृक्षाचें आद्य बीज तोच आहे. तोच सर्वांना आश्रयाधिष्ठान राखणारा आहे. आणि तोच सर्वांमध्यें श्रेष्ठ व अगदीं सरत्या शेवटचा असा आहे. ह्मणजे त्याच्या पलीकडे त्याच्या परतें कांहीं सुद्धां नाहीं. ह्मणून तदर्थी, त्याच्या नांवामागें "पर" उपसर्ग लावून **"परब्रह्म, परमात्मा, परमेश्वर,"** अशा अर्थ दर्शकतेसाठीं, तसाच प्र-त्येक शब्द सिद्ध झाला आहे. **"सदाशिव"** ह्मणजे सदैव कल्याणकारक ( शिव शब्द कल्याणप्रदर्शक आहे. ) असें ज्याचें नामाभिधान अत्यंत मंगलदायक आहे असा नामार्थ महिमा ज्ञात्यांनीं दर्शित केला आहे.

( २ ) अशा निरामय परब्रह्मपरमात्मापरमेश्वरास, जी स्फूर्ति झाली, ती कल्पित ह्मणजेच मायावी असल्यामुळें व ती अगदींच प्रथमची आहे ह्मणूनच तिला आदिमाया असें तत्त्ववेत्त्यांनीं म्हटलें आहे. कल्पनोद्भव होणें हेंच स्फु-र्तीचें स्वभावसिद्ध लक्षण आहे. निरामय स्थितींत कल्पनोद्भव होणें हीच उपाधि म्हणजे उपद्रव किंवा उपद्व्याप आहे. आणि म्हणूनच स्फुर्तीला उपाधि अशीही संज्ञा आहे. तशीच ती आदर्शोपमही आहे. जसा आरसा प्रतिबिंब धारण करतो तशी ती आहे.

( ३ ) अशी स्फुर्ति, परमेश्वरास झाल्यानंतर तिच्याच द्वारें परमेश्वराचें प्रथमचें जें प्रतिबिंब उद्भवलें त्यापासून प्रकृति व पुरुष अशीं दोन निर्माण झालीं. अर्थात् तें उभयतांचें सजोड मिश्रणच उद्भवलें. अदृश्य व दृश्याकारी जड पदार्थरूपी अशी माया असून मायोत्पादित भुतांच्या अंतर्गत हृदयस्थ चैतन्य चालकत्वानें असा ईश्वर आहे. प्रकृती हीच महामाया व पुरुष हाच ईश्वर होय. हीं उभयतांही परब्रह्मपरमेश्वराच्याच कल्पितांतील सृष्ट ( जन्य ) आहेत. अर्थात् परब्रह्मदृष्टच्या ईश्वर हा मायिकच ( सृष्टींतीलच एक मुख्य ) पण भ्रामकच ठरतो आणि माया तर स्वतःसिद्ध मायिकच ह्मणजे भ्रामकच आहे. त्या ईश्वराच्या ठायीं परब्रह्माचें चैतन्य ह्मणजे सर्व शक्ति आहेत. असा परमेश्वरापासून स्फुर्तिद्वारें प्रकृतिपुरुषाचा किंवा माया व ईश्वराचा संबंध लक्षांत आणावा.

( ४ ) पुढें मायायोगेकडून अनंत अंडीं निर्माण झालीं व तितक्या सर्वांवरही परब्रह्मपरमेश्वराच्या शक्तिसामर्थ्यानें ह्मणजे चैतन्याच्या चालकत्वेकडून कार्यकर्तृत्वार्थी परमेश्वराकडून ईश्वराची योजना झाली. त्यांत जी चैतन्यशक्ति परब्रह्मपरमेश्वराकडून ईश्वराकडे आली तिचेंच ह्मणजे त्या शक्तीचेंच नांव ब्रह्म असें आहे. अर्थात् तें ब्रह्म आणि अंडें मिळून ब्रह्मांडें किंवा एक वचनी ब्रह्मांड असा साधित शब्द तशा अर्थदर्शकतेसाठीं सिद्ध झाला.

( ५ ) अशा अनंत कोटी ब्रह्म अंड्यावर ईश्वर एक प्रकारें अधिकार चालविण्यास योजिला असतांही त्याच्यावर सुद्धां ज्यांचें स्वामित्व आहे व ज्याच्या शक्तिदातृत्वामुळेंच त्यांचे लालनपालन होतें व जो त्या सर्वांचें आद्य बीज व जो त्यांचा उत्पादक व ज्यानें ब्रह्मशक्ति देऊन ईश्वर स्थापित केला असा जो केवळ परका त्याला " परब्रह्म, परमपुरुष, परमईश्वर " असें ह्मणूनही शिवाय अनंत कोटी "ब्रह्मांडांचा नायक किंवा स्वामी असेंही गौरवार्थी ह्मणणें सयुक्तिक वाटून तत्वज्ञात्यांनीं तशीं तशीं विशेषणें योजिलीं व प्रेमानें त्याचें नांव बुध्यां साजरें केलें. वस्तुतः त्याला नामरूप मुळींच नाहीं.

( ६ ) अनंत तारे, ग्रहगोल, किंवा नानाप्रकारच्या चांदण्या, पृथ्व्या, ज्या ब्रह्मांडाच्या पोटांत पोकळ स्थळीं भ्रमण करीत आहेत असें प्रत्येक अंडें ब्रह्मांड होय. ह्यासारखीं अशीं आणखीं किती ब्रह्मांडें आहेत कोण जाणे ? त्यांचा अंतपार ब्रह्मदेवादिकांस देखील लागला नाहीं व कोणासही लागावयाचा नाहीं.

म्हणूनच अनंत कोटी ब्रह्मांडें आहेत अशाच रीतीनें ह्या संख्येचा ह्या प्रकारें-करून विशेषणार्थी निर्बंध योजून तितक्यांचाही तूं स्वामी आहेस अशी ज्ञात्यांनीं व इतर सर्वांनीं त्या परब्रह्मपरमेश्वराची मोठ्या प्रेमानें स्तुति केली.

७ सत्य, ज्ञान, अनंतत्व सर्व व्यापकत्व, सर्व सामर्थ्य दातृत्व आणि सत्ताधीशत्व तशीच सर्वाधिष्ठानदातृत्वप्रतिष्ठा हीं केवळ त्या परमेश्वराच्याच ठायीं आहेत. तरी कर्तृत्व, भोगतृत्व विरहित असाच तो आहे. तीं सर्व त्यानें पुढच्या पिढीकडेसच सोंपलीं आहेत. आणि तसाच तो क्रम पुढच्या पिढीनें उत्तरोत्तर आचरण केला आहे. मागच्या पिढीचे पुढच्यास जाणताहेत; पण पुढच्या पिढीच्यांस मागले ज्ञात नाहींत तें मागले अगम्य, अतर्क्य, अकाल्पनिक, असेंच पुढले ह्मणत आहेत. ही पण एक यांत केवळ गुप्त रहाण्याच्या संबंधानें आणखी मोठी बारकाईची खुबी आहे.

८ येथून तेथून प्रारंभापासून शेवटापर्यंत पहात जावें, तों सारी व्यवस्थेची तऱ्हा राजकीय गुप्त कारस्थानासारखीच दिसून येते. स्वतःकडे सत्तेचें सूत्र ठेवून आपण गुप्त व अलिप्त रहावें आणि कर्मकर्तृत्व, भोगतृत्व दुसऱ्याकडे सोंपून त्याला वृथैव नामधारी व आरोपाधिकारीपुढें करावा. हाच व असाच आद्यंत क्रम दिसतो. त्याचें स्पष्टीकरण करतों.

( १ ) परमेश्वरानें मायासमवेत ईश्वराला सृष्टिकर्तृत्वास पुढें केलें व आपण अत्यंत गुप्त व अलिप्त राहिला.

( २ ) ईश्वरानें ब्रह्मदेव, विष्णु आणि महेश ह्या त्रिवर्गांना पुढें नामधारी करून आपण गुप्त व अलिप्तच राहिला. प्रकृतीमायेनें तिघांच्या तीन स्त्रियांचीं रूपें धारण करून आपलें गुप्तत्व कायमच राखलें.

( ३ ) त्रिवर्ग देवांनींही, सृष्टिक्रमार्थ प्रजापति निर्माण करून इंद्रास देवांचा राजा करून व इतर कामावरही अन्य देवता योजून त्यांच्याकडेसच कार्यकर्तृत्वें सोंपून त्यांना नामाधिकारी करून आपण अलिप्तच राहिले; तसेंच नामाधिकारी रोग पुढें करून मृत्यू अलिप्तच राहिला.

( ४ ) हीच पद्धत जगव्यवहारांतही अशीच उतरत आली.

( ५ ) राजा स्वतः अलिप्त राहून सेवकाधिकारी यांच्या द्वारें आपलीं कर्म-

कर्तृत्वें करवितो. सेवक मात्र जगांत प्रसिद्धीस येतात. राजा त्या कर्तृत्वांत मुळींच दिसून येत नाहीं.

( ६ ) हुकमत चालविणारे सत्ताधीश एकीकडे गुप्त व अलिप्त रहातात आणि त्यांच्या कर्तृत्वाचा प्रभाव आणि प्रताप व प्रकाश मात्र सर्वत्र पसरतो. तो पसरण्यास केवळ वृथा नामधारी हुकूम अमलांत आणणारे मात्र जगांत दिसून येतात.

( ७ ) कशाही युक्तीनें व गुप्त मसलतीनें कांहीं कर्म कोणीही केलें तरी धूर्त व ज्ञानी तें कर्म कोणाचें व कसे हें जाणतात.

जेथें देहगती नाहीं तेथें ज्ञानगती आहे; मात्र तैल व कुशाग्र अशी बुद्धी पाहिजे. ज्याचे अंश आपण आहों त्याचेच ज्ञानादि गुण, लक्षणें व धर्म हे अंशानें आपणांत आहेत. आणि ह्मणूनच त्याला व आपण आपल्याला जाणू शकतों. अद्वैताचें द्वैत होऊन त्या द्वैतांतच आपण निमग्न झालों ते पुनरपि अद्वैतवासी झालों ह्मणजे तीच मुक्ति.

( ८ ) ब्रह्मांड कारभारावर ईश्वर असून त्याच्या कृती व लक्षणें ज्ञात्यांनीं जाणलीं व त्याला अनुक्रमें ब्रह्म, पुरुष, ईश्वर, मग शबल, विराट, विश्वतैजस्, हिरण्यगर्भ हीं व अशीं अनेक नांवें प्राप्त झालीं. वस्तुतः त्याला नाम रूप मुळींच नाहीं. तो केवळ परमेश्वर शक्तीनें मात्र आहे; तरी गुणावगुणी कर्मकर्तृत्वाधिकारी तोच आहे. इतकें व असें ज्ञात्यांनीं पक्कें जाणलें ह्मणूनच तशीं विशेषणार्थी नांवें झालीं.

( ९ ) ईश्वराचें कर्तृत्वही अत्यंत गुप्त आहे. सर्व तो करीत असून केवळ मायावी देह, तें करतो असेंच वाटतें. त्या देहांतर्गत अंतस्थ कर्त्यास कोणीच जाणत नाहींत. मायेच्या हृदयस्थ तो राहतो व तिला पंचभूतांच्या द्वारें भ्रमवितो तेणेंकरून भ्रम निर्माण होतो. गी. अ. १८ श्लोक ६१.

॥ ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
॥ भ्रामयन्सर्व भूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥

मिळून सारा व्यवहार गुप्तत्व राखूनच कर्मकर्तृत्वाचा आहे असेंच सिद्ध होतें

(१०) गुप्त राहण्यांत जें महत्व व शहाणपण आहे तें प्रगट होण्यांत नाहीं सूर्य रोज प्रगटतो. दिव्यानें तसा दिवा दुसरा होतो; पण त्यांचें आश्चर्य मुळीं

वाटत नाहीं व महत्वही कोणी मानीत नाहींत. तस्मात् गुप्त राहणें हेंच योग्य आहे असेंच ठरतें.

९ दृश्य, साकारी व विकारी असें जें मायावी ब्रह्ममिश्रित अंडें आहे, त्याच्या पोटांतील किल्मिषादि कर्दम कचरा व घाण हेंच साक्षात् प्रकृति महामायेचे केवळ नाशवंत असें रूप आहे. तरी चालक प्राधान्यत्व मायेकडे नसून तें केवळ ईश्वर ब्रह्माकडेसच आहे. त्या चालकत्वानेंच गतिक्रम होऊन भ्रम निर्माण होतो. तेंच भ्रमदर्शन मायेचें लक्षण आहे. अशा रीतीनें प्रकृतिपुरुषाच्या संयोगी क्रियेनें मिश्रणरूपी सर्वत्र भ्रामक व्यवहार साऱ्या ब्रह्मांडभर पसरला आहे. असावे एक व दिसावे एक व गतिक्रमानें भासावे एक आणि परिणाम भलताच व्हावा. अर्थात् अशा मिश्र स्थितीला शुद्ध ब्रह्म असें कोणीही ह्मणणारच नाहीं. मग तत्ववेत्त्यांनीं मिश्रणार्थी शबल ब्रह्म ह्मटलें तेंच योग्य आहे.

१० अशा प्रत्येक ब्रह्मअंड्यांतील प्रजेनें त्या त्या अंड्याच्या मुख्य अधिकारी ब्रह्मास जाणले पाहिजे व शरण गेले पाहिजे. प्रथम सगुणत्वानें नंतर निर्गुणत्वानें तें ब्रह्म जाणलें पाहिजे व मानलें पाहिजे. ब्रह्ममुक्तीचा अनुक्रम देवता मुक्त्यनुक्रमानेंच साधावा लागतो. ब्रह्ममुक्त झाल्यानंतर मग ब्रह्मांतून परब्रह्म तंतुद्वारें तेथें प्रविष्ट व्हावें लागतें व असें प्रविष्ट होणें हाच ज्ञानाचा अंत आहे. पहा भ. गी. अध्याय १८ श्लोक ५०.

११ ब्रह्मांडें किंवा त्यांच्या आंतील तारे ग्रहगोलादिकांचा व्यवहार कसा चालला आहे तें पुढील उदाहरणावरून बरेंच लक्षांत येण्याजोगें आहे. एक वीतभर व्यासाची वर्तुळ फळी कापून मध्यें तर्जनी मावेल असें गुळगुळीत एक वर्तुळ भोंक करावें. त्या वर्तुळ फळीच्या सभोंवार किनाऱ्यानें समांतरानें हवे तितके छेद पाडावे आणि तितके चेंडू तयार करावें. प्रत्येक चेंडूंतून दीड दीड हाताइतके बळकट व लांब असे धागे बाहेर काढावे; नंतर ते प्रत्येक छेदांत एक एक टोंक ओंवून बांधावे ह्मणजे फळी उचलली असतां ते चेंडू धाग्याच्या जोरावर किंवा आधारावर लोंबूं लागतील. मग फळीच्या भोंकांत तर्जनी घालून ती फिरवून त्या फळीस वर्तुळ गती आणावी. ह्मणजे फिरवतां फिरवतां धागें आडवे ताठ होऊन सर्व चेंडू वर्तुळ गतीनें फिरूं लागतील. त्या कालीं तो देखावा केवळ छत्रीसारखा भासेल. अर्थात् ह्याचप्रमाणें ब्रह्मांडें व प्रत्येक ब्र-

ह्मांडांतील अनेक ग्रह व तारे, गोल हे परब्रह्मशक्तिरूप तंतूच्या आधारबलावर भ्रमण करीत असतील असें सहजच लक्षांत येईल.

ह्या क्रियेंत चक्राच्या मध्य बिंदुस्थानीं गतीनें जी शक्ति निर्माण होते तेंच परब्रह्म व त्याचें मुख्य स्थान कल्पावें. प्रथमतः फिरणारें वर्तुळचक्र जें आहे तीच स्फुर्ति किंवा आदिमाया कल्पावी. प्रत्येक व सर्व चेंडू हीच प्रकृति महामाया समजावी. तसेंच चेंडूं हेंच अनेक मायावी ब्रह्मांडाभावी किंवा त्यांतील अनेक गोलाभावी समजावें. चेंडूचे धागे हेंच परब्रह्म तंतुरूप जाणावें. व तेच तंतू चेंडूंरूपीं ब्रह्मांडाचे किंवा ग्रहगोल तारे यांचे आश्रयदाते अधिष्ठानरूपीं समजावें. चिंध्या व त्यासहित चेंडूं हेंच मायेचें नाशवंत रूप जाणावें; आणि चेंडूंतील अदृश्य असें जें जडत्वाच्या द्वारें गती आणणारें चालकतत्व तेच ईश्वराभावी जाणावें. कारण तेंच चालकतत्व केवळ तंतुद्वारें चक्राच्या गतिरूप शक्तीस एकीकडून आकर्षण करतें व दुसरीकडे सर्व चेंडूंस गति देतें व भराटेदार शक्ति आणतें. तद्वत् ईश्वर हा हृदयस्थ राहून मायेला भूतयंत्रारूढ करून अशीच भ्रमणरूपी गति आणतो असें लक्षांत आणावें. छत्री नसतां छत्रीप्रमाणें केवळ जो माथ्यावर वृथा भास दिसतो तद्वत्च मायाभ्रम सर्वत्र पसरलेला दिसत आहे. तात्पर्य ह्या व ईश्वराच्या अशाच संयोग क्रियेनें व चालक चैतन्याच्या सहाय्यानें ब्रह्मांडाचें व ब्रह्मांडाच्या आंतील असेच सर्व भ्रामक खेळ व व्यवहार चाललेले आहेत. आणि त्याला मूलाधार परब्रह्म व त्याचे तंतू हेंच अधिष्ठान किंवा आधार आहे. हा अल्प खेळ महत् खेळाचा दर्शक व बोधक होतो. देहपिंड तरी एक चेंडूच आहे व तोही ब्रह्मतंतूनेंच वर्तत आहे ॥ यत् पिंडे तत् ब्रह्मांडे ॥ पुढें सृष्टि रचनेंत देहावर देह चढले व परस्परें आश्रयानें राहून एकमेकावर जगत आहेत व निर्वाह करीत आहेत.

१२ कर्मावांचून केवळ इच्छामात्रेकडून हवें तें घडविणें हें सामर्थ्य एकट्या परब्रह्माचेंच आहे. वरील खेळ कर्तृत्वांत मनुष्य कर्ता ठरतो ह्मणून तसा बाध परमेश्वराच्या ठायीं आणण्याचा वृथा यत्न करूं नये. कारण, तो स्वतंत्र व मनुष्य परतंत्र आहे. फार तर काय पण ईश्वर देखील परतंत्रच आहे; आणि ह्मणूनच परब्रह्माचें महत्व आहे. ब्रह्म हें परब्रह्मावर अवलंबून आहे तसें परब्रह्म नाहीं.

॥ श्रीगणेशायनमः ॥

श्रीमत्परमेश्वरहिरण्यगर्भयाज्ञवल्क्य

पतंजलिवेदव्यासप्रभृतिभ्योनमः.

---

श्रीयुत[illegible] हें एक अपूर्व जाहिर पत्र छापिलें आहे. ह्याचा उद्देश असा कीं, [illegible] या भरतवर्षाची आर्यधर्मविद्येच्या संबंधानें अशी दशा झाली आहे कीं, वेद, शास्त्र, व तदुक्त अनुष्ठानें यांचा प्रायः लोप झाल्यानें वर्णाश्रमधर्माच्या सर्वथा उच्छेदाचा प्रसंग आला आहे. आतां पुरुषसूक्तांत वेदाध्ययन साधारण पुराणव्युत्पत्ति पर्यंत शास्त्राध्ययन इतकेंच प्रायः राहिलें आहे. खरें आपल्या आस्तिकांचीं सहादर्शनें त्यांतील यथार्थ तत्त्वें जाणणारे आतां अति विरळ आहेत तेही सर्व प्रकारांनीं दुर्बळ झाले आहेत त्यानें इतर मतांचें अत्यंत प्राबल्य झालें आहे तथापि "स्वधर्मेनिधनंश्रेयःपरधर्मोभयावहः" इत्यादि भगवद्वाक्यांवर विश्वास ठेवून खरे स्वधर्माचे जिज्ञासु आहेत त्यांस अल्पश्रमानीं शास्त्र तत्त्वें कळावीं एतदर्थ बहुत शिष्ट विद्वज्जनाच्या अनुमतीवरून एक वर्षापासून कांहीं सदुद्योगाचा विचार करून आरंभ केला आहे. तो असा. सांख्यशास्त्र, योगशास्त्र, वैशेषिक, गौतमीय, जैमिनीय, वैयासिक ह्या सहा दर्शनांच्या सर्वतत्त्वांचे संग्राहक असून अल्प परिमाण व सुबोध अशा ग्रंथांचीं भाषांतरें सध्या महाराष्ट्र भाषेंत व गुर्जर भाषेंत चालू केलीं आहेत. त्यां पैकीं सर्व लोकांस प्रिय चित्तशुद्धि ज्ञान व मोक्ष यांचें परमसाधन श्रीपतंजलिकृत योगशास्त्र याची व्याख्या योगमणिप्रभा प्रसिद्ध उत्तम आहे तिचें दोन भाषांत भाषांतर सिद्ध केलें आहे. त्यांशीं सहित व ह्या सूत्र भाष्यावर वाचस्पत्य योगवार्तिक भोजवृत्ति प्रभृति ग्रंथ आहेत त्यांतील टिप्पणीशीं सहित योगमणिप्रभा छापविण्या

चा विचार केला आहे. तें पुस्तक घेऊन जेजे अधिकारी वाचतील त्यांस परम आनंद होईल असा निश्चय आहे. जे जिज्ञासु कांहीं दिवस आर्य धर्म राहावा अशी इच्छा करणारे आहेत ते ह्यांत अधिक प्रोत्साहन करतील अशी अशा आहे.

हें पुस्तक प्रायः सहा महिन्यांचे आंत मुद्रित होईल व त्याची किंमत मुद्रणानंतर संस्कृत टिप्पणी सहित योगमाणिप्रभेचा रु० १ प्राकृत टिप्पणी सहित दोन्हीं भाषांतरें याचे प्रत्येकीं रु० २ जे आगाऊ किम्मत पाठवितील त्यांस तीन्ही पुस्तकें घेतलीं तर रु ४ पडतलि. व मूल संस्कृत आणि कोणतेंही एक भाषांतर घेतील त्यांस रु २॥ पडतील. जे कोणतें ही फक्त भाषांतर घेतील त्यांस रु १॥ दीड.

ठिकाणे
धुसवाडी घर नं० ७
आनेरेबल विश्वनाथ नारायण मंडलिकगृहे.

भाषान्तरादि व्यवस्थापक
शास्त्रि
राजाराम गणेश बोडस.

मिति चैत्र शु ॥ १ सोमवार शके १८०८ व्ययनामसंवत्सरे
ता० ५ माहे एप्रील सन १८८६ इसवी.

श्रीः

# पातंजलयोगसूत्रम्

## ( योगमणिप्रभाव्याख्यासमेतम् )

## अथयोगानुशासनम् ॥१॥

श्रीगणेशायनमः ॥ वंदेक्लेशाद्यऽसंसृष्टंपुराणपुरुषं हरिम् ॥प्रकृत्यासीतयाजुष्टंयोगेशंयोगदायिनम् ॥१॥ पतंजलिंसूत्रकृतंप्रणम्यव्यासंमुनिंभाष्यकृतंचभक्त्या ॥ भाष्यानुगांयोगमणिप्रभाख्यांवृत्तिंविधास्यामियथामतीव्याम् ॥ २ ॥ इहखलुभगवान्पतञ्जलिः प्रेक्षावत्प्रवृत्त्यंगंशास्त्रप्रतिपाद्यंदर्शयति अत्राथशब्दआरंभार्थः योगशास्त्रमारभ्यतइत्यर्थः[1] यद्यपिहिरण्यगर्भेणशास्त्रंकृतं[2] तथापि तद्विस्तृतमितिमत्वातदनुसृतंशास्त्रमारभ्यतइतिद्योतयत्यनुशासनमिति अत्रसूत्रेयोगःशास्त्रप्रतिपाद्यउक्तः अर्थात्तज्जिज्ञासुरधिकारी फलंतुयोगस्यकैवल्यं यथायोगंतेषांसंबंधइत्यनुबंधचतुष्टयंद्रष्टव्य

---

१ योगस्य मुख्यमधिकार्यत्वं शास्त्रस्य तु तत्प्रतिपादकतया गौणं तदिति वाचस्पतिमिश्राः । शास्त्रस्यैव मुख्यमधिकार्यत्वं भाष्यस्वरसादिति विज्ञानयोगिनः ।

२ हिरण्यगर्भो योगस्यवक्ता नान्यः पुरातन इति योगियाज्ञवल्क्यवचनमत्रप्रमाणम्

तत्रयोगोद्विविधः संप्रज्ञातोऽसंप्रज्ञातश्चेति सचचित्तस्य धर्मः वृत्तीनांचित्तधर्मत्वेनतन्निरोधरूपयोगस्यापितद्ध र्मत्वात् तस्यचित्तस्यपंचभूमयः क्षिप्तंमूढंविक्षिप्तमेका ग्रंनिरुद्धमिति रजसात्यंतंचलंक्षिप्तंदैत्यानां तमसानि द्रादिमन्मूढंरक्षसां क्षिप्ताद्विशिष्टंविक्षिप्तंदेवादीनां अत्यं तचलचित्तस्यकादाचित्कंस्थिरत्वंविशेषः तत्रक्षिप्तमूढ योर्योगगंधोपिनास्ति विक्षिप्तेतुचित्तेकादाचित्कोयोगः प्रचुरविक्षेपवन्हिदग्धोप्रतिष्ठितोनिष्फलोनयोगपक्षेव र्त्तते एकाग्रेतुसत्त्वप्रधानएकविषयास्थितेचित्तेरजस्त मोवृत्तिनिरोधःसात्विकवृत्तिविशेषःसंप्रज्ञातयोगोभव ति तेनशब्दानुमानाभ्यांपरोक्षत्वेनज्ञातार्थःसाक्षात्क्रि यते साक्षात्कारादविद्यादिक्लेशक्षयः ततःपुण्यपाप कर्मणांदाहः ततोऽसंप्रज्ञातोयोगः सात्विकवृत्तेरपिनि रोधःसंस्कारमात्रशेषेनिरुद्धेचित्तेभवति तदाहभाष्य कारः यस्त्वेकाग्रेचेतसिसद्भूत[1]मर्थंप्रद्योतयतिक्षिणोति चक्लेशान्कर्मबंधनानिश्लथयति निरोधमाभिमुखंकरोति ससंप्रज्ञातोयोगइत्याख्यायतइति ॥१॥ ॥

---

१ भूतमितिसमारोपितमर्थं निवर्तयति, निद्रावृत्तिरपि स्वालं बनेतमसि भूते भवत्येकाग्रेत्यतउक्तं सदिति शोभनं नितांताविर्भूतसत्वंतमःसमुद्रेकस्त्व शोभनस्तस्य क्लेशहेतुत्वादिति वाच०—यस्त्वेकाग्रे चेतसि वर्तमानोऽर्थं ध्येयं वस्तु सद्भूतं परमार्थभूतं प्रकर्षेण द्योतयति साक्षात्कारयति, अविद्यादीन्क्लेशा न्क्षिणोति ततोपिच कारणोच्छेदाद्धर्माधर्मरूपाणि बंधनानि बुद्धिपुरुषयोर्बंध कारणानि श्लथयति, अदृष्टोत्पादनाक्ष माणि करोति तथा निरोधमसंप्रज्ञात योगमभिमुखं प्रत्यासन्नंकरोति परवैराग्यजननेनेति विज्ञानयोगिनः.

श्री ... ग्रं ... श्री

# पातंजलयोगसूत्रम्

(व्याख्याभाषान्तरसमेतम्.)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

## अथयोगानुशासनम् ॥१॥

श्रीहरि रामचंद्र परमात्मा, जो, जीवांच्या संसाररूपीबंधास कारणीभूत जे पुढें सांगितलेले क्लेशकर्मादिक चित्तमल त्यां पासून अलिप्त, अनादि असा जो सर्वांतर्यामी आणि जगताला कारणीभूत सत्वादि त्रिगुणात्मिका मूलप्रकृतिरूपा जी सीता तिणें सेवित, योगशास्त्राचा आदिप्रवर्तक (ह्मणूनच) मुमुक्षु भक्तजनांस योगसिद्धि देणारा त्याला मी वंदन करितों ॥१॥ श्रीभगवान् योगसूत्रकार पतंजलि आणि भाष्यकार महर्षि वेदव्यास यांस परमभक्तीनें प्रणमन करून भाष्याच्या अनुसारें स्वबुद्ध्यनुसार (विद्वज्जनानीं) स्तुत्य अशी योगमणिप्रभानांवाची व्याख्या करण्यास आरंभ करितों ॥ २ ॥ आतांश्रीमान् योगशास्त्राचार्य पतंजलिमुनि याशास्त्रांत बुद्धिमान् लोकांची प्रवृत्ति व्हावी ह्मणून तिला साधनीभूत या(शास्त्रानें)कथनीय(योगरूपविषय) दाखवितात. येथें "अथ" शब्द ग्रंथाच्याआरंभाचा, द्योतन करणारा आहे, सानें आतां योगशास्त्राचा आरंभ केलाजातो आसा यासूत्राचा अर्थहोतो.

---

१मुख्यअधिकार्यत्व ह्मणजे आरभ्यमाणत्व योगालाच आहे, शास्त्र त्याचें प्रतिपादक ह्मणून त्याला अधिकार्यत्व गौण आहे; असें वाचस्पतिमिश्रांचें मत. व्यासभाष्यस्वरसावरून शास्त्रालाच मुख्यअधिकार्यत्व आहे असें विज्ञानभिक्षूंचें मत आहे.

आतां अनुशासन असें कां ह्मटलें तें सांगतों.

कोणी अशी शंका करील कीं, हिरण्यगर्भ जो ब्रह्मा त्यानें हें शास्त्र केलें असून पुनः तें करण्याचें प्रयोजन काय? (याचें उत्तर देतों) ब्रह्मदेवानें केलेलें तें शास्त्र फार मोठें आहे असें जाणून त्याच्याच अनुरोधानें ( संक्षिप्त ) हें शास्त्र केलें आहे; असें अनुशब्द सुचवितो ह्मणून अनुशासन असें सूत्रकारानें ह्मटलें आहे.

आतां या शास्त्रांतील अनुबंधचतुष्टय सांगतों.

याशास्त्रांत योग हा शास्त्राचा प्रतिपाद्य विषय आहे. अर्थात् त्याचा जिज्ञासु अधिकारी आहे. कैवल्य ह्मणजे मोक्ष हें योगाचें फल आहे. यातिहींचा व याशास्त्राचा प्रतिपाद्यप्रतिपादकभावादि संबंध यथासंभव जाणावा, ह्मणजे हें शास्त्र योगरूप विषयाचें प्रतिपादक(स्वरूपबोधक) व योग हा त्याचा प्रतिपाद्य तसें शास्त्र हें ज्ञेय व जिज्ञासु हा ज्ञाता यांचा ज्ञेयज्ञातृभावसंबंध आहे. तसेंच फल व शास्त्र यांचा प्राप्यप्रापकभावसंबंध जाणावा.

आतां योगाचे प्रकार सांगतों.

योग हा दोनप्रकारचा. संप्रज्ञातयोग व असंप्रज्ञातयोग हा योग चित्त ह्मणजे बुद्धिसत्व याचा धर्म आहे. कारण, वृत्ति ( ज्ञानें ) ह्या चित्तावरचे धर्म आहेत, ह्मणून त्यावृत्तींचा चित्तांत होणारा लय-ज्याला योग असें ह्मणतात–तोही चित्तावरचाच धर्म होय.

आतां चित्ताची अवस्था व त्याचीं उदाहरणें सांगतों.

क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र, व निरुद्ध अशा पांच चित्ताच्या भूमि ह्मणजे अवस्था आहेत. रजोगुणानें अस्थिर चल जें चित्त त्याला क्षिप्त ह्मणतात, तें उदाहरणार्थ दैत्यांचें जाणावें. तमोगुणानें निद्रालस्यादियुक्त जें चित्त त्याला मूढ अशी संज्ञा आहे, तें चित्त उदाहरणार्थ राक्षसांचें जाणावें. क्षिप्ताहून विशिष्ट ह्मण-

१ "योगाचा आदिप्रवक्ता ब्रह्मा हिरण्यगर्भ आहे दुसरा कोणी नाहीं;" असें योगी याज्ञवल्क्याचें वचन याला प्रमाण आहे.

जे कांहीं बरें जें देवपितृगंधर्वादिकांचें चित्त त्याला विक्षिप्त असें ह्मणतात. दैत्यांचें चित्त सदा चल असतें, परंतु देवादिकांचें एखादे वेळेस स्थिर होतें; हा ह्या दोहोंत भेद आहे. त्यामध्यें क्षिप्त व मूढ या दोहोंत तर योगाच्या लेशाचाही मुळींच संभव नाहीं. विक्षिप्त चित्तांत एखादे वेळेस ( जेव्हां तें स्थिर असतें ते व्हां ) योग संभवतो, परंतु त्याच्या ठायीं विक्षेपाचा अंश पुष्कळ असतो. त्या विक्षेप रूपी अग्नीनें दग्ध झाल्यामुळें तो योग अस्थिर व निष्फल होतो, ह्मणून त्यालाही योग म्हणतां येत नाहीं. सत्वगुणप्रधान व एकाच वस्तूच्याठायीं स्थिर जें चित्त त्याला एकाग्र ह्मणतात. त्यामध्यें रजस्तमोवृत्तींचा लय होऊन सात्विक वृत्तीचें आधिक्य झालें ह्मणजे त्याला संप्रज्ञातयोग ह्मणतात. त्या योगानें पूर्वीं शब्द व अनुमान या प्रमाणानीं परोक्ष असा ज्ञात झालेला अर्थ तो प्रत्यक्ष केला जातो. या साक्षात्कारापासून अविद्यादि क्लेशांचा क्षय होतो. तदनंतर पुण्यकर्में व पापकर्में दग्ध होतात. व तदनंतर असंप्रज्ञातयोग ह्मणजे वृत्तींचा संस्कार मात्र राहिलेल्या निरुद्ध चित्तांत ( शुद्धसत्वगुणात्मकांत ) या सात्विकवृत्तींचाही लय होतो तो जाणावा. भाष्यकारांनीं (व्यासानीं) ह्मटलें आहे कीं, ज्याच्या योगानें एकाग्र चित्ताच्याठायीं अनारोपित व शुद्धसात्विक अशा अर्थाचें तात्वि

१ भूतं हें पद आरोपित ह्मणजे विकल्पित अर्थाचें निवर्तन करितें. निद्रावृत्ति ही आपल्या विषयीं भूत अनारोपित तमामध्यें एकाग्रा होते ह्मणून सत् असें ह्मटलें सत् ह्मणजे शोभन, अत्यंत आविर्भूत सत्व. कारण तमाच्या अतिशयाला क्लेश हेतुता आहे ह्मणून तो अशोभन आहे; असें वाच०-जो एकाग्र चित्तांत राहून खऱ्या ध्येय वस्तूचें प्रकाशन करितो, अविद्यादि क्लेशांचा क्षय करितो, त्या कारणाचा उच्छेद झाल्यानें बुद्धि व पुरुष यांच्या बंधाला कारणीभूत, धर्माधर्मरूपबंधनें त्यांस अदृष्ट उत्पन्न

ज्ञानहोतें. जो अविद्यादि क्लेशांचा नाश करितो ह्मणूनच कर्मरूप बंधनांस शिथिल ( वंध्य ) करितो, ( चित्तवृत्तींस )लयाभिमुख करितो त्याला संप्रज्ञातयोग असें ह्मणतात ॥१॥

आतां दोन्हीं योगांचें सामान्यलक्षण सांगतात.

# योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥ २॥

चित्तामध्यें रजस्तमोवृत्तींचा लय होतो त्याला योग ह्मणतात[१]. रजस्तमोवृत्तींचा लय असें ह्मटल्यानें संप्रज्ञातयोगामध्यें जरी सात्विक वृत्ति असल्ये तरी त्याचेंही हें लक्षण होऊं शकतें ॥२॥

---

करण्यास असमर्थ करितो, तसें असंप्रज्ञात योगाला परवैराग्योत्पत्तीनें जवळ करितो तो संप्रज्ञात योग,

१ क्षिणोतीत्यादि पूर्वभाष्यानुसारानें क्लेशकर्मादि परिपंथित्व ( शत्रुत्व )हें निरोधाचें विशेषण द्यावें, ह्मणजे क्लेशकर्मादि शत्रुत्व विशिष्ट.- चित्तवृत्तिनिरोधत्व हें दोन्हीं योगांचें सामान्य लक्षण असें विज्ञा० शुद्धसत्व परिणामरूप जें चित्त त्याच्या ( परस्पर ) अंगांगिभावानें परिणामरूप होणाऱ्या ज्या वृत्ती त्यांचा निरोध ह्मणजे वहिर्मुखत्वें करून होत आलेला परिणाम त्याचा विच्छेद होऊन अंतर्मुखत्वें करून उलट परिणामानें आपल्या कारणांत ( चित्तांत ) लय तो योग, एकाग्रचित्त असतां बहिर्वृत्तिनिरोध होतो, निरुद्ध असतां सर्ववृत्तींचा व संस्कारांचा निरोध ह्मणजे लय होतो असा एकाग्र व निरुद्ध चित्तें यांच्या भूमींचा भेद आहे असें भोजवृत्तींत सांगितलें आहे.

१३ परब्रह्मांत सर्व कांहीं असून कांहीं एक नसल्याप्रमाणें तें केवळ अलिप्त आहे. ब्रह्मांड, हिरण्यगर्भ आणि माया, हेंच देहत्रय आहे. त्याहूनही तें वेगळें आहे ह्मणूनच त्याला देहत्रयातित ह्मणतात. स्वानुभव जाणणारे आहे म्हणूनच त्या परब्रह्मांस स्वसंवेद्य ह्मणतात.

१४ ईश्वर हा मायिक असला तरी तो परब्रह्माचा मायिक आहे तुमचा आमचा मायिक नाहीं. प्रधान हा राजाचा सेवक असला तरी तो प्रजेचा सेवक नाहीं. राजाची सर्व शक्ति त्याच्यांत असल्यामुळें त्या राजशक्तीस अनुलक्षून त्याला राजाप्रमाणेंच प्रजेनें वंद्य मानला पाहिजे. प्रधानकी सेवकार्थी असली तरी राजशक्ति खरी असते. तद्वत् ईश्वर मायिक असला तरी त्याच्यांतील परमेश्वरी शक्ति खरी असते. जरी ईश्वर मायिक असला तरी त्याच्यांतील परमेश्वरी शक्ति मायिक नाहीं. ती सत्यच आहे. वेदांनीं देखील ईश्वर ब्रह्मालाच परब्रह्मवत् मानलें आहे. फार तर काय, शिव, विष्णु आणि गणपती यांनां सुद्धां तुह्मीच साक्षात् ब्रह्म व परब्रह्म आहांत असें ह्मटलें आहे. ईश्वर मायिक ह्मणून काय मानावयाचा आहे ? अशी चूक होऊं नये ह्मणून हें सुचविणें भाग आहे. आपणास तोच मुख्य आहे व त्याच्या अवताराच्या देवताही तशाच मानल्या पाहिजेत. कैवल्यमुक्ति साधण्याचें जें मुख्य द्वार ईश्वर त्याला न मानून भागणारच नाहीं. न मानले तर सारे श्रम व्यर्थ जातील व कैवल्यमुक्तीची प्राप्ती न होतां उलटे व्यर्थ पातकांत पडून शिक्षा भोगावी लागेल हें खूप समजावें.

१५ बिंब मूळचें सत्य असतें; परंतु त्याचें प्रतिबिंब भ्रामक असत्य होतें. प्रतिबिंबाचीं प्रतिबिंबें एकापासून एक पुढें उमटत जातात तीं अनुक्रमें परावर्तन व प्रतिपरावर्तन अशीं भिन्नभिन्न प्रतिबिंबें होतात. तरी पुढच्या प्रतिबिंबास मागलें बिंबच ठरतें. ह्याच न्यायानें पुढचा सृष्टिक्रम प्रतिपरावर्तन प्रतिबिंबरूपी आहे. त्याला अनुक्रमें मागलें बिंब सत्य असेंच धरून चाललें पाहिजे. प्रतिबिंब हीच माया आहे व तिचाच विस्तार फार झाला आहे. तसा ईश्वराचा विस्तार मुळींच झाला नाहीं. तो केवळ परमेश्वरी चैतन्य सामर्थ्य मात्र धारण करून आहे; आणि तें तो चालकत्वार्थी लावीत आहे. हें ब्रह्मवृक्षाच्या वंशावळीवरून झटकर सर्वांच्या लक्षांत भरेल.

१६ परमेश्वर व ईश्वर आणि आदिमाया व महामाया याविषयीं बहूतकरून बरेंच उद्‌घाटन झाले. आतां महामायेच्या पोटभेदांचें व जीवादि तत्वांचें थोडें स्पष्टिकरण केलें पाहिजे.

( १ ) गुण, सगुण असे माहामायेचे दोन भेद आहेत. देह तेथून सारे गुण सगुण मायामिश्रित रूपीच आहेत. देहांत अदृश्यचालक चैतन्य जें आहे तेंच ब्रह्म आहे.

( २ ) अदृश्य निराकारी तथापि विकारी, असें जिचें लक्षण आहे तीच गुणमाया होय. अदृश्य लिंग देह व तदंगभूत तत्वें पुष्कळ आहेत (सत्व, रज, तम हे तीन स्वभाव ह्मणजे गुण तसेंच काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे षड्रिपु. अहंकार, जीव, मन, बुद्धी, चित्त, अंतःकरण, वृत्ति इत्यादि) अदृश्यपण विकारी अशा अनेक तत्वामिळून जो समूह लिंग देहाश्रित असतो त्या सर्व अदृश्य तत्वांना गुण मायिकत्व आहे. ह्मणूनच हिला गुणमाया असें ह्मणावें. हीं तत्वें जरी अदृश्य आहेत तरी तीं भ्रम व खेळ करणारीं आहेत.

( ३ ) आकाशादि पंचमहाभूतें हीं दृश्य साकार विकारी आहेत. अर्थात् तीं सगुणरूपीच ठरतात. व तीं मायोत्पादितच आहेत. त्यापेक्षां त्यांना सगुण माया ह्मणणें सहजच प्रशस्त ठरतें.

( ४ ) कर्मकर्तृत्वामुळें गुणमायेस, निः असा उपसर्ग लागून निर्गुण माया असा शब्द योजतां येत नाहीं. कारण, तशानें अर्थ निर्गुण दर्शकत्वार्थीच होतो. शिवाय सगुण दर्शकत्वार्थी मग काय योजावें? ही अडचण येते ह्मणून एक सगुण तर दुसरी नुसती गुण एवढेंच कायम ठेवले आणि अदृश्य विकारी मायेस, गुणमाया व दृश्य विकारी मायेस, सगुण माया ह्मणावें असें ज्ञात्यांनीं ठरविलें.

( ५ ) आतां दोघी मायांची कामे कोणची. पंचभूतोत्पादित दृश्य जड साकार विकारी असे देहघट तयार करणें हें सगुण मायेकडे कर्तव्य आहे आणि तसे देहघट तयार झाले ह्मणजे त्यांत अदृश्य लिंगदेह ( तदंगभूत तत्वांसहित ) ठेवणें हे गुण मायेकडे कर्तव्य आहे.

( ६ ) दोघी मायेकडून इतकी तयारी झाली ह्मणजे तशा देहघटांत चैतन्य

शक्तीसहित प्रतिबिंबद्वारें प्रवेश करणें व जीवात्मा स्थित करणें इतकें ईश्वराचे कर्तव्य आहे असा माया व ईश्वराचा संयोग होऊन देहीं जीव तयार होतो. वस्तुतः गुणसगुण मिळून माया ही एकच आहे. लक्षण व कर्मभेदानें एकीस दोन नांवें देणें भाग झालें. इतक्या विचारकर्तृत्वासाठीं तरी ज्ञात्यास तिनें प्रथमतः भ्रमांत पाडलें. कोठेंही कांहीं मोठ्या दक्षतेनें करा तथापि भ्रम होणें चुकत नाहीं. ह्मणूनच ॥ मम माया दुरत्यया ॥ असेंच श्री कृष्णांनीं सांगितलें आहे.

( ७ ) जीवास राहण्यास स्थान पाहिजे ह्मणून शरीर व शरीराची क्रिया चालविणारा कोणी तरी पाहिजे ह्मणून जीव असा उभयतांचा संयोग आहे. संयोग आहे त्या अर्थी वियोगही होतो, व झालाच पाहिजे. वियोग हेंच मरण आहे. वियोगरूपी मरणाचे प्रस्थान उत्पत्ति कालींच ठेवलेले आहे. उत्पत्ति आणि लयाचा मधलाच काल कायतो स्थितीचा व तेवढाच कायतो जीवाला सुखदुःख भोगण्याचा वेळ आहे. स्थितीकालांत देहाचें सोंग जगत् नाटकांत नाचवून देहप्रेत टाकून जीव चालता होतो. असे ईश्वरी नाटक कल्पारंभापासून कल्पक्षयापर्यंत चालावयाचे आहे.


( ८ ) देहांत सचैतन्य जीवात्मा स्थित असेपर्यंत कायतो देह बिऱ्हाड गृहाचा जीव हा मोठा अभिमान वागवितो आणि मी व माझें असें घोकतो, परंतु तोच देह त्यागून जातो तेव्हां तो अभिमान केवळ वृथा होता असें अन्य जनास मात्र वाटतें पण ते तरी तसलेच आहेत.

( ९ ) बुडबुडे उदकाचेच असतात परंतु उत्पत्ती स्थितीनें ते उदकाहून भिन्न भासतात, तथापि लयानें पाणीच होते तद्वत् देह आहेत ते इंद्रधनुवत् आहेत. पाहूं गेलें तर पंचमहाभूताहून अन्य कांहीं नाहीं. आंतील चैतन्य तेवढें खरें आहे. ह्याच न्यायानें ब्रह्म तेवढें सत्य, बाकी सर्व मिथ्या. असेंच ठरतें.

( १० ) ब्रह्माधिष्ठानावर पंचभूतात्मक माया वैचित्र्यें इंद्रधनुवत् देहादि आकारी वगैरे उमटतात व कांहीं काल राहून नष्ट होतात. जीव, जगत्, ईश्वर, यांचा परब्रह्माशीं संपर्क नाहीं. दृश्यांत अदृश्य, मुर्तांत अमुर्त असा संयोगानें सगुणांत निर्गुण आहे इतकें जाणले तर पुरे आहे. रेतबिंदुचा पुरुष होतो हे मायावी जगत् गारुड आहे त्याला भुलूं नये. हेंच मायेचे निरसन करणें आहे. माया हिच द्वैतकारक आहे. तिचे निरसन झाले ह्मणजे अद्वैत परब्रह्म ह्याचा बोध होतो.

१७ इतकी स्पष्टता ओंव्यांनीं होऊं शकत नाहीं ह्मणून असें स्पष्टिकरण केलें. आतां आणखी व्यक्ततेसाठीं ब्रह्मवृक्ष वंशावळही दर्शवितो ह्मणजे कोणापासून कोण निघाले हें लक्षांत येईल.

**ही ब्रह्मवृक्ष वंशावळ.**




तीन गुणांच्या तीन सशक्तिक देवता ईश्वरावताराच्या आहेत. यांनांच सगुण ब्रह्म ह्मणतात. पुढें अनंत रूपानी सृष्टि झाली.

१ वेदांतज्ञानासारखें अतीशय सूक्ष्म ज्ञान व कल्पना कशांतच नाहींत.
२ वेदांतज्ञान वाचाळपणासाठीं नाहीं. तें केवळ अनुभवण्यासाठीं आहे.
३ श्रद्धाभक्ति शुद्ध भाव याचाच भोक्ता परमेश्वर आहे. तर्कटाचा नाहीं.
४ सज्ञान सप्रेम भक्ती व निष्कामोपासना करून फल ब्रह्मार्पण करावें.
५ सद्भावना व निष्कामोपासना खात्रीस पटल्यावांचून साक्षात्कार नाहीं.
६ साक्षात्कार गुप्त राखूनच ईश्वरानंदाचा अनुभव भोगावा लागतो.
७ गुप्तताच ईश्वराला अत्यंत प्रिय आहे व त्याचें वर्तन तसेंच आहे.
८ साक्षात्कार प्रगट केले तर अपात्रता ठरते व पुढें साक्षात्कार बंद पडतात.
९ ज्ञानविवेचनावांचून व साधुसंगतीवांचून वृत्तीची शुद्धि होत नाहीं.
१० दुष्कर्माचरण व दुष्टभ्रष्ट संगतीनें तशीच वाईट बुद्धि सहज होते.
११ देहबुद्धि, जीवबुद्धि आणि आत्मबुद्धि अशा तीन दृष्टीनें जग पहावें.
१२ अंतर्मुख झाल्यावांचून ज्ञानचक्षू फुटत नाहींत, जग बहिर्मुखच आहे.
१३ अहिंसक, अपीडक, नीर्लोभ, शांत, दया, क्षमा, निरभिमान असें राहावें.
१४ सत्य, असत्य, जड, अजड, सुख, दुःख आणि सत्य आनंद यांचे विवेचन असावें.
१५ मी व माझें सोडून नाटकाचारार्थी प्रपंच करावा. आसक्ती धरूं नये.
१६ सत्य मानण्यानें व्यसनाप्रमाणें आसक्ती जडते. सत्य एक परब्रह्म.
१७ देहक्षेत्राचा क्षेत्रज्ञ कोण याचा विचार केल्यावांचून आत्मज्ञान नाहीं.
१८ जगांत ज्याचा तो एकटा. कोणाचे कोणी नाहीं. नाते वृथा आहे.
१९ कुटुंबपोषणार्थ केलेल्या पातकास कुटुंबी जन वाटेकरी होत नाहींत.
२० षड्रिपु जिंकणारा तोच शूर. भूतमात्रीं दया तोच खरा दाता होय.
२१ सत्य व स्पष्ट वक्ता तोच पंडित. ब्रह्मीं रत होणारा तोच धन्य होय.
२२ अंतःकरण ज्याचें शुद्ध तोच अंतर्बाह्य शुद्ध. इतर अशुद्ध.
२३ विवेकी अंतःकरण नेहमीं सत्य असेल तेंच सुचवतें ह्मणून त्याविरुद्ध वर्तूं नये.
२४ अंतःकरणाविरुद्ध वर्तणें हीच ईश्वराची आज्ञा मोडणें होय.
२५ एका चुकीनें सारा हिशेब जसा जागोजागीं नासतो. सुधारणें कठीण होते तसेंच चुकीने कर्म प्रारब्ध भोगणें मागे लागतें.
२६ चुकीनें व अविचारानें फार तर काय पण मानवज्ञानी देहही व्यर्थ होतो.
२७ पापपुण्य कर्माचा नित्य झाडा पाहाणें हाच वृत्तीच्या पात्रतेचा आधार आहे.

२८ द्वैत भासास कारण मायाच आहे. तिचें निरसन करून अद्वैत व्हावें.
२९ परब्रह्म अद्वैत अद्वितीय आहे. माया द्वैत अनंतरूपी आहे.
३० अशा मायागारुडांत न भ्रमतां, अद्वैतानंदीं परब्रह्मीं रत व्हावें.

---

## ॥ ओंव्या ॥

॥ ० हा कालपर्यंत, ग्रंथाची ॥ ० तैशी सुश्रुषा, गुरुजींची ॥
॥ ० केली अपेक्षा, वाचावयाची ॥ ० ग्रंथारंभ, करीन कीं ॥ १ ॥
॥ ० जिवशिव ईश्वर, जगत् मोह ॥ ० अलीकडचें हें, ब्रह्मांड गेह ॥
॥ ० तयाचा परब्रह्मीं, नसे स्नेह ॥ ० अद्वैतानंद, तेथेंच कीं ॥ २ ॥
॥ ० परब्रह्माचा, मूलाधार ॥ ० सावर नटले, गोलाकार ॥
॥ ० ब्रह्मांड रचना, असत्य अपार ॥ ० तिकडे लक्ष्य, देऊं नये ॥ ३ ॥
॥ ० सत्यअसत्य, जडअजड ॥ ० दृश्य अदृश्य, यांची गडवड ॥
॥ ० विवेकाविणें, वृथा वडवड ॥ ० करणेंची व्यर्थ, होईल कीं ॥ ४ ॥
॥ ० माया अविद्येतें, जाणुनी ॥ ० गुरुखुणा अंतरीं, घेऊनी ॥
॥ ० वर्तेन तैसा, शरण होऊनी ॥ ० मुकुंदराया, तुजपाशीं ॥५ ॥
॥ ० भक्तीच, ज्ञानाची, माउली ॥ ० त्यांत ही, गुरुकृपेची साउली ॥
॥ ० ऐशाच योगें, पामरें पावलीं ॥ ० मुक्तिलाभा, पर्यंत ॥ ६ ॥
॥ ० मी व माझें, वृथा ह्मणणें ॥ ० देहही अपुला, नचि मानणें ॥
॥ ० प्रपंचाचा, भारही वाहाणें ॥ ० नाटकाचारें, बाहावाकी ॥ ७ ॥
॥ ० प्रपंच केला, जरी नित्य ॥ ० तरी आठवावें, ब्रह्म सत्य ॥
॥ ० प्रपंचीं असे, सारें असत्य ॥ ० वृथा केवळ, सुखदर्शी ॥ ८ ॥
॥ ० एक मरतो, दुजा क्षोभतो ॥ ० तोही मरतो, सर्व सांगितो ॥
॥ ० वैभवातें, भलताच भोगितो ॥ ० कायेस वृथा, शीण हा ॥ ९ ॥
॥ ० बाह्य असक्ति, दर्शवावी ॥ ० अंतरीं, असक्ति नसावी ॥
॥ ० ऐशी निर्लोभता, राखावी ॥ ० तोचि पावे, दोन्ही अर्थ ॥ १० ॥
॥ ० ऐहिकार्थी, शब्द स्वार्थ ॥ ० तैसाचि पारलौकिकीं, परमार्थ ॥
॥ ० ज्ञानें जाणी, जो दोन्ही अर्थ ॥ ० तोचि धन्य, पुरुषार्थी ॥११॥
॥ ० सार्थ वाचनें, ओंव्या पाठ ॥ ० होती अठवती, पाठोपाठ ॥

॥ ° तत्वार्थ स्मृती, लागोपाठ ॥ ° ब्रह्म सर्वांगीं, बाणेल कीं ॥ १२ ॥
॥ ° ऐसे होतां, ब्रह्मरूपीं ॥ ° तादात्म्यानें, स्वस्वरूपीं ॥
॥ ° होतां लीन, हीच कुपी ॥ ° परमामृताची, लाभेल कीं ॥ १३ ॥
॥ इति श्री परमामृते अल्पज्ञ शिष्यविरचिते पूर्व पिठिकार्थे सत्पात्रता प्राप्त्यर्थे ज्ञानाभिज्ञजन वाचकार्पणमस्तु ॥ ब्रह्मार्पणमस्तु ॥

---

## ॥ कठिण, जुनाट व अप्रसिद्ध शब्दांचा तांत्रिक कोश ६ ॥

सूचना—कोशांतील शब्दार्थ लक्षांत ठेऊन पुढील ग्रंथ वाचावा.

### अ.

**अपरोक्ष**—प्रत्यक्ष, समक्ष, परोक्षः ह्न.
**अप्रत्यक्ष**—न पाहिलेले. कांहीं लोक हे शब्द उलट अर्थी योजतात तो अविचार आहे. पहा मोलेस्वर्थ कोश पाने ३४ व ३९४.
**अविद्या**—अज्ञान, मूर्खत्व.
**अर्धमात्रा**. ॐ ह्यांतील हें ँ चिन्ह.
**अधिष्ठान**—मूलाधार.
**आधि**—मानासिक दुःख ( आधिव्याधि )
**आसीत्**—आहेस ( त्वं तत्वमसीत्. )
**आभासन**—मिथ्या, वृथा, खोटा भास.
**उपाधि**—उपद्व्याप, उपद्रव.
**उहापोह**—वाटाघाट, खल, चर्चा.
**उन्मन**—अंतःकरणापासून मन निघून ईश्वराकडे लागणें किंवा तल्लीन होणें.

### क.

**कडसणी**—सूक्ष्म विचार, बद्धता, कांचणी.
**कर्मातीत**—कर्मापासून अलिप्त.
**कुर्वंडी**—ओंवाळून टाकणें.
**कैवल्य**—परब्रह्म मुक्तिस्थान.

### च.

**चराचर**—जंगम, स्थावर.
**चतुर्विधवाचा**, परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी हे वाणीचे चार प्रकार.
**चिदाभास**—ईश्वरी बुद्धी. चित्ताभास.

### ज.

**जाणीव**—सज्ञानपण. नेणीव ( अजाणपण ) मध्यम ( जाणणें न जाणणें ).

### त.

**तुरिया**—साक्षवृत्ती, ताटस्थते प्र.
**त्रिपद्**—त्वं, तत्वं, आसीत् हीं तीन पदे.

### न.

**निःसंग**—संपर्करहित.
**निरंजन**—निर्लेप, निर्धूत, अलिप्त.
**निरालंब**—स्वतंत्र, स्वाश्रयी.
**निर्वाण**—शेवटचे, अखेरीचे.
**निरसन**—निवृत्ती, नाहींसें करणें.
**नुरे**—न उरे, कांहीं न उरणें.

### प.

**परमपुरुप**—परब्रह्म परमेश्वर.

**परापरा**–परा (माया) अपरा (स्फुर्ति).
**प्रत्यगात्मा**–देहस्थित परमात्मा.

**म.**

**महावाक्य**–त्वं तत्वमसीत् हें.
**मुमुक्षु**–मोक्षेच्छु.

**व.**

**विश्वतैजस**–विराट, शबलमिश्र ब्रह्म.

**स.**

**समस्या**–कवितेंतील अपूर्तता.
**सांकडी**–कर्माची कोंडी.
**स्वसंवेद्य**–स्वानुभावानें जाणणें.

**क्ष.**

**क्षराक्षर**–चर अचर, चैतन्य, जड

**ज्ञ.**

**ज्ञप्ती**–निर्विषय स्वरूपात्मक सत्य असें जें ज्ञान तें.

## ॥ प्रकरण १ ॥

### ॥ अथ मंगलाचरण गुरुस्तवन प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ ॐ नमोनमोश्री, सद्गुरुनाथा ॥ तूंचि परम, प्राप्तिदाता ॥
॥ कृपासिंधु, केवळ, समर्था ॥ अनंत अपारा, तूंचि असे ॥ १ ॥
॥ तूं आनंदमये, स्वयं प्रकाश ॥ कैवल्यदाता, परम ईश ॥
॥ तूं निजरूपें, अविनाश ॥ निराकारी, निर्विकार ॥ २ ॥
॥ तूं निःसंग आणि, निरंजन ॥ तूं निरंतर, असन्नी, अभिन्न ॥
॥ नाहीं तुझिया, समसमान ॥ कोणी नसे, परमात्मा ॥ ३ ॥
॥ तूं जव पूर्ण, कृपा करिशी ॥ तव संसारबंधना, तोडिशी ॥
॥ अविद्येपासुनि, सोडविशी ॥ त्राता तूंची, सर्व जीवा ॥ ४ ॥
॥ न होईजे देवा, आसुरा ॥ तें तुझेचि करणें, अपारा ॥
॥ समर्थ न, देखो मी दुसरा ॥ तुजवांचोनी, कोणीहि ॥ ५ ॥
॥ आणिका कोणा, नमस्कारूं ॥ कवणाचें तरी मी, स्तवन करूं ॥
॥ जयजयाजी, श्री गुरू ॥ अगाध महिमा, तुझाचि ॥६ ॥
॥ जैसा पटांत, एक तंतु ॥ तैसा विश्वीं तूं, सर्वभरितु ॥
॥ सर्व व्यापुनि, विरहितु ॥ केवळ अलिप्त, असाचि तूं ॥ ७ ॥
॥ दाविशीं अनेक, सगुणरूपें ॥ धरिशीं तूं ती, उपाधिव्यापें ॥
॥ शिवशक्त्यादि, साकाररूपें ॥ सर्वत्र तूंची, अनंता ॥ ८ ॥
॥ तुजविण अन्य, नसे कोणी ॥ ह्मणुनच अन्यातें, मी न मानी ॥
॥ हा माझा मस्तक, तुझिये चरणी ॥ ठेविला असे, सत्यदेवा ॥ ९ ॥
॥ तूं शुद्धात्मा, आणि, स्वयंज्योती ॥ तुझीच सर्वत्र, ज्ञानदीप्ती ॥
॥ नमोनमोश्री, गुरूमूर्ती ॥ आनंदवैभवीं, प्रविष्ट कीजे ॥ १० ॥
॥ ब्रह्मारूपें, उत्पत्ती करिशी ॥ विष्णुरूपें, प्रतिपाळिशी ॥
॥ रुद्ररूपें, संहारिशी ॥ पुनरपि ऐसे, चराचरा ॥ ११ ॥
॥ तूं सर्वसाक्षी, आणि सर्वज्ञ ॥ तूं सर्व विद्या, विद्प्राज्ञ ॥
॥ तूंचि तत्वार्थ, निश्चयेंकरून ॥ सर्वेश्वर, ह्मणती तया ॥ १२ ॥
॥ तूंचि जाणशी, स्वस्वरूपाशी ॥ ह्मणोनीच जाणीव, स्फुरविशी ॥
॥ परमात्मा, ऐसें, ह्मणविशी ॥ आदिकारण उपाधींचे ॥ १३ ॥

॥ तुझिये इच्छेचा, विस्तारू ॥ ह्मणोनीच, विस्तरलें, चराचरू ॥
॥ हिंसक जीव, असंख्य अपारू ॥ ° सर्वांमाजी, स्फुरद्रूप तूं ॥ १४ ॥
॥ सर्व जीवांची, ज्ञप्तीकळा ॥ ° विचारद्वारें, जाणें सकळा ॥
॥ तोचि ज्ञानात्मा, जिव्हाळा ॥ त्वंपदाचा, तूंचि अर्थ ॥ १५ ॥
॥ ° नेमकर्माची, सांकडी ॥ ° संदेहीं गुंतली, बापुडी ॥
॥ ° तीं कैशी जातील, पैलथडीं ॥ ०भव्यभवत्वीं, भवसागरीं ॥ १६ ॥
॥ माया अविद्या, संबंधें ॥ जीव ईश्वर, होती भेदें ॥
॥ हाही तुझाची, विनोदें ॥ ° खेळ तुझा हा, नाटकी ॥ १७ ॥
॥ तूं स्वानंदवासी, सदोदित ॥ आसीत् पदीं केवळ अलिप्त ॥
॥ तरी दाविशीं, सर्वदा लिप्त ॥ ° चराचरीं, वृथापरी ॥ १८ ॥
॥ ऐशी करितां, तुझीये स्तुती ॥ ° हात टेकिती, वेदश्रुती ॥
॥ मी पामरें, प्राकृत किती ॥ वर्णावयाशीं, तुज योग्य ॥ १९ ॥
॥ तूं प्रेमभरित, परम पुरुष ॥ चतुर्विधवाचेचा केवळ ईश ॥
॥ देई मजलागीं, मतिप्रकाश ॥ तुजकारणें, जाणावया ॥ २० ॥
॥ तूं कृपासिंधू, वरद होशी ॥ तरि मग, मुक्तीच्या लाभाशीं ॥
॥ ° वेळ न लागे, ज्ञानाशीं ॥ ° हेंचि सत्य, मीं जाणतसे ॥ २१ ॥
॥ ह्मणोनि विनवीं, शरणागत ॥ ज्ञानप्रभा करावी, मज उदित ॥
॥ ° अविद्या जाय, क्षणमात्र ॥ ° तेणें तुजशीं जाणेन मी ॥ २२ ॥
॥ यावरि झाले, गुरु प्रसन्न ॥ करविती, परमार्थाचें कथन ॥
॥ बोलूं सहजी, शास्त्र मंथन ॥ निर्वाणतेंची, जाणोनी ॥ २३ ॥
॥ ०प्रथम प्रकरणीं, मंगलाचरण ॥ ° करूनि वंदिलें, तुझिये चरण ॥
॥ ° जीवन्मुक्तपणाचें मरण ॥ ° द्यावे मजला, सत्वरी ॥ २४ ॥
॥ ° देह जगाची, होवो विस्मृती ॥ ° राहो एक, तुझीच स्मृति ॥
॥ ° ऐशी वदे, श्रुति स्मृति ॥ ° तोचि लाभ मज देई ॥ २५ ॥

॥ इति श्री परमामृते, मुकुंदराजविरचिते, मंगलाचरण गुरुस्तवन नाम, प्रथम प्रकरण संपूर्ण ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या २३ } शिष्याच्या नवीन ओंव्या ३
शिष्यानें समस्या पूर्ण केल्या १० } १६।२४।२५ वी.

# ॥ प्रकरण २ ॥

## ॥ अथ अन्य पाखांडमतखंडण प्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥
॥ सर्व जाणोनी, सर्व कीजे ॥ तत्व सर्वदा, अभ्यासिजे ॥
॥ तेथें चित्तें करोनी, राहिजे ॥ बुडी देवोनी, सदोदित ॥ १ ॥
॥ अभ्यंतरीचें, तेंचि ज्ञान ॥ प्रशस्त बोलेन, तें साधन ॥
॥ जेथें रंजले, योगीजन ॥ ०अक्षयानंदी, निरंतर ॥ २ ॥
॥ जैसें सागरींचें, अमृत ॥ पय मंथूनि, जैसें नवनीत ॥
॥ काढिलें तैसें, सर्वांत ॥ ०सार तेंची, सांगेन कीं ॥ ३ ॥
॥ न लगे याहूनि कांहीं करणें ॥ नानापरिचीं, अभ्यासनें ॥
॥ संकल्प, विकल्पात्मक, साधनें ॥ सर्वथैव, सांगिजे ॥ ४ ॥
॥ संकल्प विकल्पी, द्वाड मतें ॥ नाना गोंधळें, कष्टचि तें ॥
॥ महावाक्याचें, विवरण चित्तें ॥ ०अनुभविलें नाहीं, जोंवरी ॥ ५ ॥
॥ जो, केवळ, निरुपाधि, स्वरूप ॥ अनुभव न कळे, आपोआप ॥
॥ तोंवरि कष्टाचेंची, माप ॥ कवण्या प्रेमें, करावें ॥ ६ ॥
॥ व्रत तप नेमाच्या, सांकडीं ॥ मानवें गुंतलीं, बापुडीं ॥
॥ तीं कैशी पावतील, पैलथडीं ॥ संसार, सागरोदकीं पै ॥ ७ ॥
॥ पूजा, स्नानें, तीर्थें, दानें ॥ मंत्र, तंत्र, योग, हवनें ॥
॥ तेणें तितुकेंचि, फळ भोगणें ॥ स्वर्गादिक, सर्वहीं ॥ ८ ॥
॥ जप तप आणि, अनुष्ठानें ॥ नाना परिचीं, अन्य साधनें ॥
॥ न मोक्ष विना, आत्मज्ञानें ॥ ०करोनि कर्में, सर्वदा ॥ ९ ॥
॥ जोंवरि जीवेश्वर, उपाधी ॥ निरसुनि जाणिजे, ऐक्यसिद्धी ॥
॥ भेद सांडुनी, शबल विरोधी ॥ तरी न प्रकाशे, शुद्ध तत्व ॥ १० ॥
॥ त्वं पद तत्पदींचें, लक्षण ॥ शबल सांडोनी, परोक्षण ॥
॥ जाणिल्या वांचुनी, परोक्ष ज्ञान ॥ तोंवरी मोक्ष, कैसा पै ॥ ११ ॥
॥ जोंवरि तो एक, मी एक ॥ हा न तुटेचि, महत् भेदक ॥
॥ तोंवरि न प्रकाशे, सम्यक ॥ ०परब्रह्म, परमात्मा ॥ १२ ॥
॥ जोंवरि त्रिपद, शोध न वडे ॥ अर्ध मात्रेहूनी, न सांपडे ॥
॥ क्षराक्षर निवाडा, नाचि घडे ॥० परम पुरुषीं, तो अंध ॥ १३ ॥

॥ सच्चितानंदाचें, विवरण ॥ जोंवरि नेणिजे, कार्य कारण ॥
॥ न चि निवळे, शुद्धात्मज्ञान ॥ तोंवरि मोक्ष, कैसा पै ॥ १४ ॥
॥ सद्गुरुमुखें, वेदांत श्रवण ॥ केला न घडे, त्याचें मनन ॥
॥ तैसेंचि न केलें, निदिध्यासन ॥ तोंवरि मोक्ष, कैसा पै ॥ १५ ॥
॥ सांडोनि वेदांत, सिद्धांत ॥ जे का बोलती, पाखांडमत ॥
॥ त्याची न ऐकावी, मात ॥ ०महावाक्यार्थी, नानुभवी ॥ १६ ॥
॥ वेद बोलिले, सृष्टिक्रम ॥ पाहोनि ते ही, सकल धर्म ॥
॥ वेदांताचें, गुप्त वर्म ॥ ०अनुभवावे तें, गुरुमुखें ॥ १७ ॥
॥ वेदांताचें, गुह्य बोलणें ॥ सिद्धांतीच जाणो जाणे* ॥
॥ त्याशींच तत्व, खुणा मिळणें ॥ ऐसेंचि ज्ञान, कैवल्याचें ॥ १८ ॥
॥ जिव शिव ईश्वराची, दोरणी ॥ अखंड अभेद, कडसणी+ ॥
॥ तेंच तत्वज्ञान, निर्वाणी ॥ अद्वैत ब्रह्म, पलीकडे ॥ १९ ॥
॥ ०अनुभवाविणें, नुसतें ब्रह्म ॥ ०ह्मणणें केवळ, शब्दीं ब्रह्म ॥
॥ ०मोक्षीं, परोक्ष ज्ञानें, जें ब्रह्म ॥ ०तेंचि जाणा, कैवल्य ॥ २० ॥
॥ इति श्री परमामृते, मुकुंदराजविरचिते, अन्य पाखांडमतखंडणं नाम द्वितीय प्रकरणं संपूर्ण ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु. ॥

| | |
|---|---|
| मुकुंदराजांच्या ओंव्या १९ | शिष्याची नवीन ओंवी १ |
| शिष्यानें समस्या पूर्ण केल्या १० | शेवटची २० वी |

* एकादे गुप्त स्थल दोघांनीं पृथक् पृथक्पणें पाहिलें असलें किंवा तेथील अनुभव घेतलेला असला; तर ते उभयतां सांकेतिक खुणा मुद्रांनीं किंवा शब्दांनीं थोडक्यांत खुणा पटून सत्वर खुबी समजतात. तें त्यांचें हृद्गत तिसऱ्याला कळत नाहीं. तद्वत् ब्रह्मानुभव सिद्धांतीच अपिआपणांत समजतात.

+ जिव शिव ईश्वर यांचा ब्रह्माशीं अखंड अभेद आहे हें ब्रह्मवृक्षावरून दिसेल. प्रत्येक जीवाचा ईश्वरद्वारें ब्रह्माशीं तंतु पोंचतो.

## ॥ प्रकरण ३ ॥

### ॥ अथ महावाक्य विवरणप्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥

॥ करूनि आदि शक्तीचा, अंगिकारू ॥ करी जो उत्पत्ति, स्थिति संहारु ॥
॥ जो सर्व साक्षी, सर्वेश्वरू ॥ तोचि शवल, बोलिजे ॥ १ ॥
॥ स्थूल दृष्टीचें, जाणणें ॥ तितुकेही तें, निरसणें ॥
॥ उरे अदृश्य, तें ओळखणें ॥ तोचि शुद्ध, परमात्मा ॥ २ ॥
॥ सर्वज्ञ आणि, सर्वेश्वरू ॥ ऐसा वेदशास्त्रीं, निर्धारू ॥
॥ तोचि जाणिजे, परात्परु ॥ कैवल्य तोचि, ज्ञप्तिमात्र ॥ ३ ॥
॥ अनंत शक्तीचा, जो द्रष्टा ॥ स्थान मान नसे, प्रतिष्ठा ॥
॥ जो अपरिमिता, घनदाटा ॥ तोचि जाणा, परब्रह्म ॥ ४ ॥
॥ तया बोलिजे, शुद्धब्रह्म ॥ विराट शवल, मिश्र ब्रह्म ॥
॥ ज्ञान घनानंद, शुद्धब्रह्म ॥ तोचि जाणा, परमेश्वर ॥ ५ ॥
॥ ब्रह्मांड हिरण्य, गर्भमाया ॥ याहूनि वेगळा, देहत्रया ॥
॥ पुरुष प्रकृती, आदिमाया ॥ याहूनि विलक्षण, असे जो ॥ ६ ॥
॥ उत्पत्ति स्थिति, आणि संहारु ॥ सर्वचि साक्षित्व, व्यवहारु ॥
॥ इतुक्या अवस्थातीत, जो अपारू ॥ ऐसाचि स्वयें, असे जो ॥ ७ ॥
॥ ब्रह्मा विष्णु आणि रुद्र ॥ चवथा त्यावरी, ईश्वर ॥
॥ माया स्फुर्तीहुनी, वेगळा अपार ॥ परब्रह्म, ह्मणती जया ॥ ८ ॥
॥ ऐशिया परीं, नीट पाहतां ॥ निष्कर्दम जो, अविद्या, विरहिता ॥
॥ सदां सर्वदां, कर्मातीता ॥ तोचि जाणा, परब्रह्म ॥ ९ ॥
॥ स्थूल सूक्ष्म देह, कारण ॥ चवथा असे, महा कारण ॥
॥ जागृत् स्वप्न, सुषुप्ती जाण ॥ तुरिया चवथी, असे कीं ॥ १० ॥
॥ विश्व तैजस, सर्व प्राज्ञ ॥ प्रत्यगात्मा, तो सर्वज्ञ ॥
॥ हे अभिमान, सर्वथा संज्ञ ॥ शवलार्थीच, जाणावे ॥ ११ ॥
॥ ह्या इतुकियाचाही, जो द्रष्टा ॥ अलिप्त राहोनी, होती चेष्टा ॥
॥ सर्वाधिष्ठान, दातृत्व प्रतिष्ठा ॥ ऐसेचि लक्षण, जयाचें ॥ १२ ॥

---

सूचना—ब्रह्मवृक्ष वंशावळ लक्षांत असली तर देहांत ज्ञानप्रकाश नीट होतो.
॥ त्वंतत्वमसीत् ॥ हें महावाक्य आहे. तूंच ब्रह्मतत्व आहेस असा याचा अर्थ आहे.

॥ शबल केवल, वाच्य पक्ष ॥ शुद्धार्थी ठेवावें, पूर्ण लक्ष्य ॥
॥ लक्षीं ऐक्य, तेथेंचि मोक्ष ॥ जिव शिव सृष्टी, जुरेचि ॥ १३ ॥
॥ उभय नयनीं, एकदृष्टीं ॥ दोन्ही श्रवणीं, नादेष्टी ॥
॥ ओष्ठ जुळती, अधर पुटीं ॥ द्वैताद्वैतीं, ऐक्यता ॥ १४ ॥
॥ ऐक्य अनैक्यार्थी, विवरण ॥ करावे जीवेश्वर, निरसन ॥
॥ शुद्ध लाभेल तेणेंचि करून ॥ अद्वैत मुक्ती, परब्रह्मीं ॥ १५ ॥
॥ जैसे महदाकाश, अखंड पूर्ण ॥ घटपटीं मात्र, दिसे तें भिन्न ॥
॥ तयासारिखें, ज्ञान जाण ॥ ०परब्रह्म, तसेच कीं ॥ १६ ॥
॥ ते घटपट दोन्हीं, भंगता ॥ ठायींचेचि ठायीं, तत्वैक्यता ॥
॥ जिव शिव ईश्वर, निरसतां ॥ ०परब्रह्म, एक असे ॥ १७ ॥
॥ जिव शिव जग व ईश्वर ॥ माया अविद्या, कर्दमाचर ॥
॥ परब्रह्मीं नसे तें, साचार ॥ तेथेंचि रिझावें, आनंदीं ॥ १८ ॥
॥ कर्दमी मायेशीं, पाहतां ॥ मन हें गोंधळतें सर्वथा ॥
॥ नासकें टाकोनि, जाणीं तत्वता ॥ अखंड सत्य, ब्रह्मास कीं ॥ १९ ॥
॥ ऐसे महावाक्यातें, विवरणें ॥ त्वं पद तत्पद, शोधणें ॥
॥ आसीत् पदीं, पावणें ॥ ०हाचि अंत ज्ञानाचा * ॥ २० ॥
॥ ह्मणोनि सत्य, ज्ञानेविण ॥ सर्व मतें, भेदक जाण ॥
॥ मायिक सर्वथा, वृथा भासन ॥ त्यागावें तें, क्षणोक्षणीं ॥ २१ ॥
॥ ०मिथ्या माया, इंद्रधनु ॥ ०उपजे निपजे, असतां भानु ॥
॥ ०लया पावे, सत्यचि मानू ॥ ०नको सृष्टी, ऐशीच ही ॥ २२ ॥
॥ ०खोटा नासका, वृथा भास ॥ ०मोहे होतो, परम त्रास ॥
॥ ०ज्ञान्याविणें, सर्वत्रास ॥ ०मोक्ष सौख्य, कदा नसे ॥ २३ ॥
॥ ०माया ईश्वराशीं, मोहित ॥ ०करिते यत्नें, नित्य सतत ॥
॥ ०साधुसंतांची ती, सवत ॥ ०ह्मणोनि त्यांना, छळीतसे ॥ २४ ॥
॥ ०ज्ञानी वैरागी, तिला कुटी ॥ ०अज्ञानी धरितो, हनुवटी ॥
॥ •जया परब्रह्म श्रीची टवटवटी ॥ ०तोचि जाय, परब्रह्मीं ॥ २५ ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते महावाक्यविवरणनाम तृतीय प्रकरणं संपूर्ण ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥ * गी. अ. १८ श्लो. ५० मुकुंदराजांच्या ओंव्या २१ त्यांत शिष्याच्या समस्या ३ व संबंध ओंव्या ४ शेवटीं.

## ॥ प्रकरण ४ ॥

### ॥ अथ स्थूल देहविवरण प्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥
॥ देह रोगांचे भांडार * ॥ क्रिमी कीटकांचे, माहेरघर ॥
॥ भ्रांती कुसुकल्पनांचे, अवडंवर ॥ नाशवंत, शरीर हें ॥ १ ॥
॥ पांच भूतांचा, पेटारा ( शरीर ) ॥ त्यांत वायूच्या, वेरझारा ॥
॥ माया जर्जर करी, या पामरा ॥ देहाकार, देवोनियां ॥ २ ॥
॥ त्वचेमाजी, हड्डकमांस ॥ दुर्गंधी भोगावी, कासयास ॥
॥ पुनर्जन्म नको, ह्या जीवास ॥ ०हेंच ज्ञानी इच्छितसे ॥ ३ ॥
॥ ०अकरा इंद्रियें, मायें केलीं ॥ ० तेणें पामरें, गुंग झालीं ॥
॥ ०विषय लोभें, दुर्दशा झाली ॥ ०कर्मचक्रीं, फिरताती ॥ ४ ॥
॥ ०इंद्रिये जात्या, अजाण ॥ ०त्यांच्या द्वारें, होतें ज्ञान ॥
॥ ०मोह पावतो, तो अजाण ॥ ०कां न ह्मणावें, तयाशीं ॥ ५ ॥
॥ रोमत्वचा, नाडीमांस ॥ असती सर्वही, भूतांश ॥
॥ ०जड देहाचा, वृथा त्रास ॥ ज्ञाने पाही, तुझाचि तूं ॥ ६ ॥
॥ लाळ मुत्रादिक, शोणित ॥ मज्जारेत, आपद्रवत ॥
॥ पंचतत्वातें, जाणा निश्चित ॥ जाणतां एक, तुझाचि तूं ॥ ७ ॥
॥ क्षुधातृषा आळस, निद्रा ॥ मैथुनार्थी, वैश्वानरा ॥
॥ चलना कुंचने, वायु लक्षणा ॥ जाणता एक, तुझाचि तूं ॥ ८ ॥
॥ काम क्रोध, शोक जाण ॥ लोभ भय, हे पांची गुण ॥
॥ हें आकाशाचे, पूर्ण लक्षण ॥ तरी जाणता, तुझाचि तूं ॥ ९ ॥
॥ ऐसें पंच भूतांचे, तत्वांश ॥ पाहू जातां, पंचवीस ॥
॥ ते सर्वही, तुलाचि दृश्य ॥ ऐसा जाणी, स्थूल देह ॥ १० ॥
॥ देहावयवा, समस्ताशीं ॥ तूं एकलाचि, जाणता आसशी ॥
॥ तुझा तूंची, ऐताच असशी ॥ ०शोधा अंतीं, कळेल कीं ॥ ११ ॥
॥ ०जन्म मृत्यू, जराव्याधी ॥ ०नेम नाहीं, मृत्यु कधीं ॥
॥ ०येई सर्वदा, भयते आधीं * ॥ ०देह पाता, पर्यंत ॥ १२ ॥

---

*ही ओंवी भक्ति विजयांतील महिपती बोवांची आहे, ती येथें लागू ह्मणून घेतली.
*आधी ह्मणजे पूर्वी व आधी ह्मणजे मानसिक व्यथा तीही रोगा आधींच होते.

॥ देह शोभेचा, अभिमान ॥ हिंडतां फिरतां, पुष्टिवर्धन ॥
॥ बाल्य वार्धक्य, संहरण ॥ ०केव्हां जाशी, कोण जाणे ॥ १३ ॥
॥ तूं कोण कोठुनी, आला कैसा ? ॥ राहाशी जाशीं, देहीं कैसा ? ॥
॥ ०विवेक विचारें, उठवीं ठसा ॥ अंतर्ज्ञानें, मनावरी ॥ १४ ॥
॥ तूं देह किंवा, देहाचा जाण ॥ देह तुज जाणे, कीं तूं तयाचे ज्ञान ॥
॥ पाहतां द्रष्टा, तूंचि आपण ॥ जडदेह मात्र, तुज दृश्य ॥ १५ ॥
॥ देहाशि सबाह्य, अभ्यंतरीं ॥ तूंचि जाणशी पूर्ण विचारी ॥
॥ देह घंटा, लंकारापरी ॥ वृथा माझा, ह्मणविशी ॥ १६ ॥
॥ लेवोनि खोळी, पंचभूतांची ॥ वृथा भूतां, मिरविशीं, तूंची ॥
॥ ज्ञानें पाहतां, तुझा तूंची ॥ दुजे ब्रह्म, नसेच कीं ॥ १७ ॥
॥ ऐसे आपणातें, नीट जाण ॥ दृश्यादृश्य, निर्गुण सगुण ॥
॥ ०देहाशी न देतां, मीपण ॥ तीच भ्रांती, सांडिजे ॥ १८ ॥
॥ जाणे वर्ण, व्यक्तिरूपाशीं ॥ जाणे देहाच्या, नामाशीं ॥
॥ परंतु न जाणे, जाणणाराशीं ॥ आतां जाण, कोण मी ॥ १९ ॥
॥ ०जड चैतन्य, सत्यमिथ्या ॥ जाणिव बुद्धी, असे तथ्या ॥
॥ ०मी कोण व स्वरूप काय? यदर्था ॥ ०उहापोहे, उद्घाटिजे ॥२०
॥ ऐसा जरी तूं, नित्य चालशी ॥ तरि मग, मी कोण हें जाणशी ॥
॥ दृढाभ्यासें, आपणाशीं ॥ ज्ञाने भ्रांती, जातसे ॥ २१ ॥
॥ ०देहक्षेत्रीं, क्षेत्र ज्ञातें ॥ ०ह्मणजे जाणावें, आत्म्यातें ॥
॥ ०देहकवच, केवळ नुसतें ॥ ०इतुकें प्रथम, अनुभवीं ॥ २२ ॥
॥ देहीं जीवात्मा, निराकार ॥ न मानावा व्यर्थ देहाकार ॥
॥ जैसा काष्ठीं, अग्निसंचार ॥ तरी अग्नी, वेगळाचि कीं ॥ २३ ॥
॥ तैसा तूं देहाशीं, व्यापुनी ॥ असशी चर्म देहीं, भरोनी *॥
॥ रोमादिका माजी, राहूनी ॥ जाणता तूंची, निराळा ॥ २४ ॥
॥ जरी तूं असशी, जाणतेपणें ॥ तरी तुज न ठावें, नेणतेपणें ॥
॥ स्त्री पुंनपुंसकत्वे, देहपणे ॥ गर्व मिरविशीं, देहाचा ॥ २५ ॥

---

*रोहीदास चांभार जेऊन खाऊन शाळीग्राम पूजा चर्मपात्रांनीं चर्मावर बसून करीत असे. ब्राह्मणांनीं त्याला निषेध केला. तो ह्मणाला, परमेश्वर चर्मोतच सांठवला आहे. त्याची प्रथम स्वस्थता करतो मग पूजा करतों. मृदंग चर्मच आहे. कथा भजनांत तोच वाजतो.

॥ आत्म्या लागीं, जागेपणें ॥ ओळखूनि, नीट व्याप करणें ॥
॥ इंद्रिय द्वारें, भोग भोगणें ॥ हर्ष विषादा, वाचोनी ॥ २६ ॥
॥ मी अमक्या, नामा रूपाचा ॥ अभिमान ऐसा, देहाचा ॥
॥ तूंच जाणतां, ह्या सर्वांचा ॥ ऐसा आत्मा, विलक्षण ॥ २७ ॥
॥ शुद्धात्म्यातें, नीट जाणणें ॥ आपुलेंचि आपण, मुक्त होणें ॥
॥ ऐसेंचि ज्ञान, स्थिरावणें ॥ तोचि होय, जीवन्मुक्त * ॥ २८ ॥
॥ ऐसें स्थूल देहाचें, विवरण ॥ करावें मुमुक्षुनीं, श्रवण ॥
॥ कथन केलें तें, साधन ॥ साधकें आदरें, अभ्यासावें ॥ २९ ॥
॥ आतां अद्वैत, विवेकणें ॥ द्वैत हें, भिन्नत्वीं जाणणें ॥
॥ पुनरपि तेंचि, निरसणें ॥ ठायींच्यार्चा, ठायीं तें ॥ ३० ॥
॥ उफराटे दृष्टीचें, पाहणें ॥ दृष्टी माजी, दृष्टी मुरवणें ॥
॥ मुळ्या ठेपीं, जाणीत जाणें ॥ ०स्व स्वरूपीं, ज्ञानार्थ ॥ ३१ ॥
॥ तेथुनि मागें, पाहतां पाहतां ॥ पाहणेंचि नुरे हें, सर्वथा ॥
॥ आनंद दुम दुमतो, परमार्थों ॥ डंका वाजे, भुवनत्रयीं ॥ ३२ ॥
॥ जेथें नाहीं, माया अविद्या ॥ जेथें अपरिमित, स्वसंवेद्या ॥
॥ ०ऐशी सुगुणी, ब्रह्मविद्या ॥ सदा परिसावी, सावधानें ॥ ३३ ॥
॥ जें घनानंद, केवळ सुखीं ॥ प्रवेशावें, स्वयंप्रकाशीं ॥
॥ त्यागावें मन, गमनाशीं ॥ आनंदीं आनंद, होतसे ॥ ३४ ॥
॥ ०स्थूल देहाश्रयें, राहूनी ॥ ०लाभानंदातें, जाणुनी ॥
॥ ०साधु संगें, चर्चा करोनी ॥ ०उद्धारार्थी झटावें ॥ ३५ ॥
॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते स्थूल देहविवरण नाम चतुर्थ प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु. ॥

महिपती बोवाची पहिलीच ओंवी १ मुकुंदराजाच्या ओंव्या २८ त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या ८. } शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या ६ त्या ४।५।१२।२०।२२।३५

* देहदुःख कोणाला सहन होतें व कोणाला अगदींच असह्य असतें ह्मणून सहन करणारा जीवन्मुक्त झाला तरी असह्यकाऱ्याचा देहांतरानंतर मुक्तीचा लाभ बुडत नाहीं. मात्र तो जीवन्मुक्त होत नाहीं असें विद्यारण्य म्हणतात.

## ॥ प्रकरण ५. ॥

### ॥ अथ सूक्ष्म ( लिंग ) देहविवरण प्रारंभः ॥

दृश्य जड देहांत, चैतन्याश्रित जीवासहित, अनेक विकारीतत्वामिळून जो एक समूह असतो त्याच्या अत्यंत सूक्ष्मत्वामुळें त्याला सूक्ष्म देहही ह्मणतात व लिंग देहही ह्मणतात.

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥
॥ ०दृश्य देहाचा, चालक ॥ ०जया न जाणती, सकळिक ॥
॥ ०देहा माजीं, असा तो एक ॥ ०विस्मृत झाला, ज्याचा तो ॥ १ ॥
॥ ०त्रिगुण षड्रिपू, जीवसहित ॥ ०परमात्मा अंतरीं, असे स्थित ॥
॥ ०विस्मृतीच होणें, अनुचित ॥ ०ह्मणोनि भोग, भोगीतसे ॥ २ ॥
॥ ०दृश्यांत अदृश्य, लिंग देह ॥ ०संयोग वियोग, हाचि मोह ॥
॥ ०व्यर्थ सारा, उहापोह ॥ ०जगत् कारणीं, कर्दमीं ॥ ३ ॥
॥ ०देह जीवत्वीं, भिन्नत्व पाही ॥ ०देह बिऱ्हाडीं, तोचि राही ॥
॥ ०वृथा मी माझें, असें पाही ॥ ० ( हें ) देह त्यागीं, कळतसें ॥ ४ ॥
॥ ०ऐसा जाणा, लिंग देह ॥ ०न धरीं कदापि, संदेह ॥
॥ ०आत्मा लिंग देहीं, स्थीर ॥ ०तया मात्र, न सोडी ॥ ५ ॥
॥ ०स्थूल देह हें, भोग स्थान ॥ ०कर्म चक्रीं, मानापमान ॥
॥ ०देह धरोनी, सोडोन ॥ ०भोगार्थी तो, हिंडतसे ॥ ६ ॥
॥ ०कर्णेंद्रियांनीं, श्रवण करणें ॥ ०त्वचे वाटें स्पर्श घेणें* ॥
॥ नेत्रद्वारें, सर्व पहाणें* ॥ नाना सृष्टी, रूपातें ॥ ७ ॥
॥ जिव्हे वाटें, रुची घेणें* ॥ घ्राणद्वारें, परिमळणें ॥
॥ वाचेनें ते, शब्दोच्चारणें* ॥ ऐसा अनुभव, जीवाशीं ॥ ८ ॥
॥ हस्तद्वारें, कर्म करणें* ॥ पादद्वारें, नृत्य चालणें ॥
॥ शिश्नद्वारें, रती भोगणें ॥ गुदें मल, विसर्जन ॥ ९ ॥
॥ ह्या इंद्रियातें, तूंचि जाणी ॥ ०क्षेत्र क्षेत्रज्ञ, विलक्षणी ॥
॥ हें नसे आत्म्याच्या, लक्षणीं ॥ एक साक्षित्वा, वांचोनी ॥ १० ॥

---

*भगवत्कीर्तन व बीभत्स लावण्या श्रवण करणें *मूर्ती ध्यानें देवनादि व वाईट वस्तू पाहणें. *वाईट चांगली रुची घेणें. *सुगंध दुर्गंध घेणें. *सत्य मिथ्या भाषण व भजन करणें. *दान व अपराध हातानें करणें. *यांनीं संचार करणें असे अवयव व इंद्रियद्वारें चांगलीं वाईट कर्मे असा दुहेरी अर्थ घ्यावा.

॥ ०दीप प्रभेमाजीं, कांहीं ॥ ०आले गेलें, लवलाहीं ॥
॥ ०दीपाशीं विकार, नसे कांहीं ॥ ०व्यवहाराचा, साक्षी तो ॥११॥
॥ ०तैसा आत्मा, साक्षी दारू ॥ ०देखोनि सर्वही, निर्विकारू ॥
॥ ०नाहीं ह्मणतां, आहे, साचारू ॥ ०हेंचि लक्षण, आत्म्याचें ॥१२॥
॥ श्रवण स्पर्शन, आणि दर्शन ॥ रुचिस्वाद, अवग्रहण ॥
॥ सर्वही ज्ञात, इंद्रियें करून ॥ ऐसे विषय, भोगीतसे ॥ १३ ॥
॥ शब्द स्पर्श, रूप, रस, गंध ॥ पंच भूतांचे, धर्म सबंध ॥
॥ पावे इंद्रिय द्वारें, आनंद ॥ मल मैथुन, गुप्तेंद्रियें ॥ १४ ॥
॥ प्राणापान, व्यान उदान ॥ समानादि स्थानें, संपूर्ण ॥
॥ ०चालक प्रधान, प्राण पूर्ण ॥ ०तरी जाणता, तूंचि तूं ॥ १५ ॥
॥ अंतःकरण, मनोबुद्धी ॥ चित्ताहंकार, पांचा भेदी ॥
॥ स्फुर्ती जाणशी, सर्वा आदि ॥ तरी आत्मा, पूर्वीचा ॥ १६ ॥
॥ अंतःकरणीं, असंत पूर ॥ पुरामाजीं, मनतरंग ॥
॥ तया निरसोनी, सत्वर ॥ जाणी शुद्धात्मा, तूंचि तूं ॥ १७ ॥
॥ आत्म्यालागीं, स्फुरण जहालें ॥ मागुती जाणणें, उठावले ॥
॥ तया ह्मणोंचि नये, पहिलें ॥ आत्मा पहिला, ऐताची ॥ १८ ॥
॥ अंतःकरण, वृत्तिस्फुरण ॥ संकल्प विकल्प, तेंचिमन ॥
॥ तीच निश्चिता, होता जाण ॥ बुद्धीच तिजला, म्हणावें ॥ १९ ॥
॥ निश्चित असावा, तोचि अर्थू ॥ तेथेंचि संधाना, त्मक हेतु ॥
॥ तेंच चित्त, असें जाण तूं ॥ तत्प्रवृत्ती, अहंकार ॥ २० ॥
॥ अंतःकरण, पंचक स्फूर्ती ॥ तेथेंचि असे, स्वयंज्योती ॥
॥ स्वानुभव ज्ञानी, स्वसंवेद्य मूर्ती ॥ ऐसा जाणिजे, आत्मा तूं ॥२१॥
॥ कापुसा पासूनी, जैसा दोरा ॥ तोचि भासे, केवळ दुसरा ॥
॥ तैसें मन बुद्धी, चित्ताहंकारा ॥ भिन्न भासती, स्वरूपाहूनी ॥ २२ ॥
॥ पीळ उकलितां, जैसा दोरा ॥ ह्मणतां कापूस, तोचि खरा ॥
॥ उकलितां, नुकलितां, दुसरा ॥ कापुसा माजीं, भेद नसे ॥ २३ ॥

---

* * दोन पक्षी एका वृक्षावर बसले. त्यांतून एक फळें खातो व दुसरा उगचि बसतो. तद्वत् आत्मा आणि जीव एका देह वृक्षावर आहेत. फळें खाणारा सुखदुःखें भोगतो तो जीव आहे आणि दुसरा साक्षीदार आत्मा तो अक्षय सुखीच असतो. असें विद्यारण्य कथन करितात.

॥ जैसा उदकाचा, तरंगु ॥ भिन्न भासतो, वृथा रंगु ॥
॥ विरा लिया, होई भंगु ॥ उदकीं उदक, मिळतसे ॥ २४ ॥
॥ जैसे तरंग, आणि दोरा ॥ उकली पीळ, आणि वारा ॥
॥ तैसा लिंग देहाचा, उभारा ॥ गुण माया, करीतसे ॥ २५ ॥
॥ उकालिया अथवा, मुरालिया ॥ पीळ वारा, जाईलया ॥
॥ आत्म ज्ञानें, तशी माया ॥ मिथ्या भासी, वाटेल कीं ॥ २६ ॥
॥ तरंग जल दोरा, कापुस ॥ भ्रष्ट ज्ञानें, दुजे भासत ॥
॥ परब्रह्मीं होतां, समरस ॥ अज्ञान हारपे, सत्वरी ॥ २७ ॥
॥ असो ही स्फूर्तीची, कल्पना ॥ ती अंतःकरणीं, द्विधे मना ॥
॥ तेथेंचि स्वप्नावस्था, जाणा ॥ होते नुसती, वासनामय ॥ २८ ॥
॥ मन प्रवर्ते, इंद्रिय द्वारें ॥ वासना अभ्यंतरीं, ती विवरे ॥
॥ स्वप्नावस्थेनें, करी घरें ॥ श्रवणें दृष्टी, अभ्यासें ॥ २९ ॥
॥ तैजसा भिमानी, जो दृश्य ॥ सर्वांच्याही, ओळखीस ॥
॥ तोचि अंतस्थ, चिदाभास ॥ ०प्रतिबिंब, चैतन्य, ईशाचें ॥ ३० ॥
॥ आदित्य लोपतां, जैसा अग्नि ॥ तरी तो तदंशी, दिनमणी ॥
॥ तैसा चैतन्य रूपीं, जो अंतरीं ॥ तोचि स्वयं, प्रकाशात्मा ॥ ३१ ॥
॥ जरीं नसे, जाणिव कांहीं ॥ तरी नचि स्फुरावें, कांहीं वाही ॥
॥ चिदाभासें, आभास पाही ॥ इंद्रिय द्वारें, माये मुळें ॥ ३२ ॥
॥ तुझीच असे ही, जाणिव कळा ॥ घेवोनि हिंडशी, देह भोपळा ॥
॥ ०तुझी तूंची, गोरा काळा ॥ ०ओळखूं जाणे, तुझाचि तूं ॥ ३३ ॥
॥ तूंच स्फुरशी, तूंच जाणशी ॥ ०तूंच बोलशी, तूंच ऐकशी ॥
॥ ०ऐशा विवेकें, तुला तूंची ॥० पहावे नित्य, सर्वदा ॥ ३४ ॥
॥ ०विवेकें प्रकाशे, अंतःकरण ॥ ०सर्वांतर्यामी, असते समान ॥
॥ ०अभ्यासें, हें न वाटे, अप्रमाण ॥ ०परदेहज्ञान, होतसे * ॥३५॥
॥ ०आत्मा सर्वत्र, तोच मीच ॥ ०देह भिन्नत्वें, वृथाभासच ॥
॥ ०तो घट दृष्टया, उंच निंच ॥ ०नसे कांहीं, ज्ञान्याशीं ॥ ३६ ॥

* मोरया गोसावी चिंचवडकर हे ध्यानस्थ असतां तुकोबा त्यांच्याकडे गेले. ध्यान विसर्जनानंतर केव्हां आला असें पुसलें. ते म्हणाले आपण मोटेच्या धावेवर होता व केळीस पाणी देण्याचा बेत चालला होता तेव्हां आलों. अशी ध्यानांतील गोष्ट त्यांनीं जाणली.

॥ ०आत्मा स्वतेजें, स्फुरतसे ॥ ०अजाण रहाणें, हेंच पिसें ॥
॥ ०माया भ्रांती, हीच असे ॥ ०तीच घालवा, सत्वरीं ॥ ३७ ॥
॥ नेणिव सर्वथा, निरसुनी ॥ जाणेव धरावी, उल्हासुनी ॥
॥ मग माया, वृथैव, भासुनी, ॥ आत्म ज्ञान, लाभेल कीं ॥ ३८ ॥
॥ जाणिव शक्ती, सत्य प्रभा ॥ असे आत्मा, स्वयंभू उभा ॥
॥ दीप आपुलियेची, शोभा ॥ आपुला आपण, स्वयंज्योती ॥ ३९ ॥
॥ मृगजल जैसें, वृथा भासन ॥ हें जाणोनि करावें, निरसन ॥
॥ मग पहावें, आपुलें आपण ॥ होंचि जाण, आत्मज्ञान ॥ ४० ॥
॥ मन रिझवी, आपुल्या ठायीं ॥ मीच आत्मा, ऐसें पाहीं ॥
॥ मग नचि उरे, कांहीं बाहीं ॥ एका आत्म्या, वाचोनी ॥ ४१ ॥
॥ रूप रूपीं, ऐक्य होतां ॥ ( मग ) नुरे कांहीं, तत्व चिंता ॥
॥ दुःखाविणें, आनंद तत्वता ॥ ऐसा सिद्धांत, आहे कीं ॥ ४२ ॥
॥ निश्चयें करोनि, श्रम कीजे ॥ कैवल्य मुक्तीतें, पाविजे ॥
॥ जग देह द्वैत, भावादि त्यागिजे ॥ गुरूपदेश, हाच कीं ॥ ४३ ॥
॥ लिंगदेहाचें, विवरण ॥ ( केवळ ) गुरुकृपें, होते जाण ॥
॥ तरी न लाभे, श्रमावीण ॥ आत्मा जरी, आहेस तूं ॥ ४४ ॥
॥ ०लिंग देहीं, आत्मा स्थित ॥ ०म्हणूनीच ज्ञान, व्यवस्थित ॥
॥ ०तेथेंचि संपादी, अद्भुत ॥ ०देहीं लक्ष, नको रे ॥ ४५ ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराज विरचिते सूक्ष्म लिंगदेहविवरण नाम पंचम प्रकरण संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| मुकुंदराजांच्या ओंव्या ३३ | शिष्याची नवीन ओंवी १ |
| शिष्यानें समस्या पूर्ण केल्या १० | शेवटची २० वी |

## सूचना.

ही सूचना पसंत वाटल्यास ग्रहण करावी. न वाटल्यास सोडावी. वाद नको.

१ जड देहाचा चालक लिंगदेह आहे. तो देह प्रयाणकालीं वासनेसह जातो.

२ परकाया प्रवेशाचें कृत्य प्रेतदेहांत लिंगदेहाच्या संचारावांचून होत नसतें.

३ आपली कुडी जतन राखून रिकामी पाडून दुसऱ्याच्या रिकाम्या कुडींत लिंगदेह शिरवून ती कुडी सचेतन करणें हाच परकाया प्रवेशाचा अर्थ व प्रयोग आहे.

४ योगाभ्यासावांचून आपला देह सोडून लिंगदेहानें बाहेर जाणें होत नाहीं.

५ जो स्वदेहांतून जाऊं शकतो तो परकायेंतही प्रवेश करूं शकेल. हें उघड होतें.

६ श्री शंकराचार्योनीं राजाच्या प्रेतांत प्रवेश केला होता ही कथा प्रसिद्ध आहे.

७ विक्रम राजाला, ही, विद्या साध्य झाली होती अशीही कथा आहे.

८ जर ही विद्याच मुळीं नसती तर परकाया प्रवेश असा शब्दच उत्पन्न झाला नसता.

९ सांप्रत हे प्रयोग जागृत नाहींत ह्मणून ही गोष्ट खोटी ह्मणणें भाग पडते. तथापि

१० खोटी ह्मणण्यापेक्षां घडत नाहीं इतकें ह्मणावें; परंतु खोटी ठरविण्यास प्रमाण नाहीं.

११ मरणकालीं देह टाकून लिंगदेह सर्वोचाच जातो त्यांत अर्थ नाहीं.

१२ न बोलतां एका देहाचे हेतु दुसरा देह जाणतो. हा सर्वास अनुभव आहे.

१३ देह मुळींच जड आहे. त्या अर्थी असें जें जाणणें तें लिंगदेह द्वाराच जाणले जात आहे.

१४ योग्यांचे व इतरांचे लिंगदेह कुडी बाहेर जातात; तरी योगी सुशिक्षित व इतर मरणारे अशिक्षित आहेत येवढा महत्भेद आहे.

१५ एकाच्या घरांत दुसऱ्यानें जबरीनें शिरणें मग तो घरधनी घरांत असो अगर नसो. तशा पैकींच लिंगदेहानें परकाया प्रवेश करणें आहे.

१६ जड काया त्यागून जो लिंगदेह वासनेनें जातो तो दुसरा जड देह प्राप्त झाला नाहीं तावत्कालपर्यंत त्या लिंगदेहानें भ्रमण करतो त्याचेंच नांव पिशाच आहे.

१७ लिंगदेह अदृश्य ह्मणून पिशाचही अदृश्यच आहे; तथापि पिशाच नाहीं असा सिद्धांत करितात तो वरील सिद्धांताशीं अयुक्तिक व विरोधी आहे.

१८ लिंग देहही जड देहेंद्रियद्वारा चेष्टा दाखवितो तसेंच पिशाच व योगीही करतात.

१९ पिशाचालाही परकाया प्रवेश करण्याचें सामर्थ्य आहे; तथापि आपणाहून ज्या कुडींत लिंगदेह अशक्त व भेकड असेल अशा देहांत तें संचार करूं शकतें.

२० असा संचार केल्यावर त्या कुडींतलि लिंगदेहाचें सामर्थ्य हटवून स्वसामर्थ्यानें त्या देहेंद्रियद्वारानीं आपले गुण व हेतु प्रगट करतें असा अनुभव आहे.

२१ बायकांनीं वेद ह्मटला नसून संचारकालीं घडाघडा वेद ह्मणतात. परकीय अनश्रुत भाषा बोलतात. यावरून तें करणें अन्य लिंगदेहाचे स्पष्ट सिद्ध होते.

२२ जड देहाश्रित चर्म चक्षूस अदृश्य तत्व दिसावयाचे नाहीं ह्मणून तसें तत्वच नाहीं असें ह्मणणें हा चुकीचा सिद्धांत होईल. जीवतत्व असून दिसत नाहीं. ह्मणून जीव असें कांहींच तत्व नाहीं असें ठरवता येणार नाहीं व ठरवणें अयोग्य होईल.

२३ जसा जीव दिसत नाहीं तसेंच पिशाचही दिसावयाचें नाहीं. ह्मणून तें दाखवा ह्मणणें आणि न दाखवले ह्मणजे खोटें ह्मणणें यांत दाखवा ह्मणणें हा प्रश्नच मुळीं चुकीचा पाया आहे ह्मणून त्यावरील सिद्धांतही चुकीचाच ठरतो.

२४ लिंगदेह भटकणें हेंच पिशाच लक्षण आहे. तें परकाया प्रवेशानें मात्र आपले गुण दर्शविते. इतक्या अर्थानें पिशाच जाणले जाते. देहरूपी तें नाहीं. मनुष्यगणी माणसास मात्र भास होतो.

२५ लिंगदेहाच्या भागांत परकाया प्रवेश व पिशाच यांची समजूत होणें अवश्य आहे ह्मणून इतके त्याहावे लागलें, इतका निर्वाह ओंढ्यांनीं होणार नाहीं.

## ॥ प्रकरण ६ ॥

### ॥ अथ कारण देहविवरण प्रारंभः ॥

स्थूल देहांत सूक्ष्म लिंगदेह ठेवणें हेंच कार्य व तें गुणसगुण मायेकडून होतें; परंतु त्याला कारण आत्मा आहे. व तो त्या सूक्ष्म लिंगदेहांत ही अत्यंत सूक्ष्म-त्वानें तोच ईश्वर आहे ह्मणून त्याला अनुलक्षून कारणदेह असें तत्वज्ञात्यांनीं नांव ठेविलें आहे. वस्तुतः त्यास नामरूप मुळींच नाहीं.

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ ० दृश्य देहांत, लिंगदेह ॥ ० तोंचि आत्म्याचें, जाणा गेह ॥
॥ ० वासना परत्वें, आरोपें मोह ॥ ० उपाधीनें, कारण जडे ॥ १ ॥
॥ ० कारणामुळें, कारण देह ॥ ० नाम पडलें, वडतां स्नेह ॥
॥ ० नीचा संगतीं, होतो मोह ॥ ० आत्मा तैसा, जिवामुळें ॥ २ ॥
॥ ० हलके झोपाळा, हालवितीं ॥ जीव मनानें, ऐशी गती ॥
॥ भासे तैशी, आत्मस्थिति ॥ ० मृगजल भासे, तैशीच कीं ॥ ३ ॥
॥ खोटा आभास, टाकुनी ॥ स्थिराचि रहावें, उन्मनीं ॥
॥ देखो जाणे, आत्मज्ञानी ॥ आत्मा अचंचल, तया दिसे ॥ ४ ॥
॥ उदकीं जैसा, दीप प्रकाश ॥ ० लांवट हलतो, सावकाश ॥
॥ तरी दीपज्योतीं, सूक्ष्मांश ॥ माया पसरोनी, दावीतसे ॥ ५ ॥
॥ देह वैद्यकी, अवश्यक ॥ जाणावी ती, अति सम्यक ॥
॥ ० देहग्रामींचे, ग्रामकंटक ॥ जाणोनि आत्मा, शोधिजे ॥ ६ ॥
॥ ० केतकी भोंवते, कांटेकुटे ॥ ० राजा भोंवतीं, खलकरंटे ॥
॥ ० आम्या भोंवतीं, षड्रिपूचे तंटे ॥ ह्मणोनि प्रवेश, दुर्लभ ॥ ७ ॥
॥ तया हटवुनी, मार्ग सुगम ॥ करावा प्रारंभीं, मोहोगम ॥
॥ प्रवेश झालिया, न राहे गोम ॥ आत्मज्ञानीं, विसर्जनीं ॥ ८ ॥
॥ ज्ञेय ज्ञाता, आणि ज्ञान ॥ हीच त्रिपुटी, स्थान मान ॥
॥ ज्ञान्याचा होतसे, सन्मान ॥ ० अंतर्बाह्य, सर्व लोकीं ॥ ९ ॥
॥ अज्ञान निरसतां, होतें ज्ञान ॥ तिमिर नष्टांशें, होते प्रभान ॥
॥ तैसें अज्ञानाचेचि, होते ज्ञान * ॥ विवेक मुख्य, पाहिजे ॥ १० ॥

* आम्रफळ प्रथम कडू, नंतर तुरट, उपरांत अंबट मग मधुर, व शेवटीं गोड होतें तद्वत.

॥ अज्ञान आणि, अंधःकार ॥ नाहीं सर्वथा, अपार ॥
॥ किंचित् भावें, इतुका प्रकार ॥ न्यूनाधिक्य, मायागुणें ॥ ११ ॥
॥ कोंवळें असतां, आम्र तुरट ॥ अल्प काळें, होती, अंबट ॥
॥ पाड कालीं, मधुर वट ॥ ऐसेचि वैचित्र्य, ज्ञानाचें ॥ १२ ॥
॥ ब्रह्मीं माया, जडीं छाया ॥ नासकी माया, तैशीच काया ॥
॥ ०न धरावी देहीं, ममता माया ॥ ज्ञान बलानें, निरशी तिला ॥ १३ ॥
॥ स्थूल सूक्ष्म आणि कारण ॥ चवथा तोची, महा कारण ॥
॥ चारी अवस्था, जाणल्यावीण ॥ अंतर्धान, न पावशी ॥ १४ ॥
॥ भूत मालाशीं, जो जाणें ॥ तो कैसा, आपणाशी, नेणें ॥
॥ नेणिव तरी हें, असें कळणें ॥ तेंच जाणिव असे कीं ॥ १५ ॥
॥ मन प्रवर्ते, इंद्रिय द्वारें ॥ तेंहीं बाह्य, विषय अपारे ॥
॥ असते जागृती, हें जरी खरें ॥ ( तरी ) निद्रा सुषुप्ती, तेथेंच कीं ॥ १६ ॥
॥ वृथाभास, घेऊनी, अंतरीं ॥ मन हें सूक्ष्म, कल्पना करी ॥
॥ तेव्हां स्वप्नाच्या, अवस्थे वरी ॥ लिंगदेह मांडतसे ॥ १७ ॥
॥ जागृत स्वप्नीं, जाणिव एक ॥ दोघा सांधीं, सुषुप्ती देख ॥
॥ गाढ निद्रा तुरिया, विपरीत ॥ ह्याचि अवस्था, लिंग देहीं ॥ १८ ॥
॥ नेणिवचि असतां, जाणिव ॥ तरी मानला, विपरित भाव ॥
॥ ०आप आपुल्या, नसे ठाव ॥ अज्ञानत्वें, करोनियां ॥ १९ ॥
॥ नेणिव शंका, तुटतां फिटतां ॥ स्वस्वरूप, उमटे तत्वतां ॥
॥ किटाळ जातां, अग्नीची स्वस्थता ॥ कारण देह, जाणा ऐसा ॥ २० ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते कारण देहविवरण नाम षष्टम प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| मुकुंदराजाच्या ओंव्या १८ त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या त्या १० | शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या २ त्या प्रारंभींच १।२ आहेत. |

## सूचना.

लिंगदेहांतर्गत असलेल्या आत्म्यास जाणून मुक्त होणें हाच ज्ञानाचा अंत आहे.

| | |
|---|---|
| ॥ सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म, तथाप्नोति निबोधमे ॥<br>॥ समासेनैव कौंतेय, निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ | भगवत् गीता<br>अ. १८ श्लोक ५० |

## ॥ प्रकरण ७. ॥

### ॥ अथ महा कारण देहविवरण प्रारंभः ॥

आत्म्याच्याही आंत परमात्मा अत्यंत सूक्ष्म असा जो आहे तोच परब्रह्म परमेश्वर आहे. आत्मा ईश्वर व परमात्मा परमेश्वर आहे. त्या अर्थी त्याला महाकारण ह्मटलेंच पाहिजे. वस्तुतः त्याला नामरूप नाहीं. ज्ञात्यानीं नांव दिलें आहे.

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ ०परब्रह्म मुख्य, आदिकारण ॥ ०तयाशि ह्मणणें, महा कारण ॥
॥ ०देह नसतां हें, नामाभिधान ॥ ०खुणेसाठीं, दिधलें कीं ॥ १ ॥
॥ कार्य कारणाचें, जें कारण ॥ त्यालाच ह्मणावें, महा कारण ॥
॥ कार्य कारण, सरलिया, शून्य ॥ महा कारण, शब्दचि उरे ॥ २ ॥
॥ अवघा दिसे, दृश्याकार ॥ भासे आंपुल्या, जाणिवे समोर ॥
॥ तोचि निरसुनीं, तूंची ऊर ॥ ज्ञानस्वरुपीं, होऊनियां ॥ ३ ॥
॥ नेणिवेच्या, नेणिव भावा ॥ तूंच जाणशी, स्वयमेवा ॥
॥ तें जाणिव धरोनी, आपुलिया ॥ आपणचि स्वयें, रिझावें ॥ ४ ॥
॥ आपण, आपणाशीं, जाणतां ॥ नेणिवचि नाहीं, असें वाटतां ॥
॥ स्वयेंचि होउनी, सज्ञाता ॥ निरशी नेणिव, समूळ तें ॥ ५ ॥
॥ नेणिवाचि जेथें, निरसलें ॥ तेथेंचि जाणिव, राहिलें ॥
॥ ते जाणिवच, आंत प्रकाशले ॥ आत्मरूप, स्वयंज्योती ॥ ६ ॥
॥ जाणे नीट जो, स्वजाणिवा ॥ तोचि प्रपंचार्थी, करी हेवा ॥
॥ तया आपणा, जाणावया ॥ कोडे न पडे, कदापि ॥ ७ ॥
॥ नेणिव तुटोनी, गुरुखुणा ॥ जाणे, तोची आप आपणा ॥
॥ बोलिले ह्या, अनुसंधाना ॥ महा कारण, देह ऐसे ॥ ८ ॥
॥ गेले वाहोनी, नेणतेपण ॥ आपण आपणा, जाणतेपण ॥
॥ तिन्ही देहांचे, साक्षित्वपण ॥ महा कारण, देहीं असे ॥ ९ ॥
॥ तिन्ही अवस्थीं, सजाणपण ॥ तीच तुरिया ऐशी खूण ॥
॥ तिन्ही देहांचे, अवलोकन ॥ कारितो हाच, देह कीं ॥ १० ॥
॥ सर्व साक्षी, ऐसा आपण ॥ हाच प्रत्यगात्म्याचा, अभिमान * ॥
॥ तोचि खोडोन, खुंटवावे स्फुरण ॥ शुद्धतेज, झळकेल कीं ॥ ११ ॥

* प्रत्येक देहांतील जो देहाभिमानी आहे त्यालाही ज्याचें अधिष्ठान आहे तो प्रत्यगात्मा.

॥ आत्मा स्वयंभू, आपण ॥ जाणे अपुली, आपण खूण ॥
॥ परब्रह्म जें, निर्वाण ॥ तेंचि जाण, निजरूप ॥ १२ ॥
॥ ऐसें अपुलें, अनुसंधान ॥ करितां निपजे तें, विज्ञान ॥
॥ सृष्टि प्रपंचीं, मिथ्यात्वपण ॥ प्रत्यया येई, सहजचि कीं ॥ १३ ॥
॥ मीच शुद्धात्मा, जाणुन ॥ ऐसा वर्ते जो, दारुण ॥
॥ तयाचा तेथें, साक्षी कोण ॥ केवळ साचा, तोचि तो ॥ १४ ॥
॥ जाणिवेचे जें, निजज्ञान ॥ तेंचि शुद्धत्व, आपण ॥
॥ तेंचि दृढ करावें, परिपूर्ण ॥ निजात्मा तो, तूंचि असे ॥ १५ ॥
॥ ज्ञान जेथुनी, स्फुर द्रवे ॥ तेंचि स्फुरणें, स्वस्वभावें ॥
॥ ऐसें स्वरूप, अनुभवावें ॥ महा कारण, देहीं कीं ॥ १६ ॥
॥ जेथें जाणिव, ज्ञान खुटे ॥ तेथेंचि स्वरूप, तुझें नटे ॥
॥ घनानंद, अभ्यास, नेटे ॥ होई तेथें, अपरिमित ॥ १७ ॥
॥ जें अमर्याद, ऐसे अमोघ ॥ ०तेंचि जाणण्या, ऐसा ओघ ॥
॥ ०जें अविनाशस्थान, असे दीर्घ ॥ अखंड ब्रह्म तेंच कीं ॥ १८ ॥
॥ ०लोह लोहचुंबीं, जैशी ओढ ॥ ०तैशी देवभक्तांची, प्रेम जोड ॥
॥ ०पान्याच्या दोन, गोळ्या सोड ॥ ०स्पर्शा स्पर्शें, ऐक्यता ॥ १९॥
॥ ०सोहं दासोहं, द्वैताद्वैत ॥ ०द्वैताचें करावें, अद्वैत ॥
॥ ०घनानंदीं, मुक्तीप्रत ॥ ०पावणें हाची, ज्ञानांत ॥ २० ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराज विरचिते महा कारण देहविवरण नाम सप्तम प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| मुकुंदराजांच्या ओंव्या १७ असून त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केली १ | शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या ३ त्या १।१९।२० |

### सूचना.

१ स्थूल देहाचा साक्षी ह्मणजे त्याला जाणणारा लिंगदेह अथवा सूक्ष्मदेह आहे. तसाच स्थूल व सूक्ष्म देहाचा साक्षी कारण देह आहे आणि ह्या तिघांचा साक्षी महा कारणदेह आहे. सोहं जपानें तुरियावस्था सत्वर साधते,

२ जागृती. स्वप्न, सुषुप्ति आणि तुरिया या चारी अवस्थेंत तुरिया ही पूर्वींच्या तिन्ही अवस्थाना जाणणारी साक्षी आहे; अर्थात् ती महा कारण देहास जाणण्यास मोठी साधनभूत अर्धी समाधीवत् आहे ह्मणून ती सत्वर साधावी.

## ॥ प्रकरण ८ ॥

### ॥ अथ शून्यविवरण प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ जें ब्रह्मशून्य, भाविजे ( १ ) ॥ तरी तें कल्पूनि, नांव दीजे ( १ ) ॥
॥ जें अपो आप, आपणा सुचे ॥ तें शून्य कैसे, ह्मणावे ? ॥ १ ॥
॥ जो या शून्यातें, नीट जाणे ॥ तो विरुद्ध कांहीं, नचि ह्मणे ॥
॥ जें कांहींच नाहीं, ऐसे तेणें ॥ आपणा कैसें, जाणिलें ॥ २ ॥
॥ जयाच्या ठांयीं, नसे दृश्य ॥ दृश्याशि दृश्यत्वे, अदृश्य ( २ ) ॥
॥ जयाचा तयाशींच, प्रकाश ॥ अनुभवें ब्रह्म, कळतसे ॥ ३ ॥
॥ कल्पित जडाकार, देखतां ॥ अंतरीं भासे, सत्यता ( ३ ) ॥
॥ तरी तो जड अजड, तत्वता ॥ ऐसे जाणतां, स्फुर्तीच खुटे ॥ ४ ॥
॥ अभावा परी ब्रह्म भासे ॥ ०तरी अनुभवते, उत्तम खासें ( ४ ) ॥
॥ तया शून्य, ह्मणतां, कैसे ? ॥ शून्याचाची, पसारा ( १ ) ॥ ५ ॥
॥ शून्याचे तरी, शून्यपण ॥ ज्ञानीच कल्पितो, आपण ॥
॥ तोचि तेथें, होतो लीन ॥ ०गोडी लागतां, शून्याची ॥ ६ ॥
॥ तेंचि शून्य, नाजाणिव ॥ तेंचि नादृश्य, नानेणिव ॥
॥ ज्ञाप्ति मात्रेचि, केवळ भरिव ॥ ऐसेचि स्वयें, अनुभवतें ॥ ७ ॥
॥ जें निरंतर असें, निर्मल ॥ ज्ञानघन असे तें, केवळ ॥
॥ चिदानंदमय जें, अखिल ( ५ ) ॥ अगोचर सर्वांशीं ॥ ८ ॥

---

( १ ) गणितास तरी मूलाधार शून्यच आहे. सिद्धांत गणितांत वर्तुलाचा आधार किंवा प्रारंभ मध्य बिंदुपासून आहे तो तरी शून्यच आहे. गणिताचा पसारा शून्यापासूनच आहे. कल्पित बीज गणितांत उत्तर सत्य निघतें. तें कल्पित निघत नाहीं. तसेंच कल्पना करतां करतां परमेश्वर सत्यानुभवी निघतो. कल्पित अंबटपणानें तोंडास पाणी सत्यच सुटते. स्वप्नांतील स्त्रीसंग खोटा असून रेतोत्सर्ग खरा होतो. समीकरणाचें उदाहरण. ० कल्पित ब्रह्म × भावना + तपश्चर्या श्रम—पाखांड == सत्यब्रह्म.

( २ ) सूर्यानें आपणास पहाण्यासाठीं, अन्य कोणाच्या प्रकाशाची अपेक्षा करावयास नको

( ३ ) अंतश्चक्षूपुढें जो काल्पनिक जडाकार भासतो तो वृथाच असतो. तो जड अजडच असतो. व त्यास ज्ञानानें अंतीं तो वृथाभासच ठरतो. तद्वत् सृष्टी वृथाभासरूपीच जाणावी.

( ४ ) दुधांत तूप, काष्टांत अग्नी, दिसत नाहीं पण मंथनानें दोन्ही प्रगटतात तद्वत् विचार घर्षणानें ईश्वर कळतो, गुप्त ठिकाणीं पडलेल्या रेतबिंदूचाच पुरुष प्रगट होतो.

( ५ ) ॥ चिदानंदमय ब्रह्म प्रतिबिंब समन्वितः ॥ ब्रह्म चिदानंदमय असून तें सृष्टिरूप प्रतिबिंबानें युक्त आहे. सूर्य, आरसा, प्रतिबिंब व कवडसा असे त्रिःसंधान आहे.

॥ जेथें अदृश्य, अशून्याकार ॥ ज्ञान खार्चिलें, जरी अपार ॥
॥ ०तरी तें सूक्ष्माहूनी, सूक्ष्मतर ॥ अनुभव मात्र, देतसे ॥ ९ ॥
॥ जें निष्कलंक, ज्ञानाकाश ॥ करी शून्या, काशाचा, ऱ्हास ॥
॥ होतां निजद्रष्टा, स्वयंप्रकाश ॥ अनुभव परमात्मा, तोचि असे ॥१०॥
॥ तो निरालंब, केवळ साक्षी ॥ असे निर्लेप, सर्व पक्षीं ॥
॥ ०गुणाव गुण, तया नसती ॥ ऐसा परमात्मा, तूंचि तूं ॥ ११ ॥
॥ न लगे कोठेंही, जाणें येणें ॥ नलगे ब्रह्मांडीं, शोध करणें ॥
॥ ०पिंड देहीं, साचें राहणें ॥ तेथेंचि पहावें, तयाशीं ॥ १२ ॥
॥ सर्व साक्षित्वाचें, जें दीपन ॥ आत्मानंदाचें, असे स्थान ॥
॥ सच्चिदानंदरूपी, जें निधान ॥ ऐसा ठेवा, देहांतची ॥ १३ ॥
॥ ऐसा परमात्मा, विलक्षण ॥ अज्ञानें न कळे, त्याचें लक्षण ॥
॥ त्याचा महिमा, सुलक्षण ॥ ह्मणूनचि त्याशीं, साधावें ॥ १४ ॥
॥ ब्रह्म तत्वांश, अनुवादणें ॥ ऐकावा तो, शुद्धांतःकरणें ॥
॥ नित्याभ्यासें, नीट चिंतिणें ॥ बाणावें ब्रह्म, सर्वांगीं ॥ १५ ॥
॥ दृष्टी ठेवोनी, निश्चल बसे ॥ चित्त रमवावें, समरसें ॥
॥ घर सोडीनें, तो, प्रकाशे ॥ प्रथमारंभीं, असाच कीं ॥ १६ ॥
॥ समाधी योग, हट्टादिक ॥ ०प्रपंचा सक्ता, नसे ठीक ॥
॥ निश्चय बळें, आत्मा एक ॥ ०साक्षात्कारें, खुलतसे ॥ १७ ॥
॥ ०देव मुक्ती, चारी जाण ॥ ०तीही प्राप्ती, परम कठिण ॥
॥ ०त्याही चारी, वलांडून ॥ ०कैवल्याचीं, पावणें दुर्घट ॥ १८ ॥
॥ ०ऐसा हव्यास, परम हंसा ॥ ०श्रम नोव्हे तो, ऐसा तैसा ॥
॥ ०लाभ होणें, प्रारब्ध हिस्सा ॥ (तरी)०यत्नें सिद्धी, होतसे ॥१९॥
॥ ०यत्ना अंतीं, परमेश्वरू ॥ ०धरी हा निर्धार, साचारू ॥
॥ ०जन्मो जन्मीं, यत्न करूं ॥ ०ह्मणतां, सिद्धी होतसे ॥२० ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते शून्यविवरण नाम अष्टम प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| मुकुंदराजांच्या ओंव्या १७ असून त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या ७ | शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या ३ त्या १८।१९।२० |

## ॥ प्रकरण ( माया ) ९ ॥

### ॥ अथ दृश्यभासखंडण प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ ०दृश्य भासन, भ्रमण ऐसे ॥ ०वृथा मोह, करितें तैसें ॥
॥ ०ज्ञान्या अज्ञान्या, लागे पिसें ॥ ०माया दुर्धर, अशीच कीं ॥ १॥
॥ उजेडातुनी, आंत आला ॥ दृष्टी मार्जी, अंधार भरला ॥
॥ नेत्र असतां, अदेखणा झाला ॥ ऐसेचि भ्रमिष्ट, सर्वही ॥ २ ॥
॥ अध्यात्म ऐकुनी, घरीं आला ॥ ०पुनरपि प्रपंचीं, सक्त झाला ॥
॥ ०न, भ्रमवितां, सावध स्थितीला ॥ ०ज्ञानीच केवळ जाणतसे ॥३॥
॥ जेथें मनानें, जेंजें कल्पिणें ॥ तें तें द्विनयनानीं, देखणें ॥
॥ ०अंतर्मुख बहिर्मुख, दृष्टीच्या खुणे ॥ भ्रम टाकुनी निर्भ्रमहो ॥४॥
॥ जेथूनि निपजे, विवेक मात ॥ पाही जो सत्य, शोध मनांत ॥
॥ तत्व दृष्ट्याच, जो ज्ञाने पहात ॥ तोच ज्ञानी, जाणावा ॥ ५ ॥
॥ ज्याचा तोची, आपणाशीं ॥ आपणचि आपण, उपदेशी ॥
॥ ०तोच जाणील, आत्म स्थितीशीं ॥ त्यालाच ज्ञानी, जाणावा ॥६॥
॥ पूर्वानुसंधान, तुजला असे ॥ त्याच चित्तें, तुजला दिसे ॥
॥ तेंच देह धारणीं, प्रकाशे ॥ याला कारण, तुझाचि तूं ॥ ७ ॥
॥ ऐसे विलक्षण, अंतःकरण ॥ तेथें तूंचि, स्फुरशीं जाण ॥
॥ तेंच न स्थिरतां, गोंधळून ॥ भ्रमिष्ट फिरशीं, सर्वथा ॥ ८ ॥
॥ उदकें तरंग, सोडणें ॥ अकाशे वायू, दवडणें ॥
॥ तैशी तुझी फूर्ती, होणें ॥ कठीण तुजला सर्वदां ॥ ९ ॥
॥ तरंग जळाच्या, आंत विरे ॥ वायू तोही गगनीं मुरे ॥
॥ तशीच तुझी, स्फुर्ती नुरे ॥ विवेकें तुझिया, ठायींती ॥ १० ॥
॥ अपुला हात, जरी झाडिला ॥ तरी तो स्वदेहींच, जडलेला ॥
॥ तैसा अंतःकरण, स्फुर्तीला ॥ ०जोड सांधा, असेच कीं ॥ ११ ॥
॥ पृथक् न होय, स्फुर्ती वृत्ती ॥ परमात्मा पासाव, उभयोत्पत्ती ॥
॥ कल्पना तरंगीं, लयोत्पत्ती ॥ हाच तयेचा, स्वभाव गुण ॥ १२ ॥
॥ तूंचि पाहावें, तुझें चित्त ॥ मीच ऐसा, अहंकृत होत ॥
॥ स्थीर असोनी, उपाधी राहित ॥ स्फुर्ती उपाधी, करीतसे ॥ १३ ॥

॥ जरी निर्वेध, स्थीर असतां ॥ तरी स्फूर्ती, कल्पना करितां ॥
॥ संकल्प विकल्प, करितां करितां ॥ ०वृथा गोंधळ, माजतसे ॥ १४ ॥
॥ एकदां निश्चय, पक्का धरितां ॥ तरी पुनःपुनः, कां चिंतितां ॥
॥ देहत्वें कां वृथा, मानितां ॥ ०मी व माझे, ह्मणोनिया ॥ १५ ॥
॥ ह्मणोनि हेंचि, असंतत्व ॥ ठरतें सर्वथा, नित्यनित्य ॥
॥ ज्ञान नसतां, अहंकारत्व ॥ बुडवी सर्वस्वी, सर्वांना १६ ॥
॥ अज्ञान जातां, ज्ञान राहे ॥ ज्ञानेचि शोधोनी, सत्य पाहे ॥
॥ ज्ञाना विणे, लाभचि नोहे ॥ ०क्षुद्रापासुनी, मुक्ती परी ॥ १७ ॥
॥ तें ज्ञान जरी, अधिष्ठान ॥ तरी संकल्प, विकल्पीच मन ॥
॥ अभ्यासाविणे, उन्मन तन्मन ॥ स्फुरण नष्ट, न होय कीं ॥ १८ ॥
॥ कांहीं न स्मरतां, नये स्मरण ॥ स्मरणाचि जयाचें, विस्मरण ॥
॥ मग तें ज्ञान, न अज्ञान ॥ उरे ज्ञप्ती मात्र पैं १९ ॥
॥ वृत्तीशी कांहीं, भास भासे ॥ तितुकीच, स्फुर्ती होतसे ॥
॥ ०तथापि स्वतः, आपणची असे ॥ केवळ निरा, भासमयी ॥ २० ॥
॥ तो निराभास, ह्मणावा कवण ॥ तोचि तयाचा, कांहीं जाण ॥
॥ तें जाणिव ही, जिरवून ॥ जेथील तेथें, टाकावें ॥ २१ ॥
॥ देहा सहित, ब्रह्मांड शून्य ॥ ऐसे ज्ञान, परिपूर्ण ॥
॥ कांहीं न दिसे, स्थानमान ॥ तोचि योग्य परमहंस ॥ २२ ॥
॥ ०त्रैलोक्य असे तें, साकारी ॥ ०विकारी ह्मणोनी, ओंकारी ॥
॥ ०येत असे जें ॐकारी ॥०संचले त्यांना, सहजच कीं ॥२३ ॥
॥ अंतर्बाह्य जें, परिपूर्ण ॥ शून्य झाले सा, आभासन ॥
॥ राहिले अपुलेची, आपण ॥ स्वयं ब्रह्म होवोनिया ॥ २४ ॥
॥ वृत्तीच जिरोनिया, पैं गेली ॥ मन बुद्धी ती, मावळली ॥
॥ देहाची तो, विस्मृतीच झाली ॥ तोचि झाला, जीवन्मुक्त ॥ २५ ॥
॥ पंच भूतांची, करिते काया ॥ जीवा लागीं, रमवावया ॥
॥ तरी शेंवटीं, घालविते वाया ॥ हेंच लक्षण, मायेचें ॥ २६ ॥
॥ सुखा कारी, चमत्कार ॥ दावी, माया, अपरंपार ॥
॥ तरी शेवटीं, दुःख अपार* ॥ करिते माया, स्वयं गुणे ॥ २७ ॥

* माया विकाराचें सत्यत्व मानणें हेंच सुखदुःखास कारणीभूत आहे.

॥ अज्ञान, अविद्या, वृथा मोह ॥ कर्दम दुर्गंधीं, उहापोह ॥
॥ जगत् गारुडी, करी व्यामोह ॥ हेंचि लक्षण, मायेचें ॥ २८ ॥
॥ ०सुंदर स्त्रियांना, पृथ्वी तळीं ॥ ०सजवी केवळ, नटी पुतळी ॥
॥ ०माया जासाच, नटी पुतळी ॥ ०वृथा चर्म, रंगवीतसे ॥ २९ ॥
॥ देव दानव ऋषी, थोर ॥ कारिती कृत्यें, नीच घोर ॥
॥ वृथा मोहे, सदा घोर ॥ लावी सर्वां, मागे तीं ॥ ३० ॥
॥ ऐशी माया, नीट जाणणें ॥ कर्दम दुर्गंधीं,न्याहाळणें ॥
॥ अंतःकरण, परावृत्त करणें ॥ हेंचि ज्ञान, सत्य असे ॥ ३१ ॥
॥ ०चर्म मांस, लाळ मूत्र ॥ ०लग्नार्थी ह्मणती, ब्रह्मसूत्र ॥
॥ ०तया मानवा, ईश मित्र ॥ ०माया मोहें, न आठवे ॥ ३२ ॥
॥ ज्ञान दृष्ट्या, जागे होणें ॥ माया मोहातें, निरसणें ॥
॥ जन्मो जन्मीं तें, घट्ट करणें ॥ सहजीं न होय, कोणाशीं ॥ ३३॥
॥ साधू संगें, निरसे माया ॥ होते अत्यंत, शुद्ध काया ॥
॥ देह न जाई, केवळ वाया ॥ कांहीं तरी, लाभेल कीं ॥ ३४ ॥
॥ लागू नये, तिचिये नादीं ॥ फसले बहुथोर, अनादी ॥
॥ मारावे रिपू, कामादि ॥ मुक्ती लाभा, साठींच कीं ॥ ३५ ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते दृश्यभासखंडण नाम मार्थी नवम प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या ३० त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या त्या ८ } शिष्याच्या संबंध नवीन ओंव्या ५ त्या १।३।२३।२९।३२.

## सूचना.

स्थूल सूक्ष्म हे दोन्ही देह मायाविकारीच आहेत. त्यांत कारण देह आणि महा कारण देह हे अंतस्थ असून ईश्वर परमेश्वर तत्वरूपी आहेत. जीव हा ईश्वराचे प्रतिबिंब आहे व त्याला अहंकारें कडून कर्तृत्व भोगतत्व भोगण्यास पुढारी केलेले आहे. जीव हा कल्पारंभापासून मायेच्या आधीनच आहे व मायाभ्रमांत सुखदुःखें भोगीतच हिंडत आहे. व तीच सत्य माया मोहानें त्याला लागून गेली आहे. मायेचे दोन हस्त आहेत, ते एक भ्रमरूपी व दुसरा निर्भ्रम करणारा असा आहे. जगव्यवहार हा भ्रमरूपीं हस्त आहे' प्रायः त्यांतच सर्व गर्क आहेत. ब्रह्मविद्या हा निर्भ्रम हस्त आहे. तो जगव्यवहाराचें मिथ्यात्व ठरवून खात्री करणारा आहे. आतां कोणत्या हस्ताचा अंगिकार करावा हें सहजच कळेल.

## ॥ प्रकरण १० ॥

### ॥ अथ अज्ञाननिरसन प्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥

॥ ०अज्ञान ह्मणजे, मी कोण ? ॥ ०कोठून आलों हें, अजाण ॥
॥ ०कर्ता करविता, आहे कोण ! ॥ ०ऐशी शंका, नसे जया ॥ १ ॥
॥ ०आहार निद्रा, भय मैथून ॥ ०अन्य प्राणी, करती जाण ॥
॥ ०तया सारिखें, आचरण ॥ ०ज्ञानी मानव, करतो कीं ॥ २ ॥
॥ ०प्रापंचिक शिक्षणें, शिकोनिया॥ ०विदूप* ह्मणविती, अभिमानिया॥
॥ ०गर्व घमेंड्या, करोनिया ॥ ०जन्मा आले, तैसे मरती ॥ ३ ॥
॥ ०देह देहाचे, असे नातें ॥ ०जीव देहाचें, अनातें ॥
॥ ०जाता वेळीं, यम सद्नातें ॥ ०माझे ह्मणवुनी, त्यागी तीं ॥ ४ ॥
॥ ०सर्व विद्या, माजी, श्रेष्ठ ॥ ०ब्रह्मविद्या, असे ज्येष्ठ ॥
॥ ०परंतु सारे सर्वदा, निचेष्ट ॥ ०प्रपंचा माजीं, असक्त कीं ॥ ५ ॥
॥ ०मिळाला जरी, अधिकार ॥ ( तरी ) ०चाळे करिती, अपार ॥
॥ ०अन्यातें पीडा, साचार ॥ ०कर्तव्य हेंची, जाणती ॥ ६ ॥
॥ ०भजन पूजनीं, कंटाळा ॥ ०कामादिकांचा, बहू चाळा ॥
॥ ०तरी सा ओंगळ, विटाळा ॥ ०माजी मिटक्या, मारिती ॥ ७ ॥
॥ ०कांहींकांना, असे ज्ञान ॥ ०तरी तें नसे, सत्य ज्ञान ॥
॥ ०सारे भ्रमिष्ट, अज्ञान ॥ ०कां न ह्मणावे, संतानी ॥ ८ ॥
॥ ०असो ऐशी ही, जगत् रिती ॥ ०माया मोह हा, कवण्या रिती ॥
॥ ०न जाणण्याची, जोवर स्थिती ॥ ०तोवरि दोष, लावू नये ॥९॥
॥ ०जागे करुनी, समजाविलें ॥ ०तथापि लक्ष, नचि दिलें ॥
॥ ०तरी त्यांनीं, अनहित केले ॥ ०स्वयें कूपीं, पडोनिया ॥ १० ॥
॥ कर्म मात्रांचे, बीजद्रुम ॥ उठवणें हेंचि, मोठें काम ॥
॥ जीव अज्ञानें, बेफाम ॥ राहोनि फळें, भोगिती ॥ ११ ॥
॥ कर्म चक्रीं, भ्रमले जीव ॥ कदां न जाणती, सदाशीव * ॥
॥ प्रपंचाचा करोनि, व्यूह ॥ जन्मोनि व्यर्थ, मरताति ॥ १२ ॥

---

* विदुप म्हणजे विद्वान. * शिव म्हणजे कल्याणं. ( सदैव कल्याण असा सदाशिव शब्दाचा अर्थ असून श्री शंकर तसाच आहे असाही अर्थ आहे ) ॥ कल्याणं मंगलं शिवं. ॥

॥ इतुके तीक्ष्ण, बोलणें पुरे ॥ लक्ष देतां, वृत्तीच मुरे ॥
॥ ज्ञानी करावीं, पामरें ॥ हेंचि ब्रीद, संतांचें ॥ १३ ॥
॥ जाणिव नेणिव हें, जाणणें ॥ असत् जड दुःख, ओळखणें ॥
॥ कार्य कारण, भावें पाहाणें ॥ अनंतर ब्रह्म, चर्चा ॥ १४ ॥
॥ संत संगतीं, सद्गुरूकृपा ॥ प्राप्त होतां, जाणी पातका ॥
॥ पश्चात्तापें, आचरी तपा ॥ पुण्यरूपी, होतसे ॥ १५ ॥
॥ ऐशी पात्रता, येता अंगीं ॥ अज्ञानातें. तोच भंगी ॥
॥ परब्रह्मीं, येता गुंगी ॥ जीवन्मुक्त, होईल कीं ॥ १६ ॥
॥ आपण कोण हें, न जाणणें ॥ ऐसे तरी, आपण जाणणें ॥
॥ ऐसे असतां, कांहीं न उमजणें ॥ हेंच अज्ञान, भ्रांतीनें ॥ १७ ॥
॥ अज्ञानाच्या, वृथा भासें ॥ ज्ञान नुपजे, ऐसें दिसे ॥
॥ तरी तेंच ज्ञान, प्रकाशे ॥ विवेकीं, अनुभव, येतसे ॥ १८ ॥
॥ ज्ञान, अज्ञानाच्या, भावा ॥ दोन्हींच्याही, भेद प्रभावा ॥
॥ विरुद्ध जाणण्यार्थ, निदिध्यास घ्यावा ॥ तेव्हांचि ज्ञान, लाभेल कीं ॥ १९ ॥
॥ मति मंदच, अज्ञानी स्वयंभू ॥ ज्ञानाचे, नाचि उठवी, तरंगु ॥
॥ ब्राह्मी पाला, खावोनि भंगु ॥ होवोनि प्रज्ञा, वाढतसे ॥ २० ॥
॥ ज्ञान्या संगती, अज्ञानी ॥ श्रवण मननें, होय ज्ञानी ॥
॥ होतां होतां, तोच ज्ञानी ॥ होवोनि पावे, ज्ञानातें ॥ २१ ॥
॥ जया प्रपंचीं, उत्तम ज्ञान ॥ त्याचें न राहे, अज्ञान ॥
॥ ऐसा भरवसा, जाणून ॥ ब्रह्म ज्ञानार्थी, झटावें ॥ २२ ॥
॥ एकेक अज्ञान, सुटतसे ॥ तितुकेंचि ज्ञान, होतसे ॥
॥ क्रमा क्रमानें, हें घडतसे ॥ हाची अनुभव, ज्ञानाचा ॥ २३ ॥
॥ गुरूपदेशीं ठेवणें, लक्ष ॥ वर्जावे शिष्यें, भक्षाभक्ष ॥
॥ सूक्ष्माहारें, लागे लक्ष ॥ येई अनुभव, मूढाशीं ॥ २४ ॥
॥ उदका सारिखे, प्रवाही ॥ मन हें विषयीं, नित्य वाही ॥
॥ कर्मानु सारें, जग हें वाही ॥ प्रपंचाच्या, भारानें ॥ २५ ॥
॥ कर्मानुसार, बुद्धी असे ॥ ह्मणोनि सत्कर्म, करा तैसे ॥
॥ तया कधीं न लागे पिसें ॥ ज्ञान प्राप्ती, कर्मांत ॥ २६ ॥
॥ चित्त शुध्यर्थ, कर्म कीजे ॥ तेंही सत्कृत्य, आचरिजे ॥

॥ कर्म करतां, ज्ञान पाहिजे ॥ अंतीं मोक्ष, लाभेल कीं ॥ २७ ॥
॥ राहोनि स्वधर्मीं, कर्म कीजे ॥ तया शुद्धत्व, भाविजे ॥
॥ ज्ञान प्राप्ती, सुगम होईजे ॥ बावडा न होय, ज्ञातींत ॥ २८ ॥
॥ धर्म कर्माचीं, भांडणें ॥ वृथा न करावीं, तंडणें ॥
॥ नसे कांहीं, होणें जाणें ॥ व्यर्थ कासया, शीण हा ॥ २९ ॥
॥ पाखांड वादातें, जाणुनी ॥ अलक्ष करावे, नेणुनी ॥
॥ आस्तिक भावें, सदा वर्तोनी ॥ तरीच लाभेल, परमेश्वरू ॥ ३० ॥
॥ सद्‍गुरूचरणीं, भाव ठेवी ॥ अज्ञान निरसुनी, ठाव घेई ॥
॥ मुक्ति द्वारीं, पाय ठेवी ॥ परतोच नये, माघारी ॥ ३१ ॥
॥ ऐशा निश्चयें, ज्ञान लाभे ॥ ज्ञाता होय तो, स्वभावें ॥
॥ जाणील ब्रह्म तो, स्वस्वभावें ॥ सत्फुर्ती दासी, होय कीं ॥ ३२ ॥
॥ स्फुर्ती जवळी, ब्रह्म असे ॥ तें न दिसतां, भावतसें ॥
॥ कळणें सांगणें, उरत नसे ॥ अनुभवें आनंद भोगावा ॥ ३३ ॥
॥ जरी हें ज्ञान सांगितलें ॥ तरी तें पाहिजे, अभ्यासिलें ॥
॥ श्रमावाचोनी, व्यर्थचि गेलें ॥ मग तें अज्ञान कायम ॥ ३४ ॥
॥ ज्ञान हें विवेकें, अभ्यासुनी ॥ करिती सूक्ष्म, महामुनी ॥
॥ हें महत् तत्व, जाणोनी ॥ आत्मानंद साधावा ॥ ३५ ॥
॥ ब्रह्म दिसावें, ऐसें ह्मणणें * ॥ घनानंद स्पष्ट, सांगणें ॥
॥ अनुभवी आणा, हें ह्मणणें ॥ अनुभव येतां, नुरेच कीं ॥ ३६ ॥
॥ दृश्य द्रष्टा, आणि दर्शन ॥ तिन्ही भावना, विलक्षण ॥
॥ एकलेचि एक, आपण ॥ ज्ञप्ति मात्र, सत्य कीं ॥ ३७ ॥
॥ दृश्य दर्शन , जेथें हरपे ॥ तेथें द्रष्टा, उरे स्वरूपें ॥
॥ अखंड आपण, आपणातें ॥ निरामयेंची, अनुभवी ॥ ३८ ॥
॥ ब्रह्मानु भवा, परतें सुख ॥ नसे ब्रह्मांडीं, सर्व असुख ॥
॥ यासाठींच, झटती चोख ॥ परमहंस, ज्ञाते कीं ॥ ३९ ॥
॥ एवं अज्ञान, निरसुनी ॥ पाविजे ज्ञान, रिझोनी ॥
॥ पावावे, अमृताच्या सेवनीं ॥ परमामृता, तुनी च कीं ॥ ४० ॥

---

* न दिसणारें दाखवा असें म्हणणें हेंच अज्ञान आहे. न दाखवले गेले ह्मणजे खोटें ह्मणणें हें चुकीचें आहे.

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते अज्ञाननिरसन नाम दशम प्रकरणं संपूर्णम् ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या ३० असून त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केली नाहीं परंतु हृदगतार्थानुसार भाषा भेद केला. } शिष्याच्या सबंध ओंव्या प्रारंभींच एक तागाईत १० आहेत त्या सांप्रतच्या स्थितीस अनुलक्षून करणें बरें वाटतें.

## ॥ प्रकरण ११ ॥

### ॥ अथ अभ्यासनिदिध्यास निरूपण प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ दाहीं प्रकरणीं, सांगितलें ॥ अनुभवावे तें, निर्धार वलें ॥
॥ तेंच स्वरूपीं, अभ्यासिलें ॥ ०तरीचि कार्य, होतसे ॥ १ ॥
॥ वसण्यासाठीं, एकांत स्थान ॥ जेथें चंचल, न होय मन ॥
॥ सकल वृत्ती तें, आवरून ॥ ०वैसे निश्चल, मृद्वासनीं ॥ २ ॥
॥ करी निवृत्ती, विषयाची ॥ मनैकाग्रता, चित्ताची ॥
॥ दृश्य मात्रीं, विरक्तीची ॥ तरीच लाभे, कर्म फल ॥ ३ ॥
॥ ०*देह बुद्धी तें, सोडुनी ॥ ०जीव बुद्धी तें, त्यागुनी ॥
॥ ०आत्म बुद्धी तें, धारण करोनी ॥ ०अंतरा माजीं, प्रवेश करी ॥४॥
॥ मनेंद्रियांना, आवरुनि ॥ स्थूलाभिमान, सोडुनी ॥
॥ शुद्ध भावातें, धरोनी ॥ आकाश पाही, अंतरींचें ॥ ५ ॥
॥ स्थूल इंद्रिया, मधून ॥ युक्तीनें एक, वटी मन ॥
॥ तें अंतरा, काशीं नेऊन ॥ तेथेंचि स्थीर, करावें ॥ ६ ॥
॥ जेव्हां मन वृत्ती, चपल धावे ॥ तेव्हां त्यांना, परतवावें ॥
॥ ऐशा यत्नें करूनि स्थिरावें ॥ अभ्यासें, समर्थ होईजे ॥ ७ ॥
॥ ०जिकडे मन हें, लाळ घोटी ॥ ०मारावी झडकर, साशी काठी ॥
॥ ०मग, न, लागे, तयाच्या तें पाठी ॥ ०निर्लज्यत्वें, वर्ततसे ॥ ८ ॥

---

* हनुमान ह्मणतात हे रामा ॥ देह बुध्या तु दासोहं, जीव बुध्या त्वदंशकः ॥ आत्म बुध्या त्वमेवाहं, इति मे निश्चलांमतिं ॥१॥ भावार्थ देहबुद्धीनें मी तुझा दास. जीवबुद्धीनें मी तुझाच अंश आणि आत्मबुद्धीनें तूं व मी एकच आहोंत. अशी माझी दृढ भावना आहे. अशा तीन प्रकारच्या दृष्टी आहेत.

॥ ज्या ज्या विषयांतें, मन धरी ॥ जें जें मूर्खत्वें, आचरी ॥
॥ मूर्ख ह्मणवुनी, घेई जरी ॥ ०कल्पना त्यागी, सत्वरतें ॥ ९ ॥
॥ हृदयाकाशीं, जातां, सत्वरी ॥ जीवाशि मीपणा, अंतरी ॥
॥ स्फूर्ति स्फुरे तीं, झट करी ॥ अनुभव ज्ञानें, कळेल कीं ॥ १० ॥
॥ जीव हा अंतःकरणाधिन ॥ अंतःकरणीं, होतें स्फुरण ॥
॥ पुनरपि तेथेंचि, त्याचें मरण ॥ स्फुर्तीच नष्ट, होतसे ॥ ११ ॥
॥ जीव बुद्धीच्या, कल्पना ॥ नास्तिकत्व येतें, झटकर मना ॥
॥ तेणेंच वेड लागे, सर्वां जना ॥ ह्मणोनि संत, उमजाविती ॥ १२ ॥
॥ नदी उगमींचें, नीर वाहे ॥ तेंचि होतसे, सिंधु पाहे ॥
॥ तैसा जीव ब्रह्मीं, लवलाहे ॥ पावतो यत्नें सिद्धीनें ॥ १३ ॥
॥ ऐसा सिद्धांतें, अभ्यंतरीं ॥ निश्चय होतो, ऐशापरी ॥
॥ कल्पना नुरती, त्या अवसरीं ॥ ब्रह्मीं समरस, होतसे ॥ १४ ॥
॥ जेथें जें जें, दृश्यत्वें स्फुरे ॥ तें तें त्यागोनी, माघारे ॥
॥ यावें आत्म स्वरूपीं, निर्धारें ॥ अपुले आपण, व्हावया ॥ १५ ॥
॥ ०बाह्य देखणें, तेचि आंत ॥ ०एक दिसे, दुजे कल्पित ॥
॥ ०न ठेवावे, तेथेंचि चित्त ॥ ०ऐसा मार्ग, सहजच कीं ॥ १६ ॥
॥ साकारादिक, अवघें शून्य ॥ न होय देह बुध्यां, तें न्यून ॥
॥ तरी आपण कोण पहातां, जाण ॥ आत्मरूप, प्रगटतें ॥ १७ ॥
॥ जैसा वाढतां, अंधार ॥ माथ्यावरी, नीर पूर ॥
॥ न भासे दुजा, आकार ॥ चित्त ऐक्य व्हावें तसे ॥ १८ ॥
॥ जैसें कुर्म, आकुंचिलें ॥ कर चरण शीर, आंत नेलें ॥
॥ आपणाचि, आपणत्व, उरलें ॥ तैसें व्हावें, एकाग्र ॥ १९ ॥
॥ ०नाभी पासूनी, श्वास उठत ॥ ०मन आणावें, त्या समवेत ॥
॥ ०*सोहं शब्दें, होतसे मात ॥ ०ऐशी एकाग्रता, अनुभवी ॥ २० ॥
॥ जागृतींत ज्ञान, प्रकाशतां ॥ आपण, एकलाची, तत्वता ॥
॥ ब्रह्म स्थितीतें आणितां, आणितां ॥ ब्रह्ममयीच, होतसे ॥ २१ ॥

---

* सगुण ध्यान मान सोपचार पूजेंत दासोहं ( दासः अहं मी दास व तूं धनी असें असतें. ) पुढें सोहं ( सः अहं ह्म. तूं तोच मी असा होतो. ) पहिली भावना जाऊन दुसरी भावना धारण झाली म्हणजे मीच ब्रह्म असा दृढ निश्चय होतो.

॥ ज्याचा तोचि, एकाकी ॥ नसे आप्त, मामा काकी ॥
॥ वृथा मोहें गुंतु, नको कीं ॥ प्रपंच ऐसा, निरसावा ॥ २२ ॥
॥ आत्म्याहूनी, देह पृथक ॥ ऐसा होतां, पूर्ण विवेक ॥
॥ स्वदेहींच, होई तुटक ॥ आपणचि, एक ब्रह्म मानी ॥ २३ ॥
॥ जोंवरि मी, एकटा न मानी ॥ तोंवरि व्यर्थचि, अभ्यासणी ॥
॥ घुटमळतो जाण, प्रपंच मनीं ॥ आसक्तिनें, सर्वदा ॥ २४ ॥
॥ देहावर येतां, प्रपंच भरी ॥ होवोनि राहे, सदाचारी ॥
॥ परमार्थ साधनीं, देहचि विसरी ॥ तोचि साधील, दोन्ही अर्थ ॥ २५ ॥
॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते अभ्यास निदिध्यासनिरूपण नाम एकादश प्रकरणं संपूर्णम् ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या ११ त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण ३ केल्या हेत्वर्थ राखून शब्दांत थोडा फरक केला. } शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या ४ त्या ४।८।१६।२०.

---

## ॥ प्रकरण १२ ॥

### ॥ अथ स्वानुभव सौख्य वर्णन प्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥
॥ हर्षे रोमांच, उठताति ॥ अष्ट सत्वभाव, प्रगटताति ॥
॥ पावे साम्राज्य, संपत्ति ॥ रंकाचा होई, राव जैसा ॥ १ ॥
॥ चित्त चैतन्यीं, हारपे ॥ राहिजे तें शुद्ध, ज्ञप्तिरूपें ॥
॥ अखंडित तें, आपोआपे ॥ ब्रह्मानंदीं, पावतसे ॥ २ ॥
॥ तया सुखाच्या, उत्तम रसा ॥०कोणी न लावी, कसोटी कसा ॥
॥ गोडीस्वादें, आनंद तैसा ॥ केवळचि, अनुभवी जाणती ॥ ३ ॥
॥ अमृत चाखी, अपुल्या चवीं ॥ अवर्णनातें, अनुभवी ॥
॥ तेथें, कोणीच, साधू, नाठवी ॥ नासक्या, सडक्या, प्रपंचाशी ॥ ४ ॥
॥ वोलता स्वानं, दाचा धर्म ॥ आठवे सौख्य, परिपूर्ण ॥
॥ तेणें करोनी, ज्ञाता सुजाण ॥ ब्रह्मीं गर्क, होतसे ॥ ५ ॥
॥ अहंता स्वरूपीं, सहज गळे ॥ विषय तृष्णा, समूळ टळे ॥

॥ इंद्रियाचे, सर्वही लळे ॥ सहजासहजीं, नष्ट होती ॥ ६ ॥
॥ महा सुखाचें, आगरीं ॥ भोगिते, अनुभवी, सुंदरी ॥
॥ तैसे केवळ, ज्ञाने करोनी ॥ ०संत आनंदीं, सदोदित ॥ ७ ॥
॥ निरसतां, सर्वही नेणिव ॥ स्वरूपीं समरसें, जाणिव ॥
॥ मग एकछत्री, केवळ राणिव ॥ होते तैसें, योगियाशीं ॥८ ॥
॥ सदा स्वानंदित, सोहळे ॥ विजातीय विषयीं, मन वितळे ॥
॥ आत्म सौख्याच्या, ची मेळे ॥ इंद्रिय तृप्ती, आपोआप ॥९ ॥
॥ परम सौख्या, चिया बळें ॥ एकही स्फूर्ति, नचि स्फुरे ॥
॥ कर्मे सर्व जातींचीं, विसरे ॥ एकाएकीं, निमिष्यांत ॥ १० ॥
॥ करोनि यज्ञाचीं, बहू कोडीं ॥ उभारती ते, स्वर्गीं गुढी ॥
॥ तें वैभव सौख्य, करावे कुवंडी ॥ ब्रह्म सौख्या, वरोनियां ॥ ११ ॥
॥ आनंद, आनंदाशीं, घोटी ॥ परापरेशीं, सहज लोटी ॥
॥ ताहून पलीकडे घाली मिठी ॥ गळा पडे, परब्रह्मीं ॥ १२ ॥
॥ ०मुक्यानें स्वानुभवींच्या, गोष्टी ॥ ०करू ह्मटले, तरी कष्टी ॥
॥ ०सांगो सांगी, न होय तुष्टी ॥ ०अनुभवाविणें, व्यर्थच कीं ॥१३॥
॥ ०हुताशनी, होते वटवट ॥ ०बालकें विभक्तें, कटकट ॥
॥ ०करिती, परंतु नुसती चावट ॥ ०नानुभवीं, तीं सर्वथा ॥ १४ ॥
॥ ०सुख दुःखाचा, अनुभव ॥ ०साखर गोडी, ची ही चव ॥
॥ ०अनुभव न देतां, सर्व वैभव ॥ ०देतां येते, सहजपणें ॥ १५ ॥
॥ ०दोघे अनुभवी, जाणती ॥ ०खुणा मुद्रांनीं, समजती ॥
॥ ०त्वरित परिक्षा, करितातीं ॥ ०त्यांना खोटें, नसेच कीं ॥ १६ ॥
॥ ०ब्रह्म ज्ञानाची, नावडी ॥ ०ते वाहती, संसारी कावडी ॥
॥ ०तशा मूढा, काय गोडी ॥ ०लागावी ती, कवण्यापरी ॥ १७ ॥
॥ ०ब्रह्म सौख्यातें, अनुभवणें ॥ ०व्यर्थ होते, तें अनुवादणें ॥
॥ ०जो अनुभवील, तोचि जाणे ॥ ०अन्यमूढ, वृथापरी ॥ १८ ॥
॥ ०ब्रह्म प्राप्त्यर्थी, झट झटावें ॥ ०सतगुरूशीं, शरण जावें ॥
॥ ०कृपा संपादुनी, भावें ॥ ०परम अर्थ, साधावा ॥ १९ ॥
॥ ०ब्रह्मानंदाचें, आगर ॥ ०अनुभवा, पूर्वी जो पामर ॥
॥ ०ज्ञानबले, होतो जो अमर ॥ ०ब्रह्मीं ब्रह्म, होवोनिया ॥ २० ॥

॥ इति श्री परमामृतें मुकुंदराजविरचिते स्वानुभव सौख्यवर्णन नाम द्वादश प्रकरणं संपूर्णम् ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या १२ आहेत. } शिष्याच्या सबंध नवीन ओंव्या ८
त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या २. } त्या १३ पासून २० पर्यंत.

---

## ॥ प्रकरण १३ ॥

### ॥ अथ मुक्तरहस्य निरूपण प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ पावोनिया, योग खुण ॥ स्वानंद भोगी, परिपूर्ण ॥
॥ ऐशा योगिया, न घडे शीण ॥ कदापि देहीं, संसारीं ॥ १ ॥
॥ झाला ब्रह्म जो, आपण ॥ जाणावा योगी, तोचि पूर्ण ॥
॥ सदा सर्वदा, स्वानंदीं निमग्न ॥ ज्ञप्ति मात्रें, उरोनिया ॥ २ ॥
॥ संकल्प विकल्प, नचि उरती ॥ होता केवळ, ब्रह्म स्थिति ॥
॥ ०नुरे कोणीच तो, ऐशा रिती ॥ ०तोचि ब्रह्म, जाहाला ॥ ३ ॥
॥ साधन असाधन. खुंटलें ॥ करणें अकरणेंचि, मोडलें ॥
॥ ०ऐसे ब्रह्म अंगीं, बाणलें ॥ ०तोचि ब्रह्म, जाहाला ॥ ४ ॥
॥ नाहीं धारणा, नसे ध्यान ॥ नाहीं समाधी, ना आसन ॥
॥ चळचळीत तेथें, आनंदघन ॥ कर्मातीत, ब्रह्म तो ॥ ५ ॥
॥ माया पीडीते, भुवनत्रयीं ॥ तीच क्रीडतें, *अवस्थात्रयी ॥
॥ स्फूर्ति प्रकृति, पुरुषलयीं ॥ अलिप्त, योगी, ब्रह्मरूपें ॥ ६ ॥
॥ विश्वीं घोराची, कडसणी ॥ सर्वथा नुरे ती, अंतःकरणी ॥
॥ पाप पुण्याची, दुःख काहाणी ॥ ०नचि उरे, ती, सांगावया ॥७॥
॥ शुभाशुभाचीं जरी फळें ॥ बाधक असती, वेळोवेळे ॥
॥ ऐशा योगिया सर्वही टळे ॥ जीवन्मुक्त, होता पै ॥ ८ ॥
॥ बद्ध मोक्षार्थी, कथा वार्ता ॥ नाचि ऐके तो, सर्वथा ॥
॥ सहजचि अखंडीं, शाश्वता ॥ तोचि योगी, ब्रह्मरूप ॥ ९ ॥
॥ जें जें सुटलें, मनातुनि ॥ तें तें गेलें, वाहूनी ॥
॥ करणें अकरणें, व्यर्थचि होऊनी ॥ होतो निरंजन निर्विकार ॥१०॥

---

* उत्पत्ति, स्थिति, लय हें अवस्थात्रय समजावें.

॥ ऐसें होवोनी, निभ्रांत ॥ न कळो देती, अपुला अंत ॥
॥ जगता माजीं, दाखवीत ॥ भक्ति रहस्यें, करोनिया ॥ ११ ॥
॥ ज्ञान वैराग्यें, भक्ती करून ॥ दाविती स्वदेहीं, जडवून ॥
॥ ०परी अंतरीची, त्यांची खुण ॥ न कळे कोणा, *तशाविणें ॥१२॥
॥ कथा कीर्तनीं, नित्य असक्त ॥ स्मरण, विस्मरणही, नेमस्त ॥
॥ क्षणोक्षणीं, उच्चारीत ॥ नाम घोष, सतूगुरूचें ॥ १३ ॥
॥ ज्ञानी भोगिती, ब्रह्मरहस्य ॥ सदा सर्वदा, सतूगुरूदास्य ॥
॥ करिती अभेद बुध्या, नेमस्त ॥ तेचि सत्संत, जाणावे ॥ १४ ॥
॥ परब्रह्मीं ज्याची, ऐक्यता ॥ ऐक्यत्वें चिंतन, तत्वता ॥
॥ सन्मान देती ते, साधूसंता ॥ अत्यानंदें करोनिया ॥ १५ ॥
॥ विश्वीं एक, परमेश्वरु ॥ सर्व व्यापी, तो सतूगुरु ॥
॥ ह्मणोनि सर्वाभूतीं, आदरू ॥ करिती जाणा, समदृष्ट्या ॥ १६ ॥
॥ हृदय जयांचें, कोमल ॥ सदा शुचिष्मंत, निर्मल ॥
॥ निरंतर जे, आचारशील ॥ पवित्र वृत्ती, राहताती ॥ १७ ॥
॥ नाचि पहाती, मानापमान ॥ निंदास्तुती ही, समसमान ॥
॥ सदैव समाधानी, ज्यांचें मन ॥ ऐसेंचि आचरण, जयांचें ॥ १८ ॥
॥ सुखें दुःखें, समे गणती ॥ लाभ हानी, समे पहाती ॥
॥ दीनावर, ते, कृपाचि करिती ॥ हेंचि लक्षण, मुक्तांचें ॥ १९ ॥
॥ सदा विवेकी, चित्तवृत्ती ॥ पडो न देती, ते विस्मृति ॥
॥ सावधानें अहो, रात्रीं ॥ आत्मरूपीं, आनंदित ॥ २० ॥
॥ दावी तो, केवळ, पिशाचलीला ॥ ०स्मशानी नगरीं, नसे वेगळा ॥
॥ ऐसा असोनी, जगा वेगळा ॥ आचार ऐसे, ठेवीतसे ॥ २१ ॥
॥ ०फला सक्ती, मुळींच नसे ॥ ढोंग धत्तुरे, महत्व तसे ॥
॥ ०कदा न दावी, वसवसे ॥ आपण काय, जाणिले ॥ २२ ॥
॥ विश्व साक्षी, योगिराणा ॥ जाणे सर्वांतरिच्या खुणा ॥
॥ तरी तो वाटे, वेडाचि जना ॥ भ्रमिष्ठा सारिखा, दिसतसे ॥ २३॥
॥ असतां जरी, लोकामाजीं ॥ ब्रह्मकर्मं, सर्व साजी ॥
॥ राहे तोची, सहजा सहजी ॥ ब्रह्मरूपें, हिंडतसे ॥ २४ ॥

---

* अंतस्थ कर्म गुप्त ठेवून बाह्याकारी निराळेंच दांभीक वर्तन जार जारिणी ठेवतात तद्वत.

॥ आपणचि एक, परमेश्वर ॥ कोणा सांगेना, व्यवहार ॥
॥ ०आहार निराहार साचार ॥ ०ऐसा ब्रह्मीं, हिंडतसे ॥ २५ ॥
॥ वेडीं कृत्यें, दावीतसे ॥ विश्व तयाशीं. हांसतसें ॥
॥ तरी तयाशीं, नाहीं पिसे ॥ अद्वैतानंदें, ज्ञानी तो ॥ २६ ॥
॥ ऐशा स्थितीनें, राहणें बरें ॥ ब्रह्मीं संचरणें, हेंचि खरें ॥
॥ बरें वाईट, होणें जाणें ॥ स्मरेना कदापि, सर्वदा ॥ २७ ॥
॥ विश्व अपुले, भोग भोगो ॥ स्वात्म्य सौख्य, नचि सांगो ॥
॥ कांहीं न देतां, अंगीं लागो ॥ निस्पृह वेड, दावोनिया ॥ २८ ॥
॥ ब्रह्मीं रत होतां, एक देशीं ॥ विरुद्ध भावना, जगताशीं ॥
॥ होते स्थिती, सहजीं पाहशी ॥ तरी, न, नेम, सर्वथा ॥ २९ ॥
॥ ०स्वतः शरीरें, सर्वचि दिसे ॥ ०हेंच तयाचे, वाटे पिसें ॥
॥ ०लोक ह्मणती, ऐसे कैसे ॥ तरी तोचि सत्य, ब्रह्मरूप ॥ ३० ॥

॥ इति श्री परमामृते मुकुंदराजविरचिते मुक्तरहस्य निरूपण नाम त्रयोदश प्रकरणं संपूर्णम् ॥ श्री ब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजाच्या ओंव्या २९ पैकीं चार तुकें मुळींच नष्ट झाली. बाकींच्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या त्या ११ मिळून ओंव्या २८.

शिष्यानें सबंध नवीन ओंव्या २ केल्या त्या २२।३० चार तुकें नष्ट झाली त्याऐवजीं एक ओंवी रचून तिसांची भरती झाली.

---

**गोष्ट १** अक्कलकोटचे स्वामी वरील लक्षणाप्रमाणें बालोन्मत्त पिशाचवत् होते हें अनेक लोकांनीं पाहिले होतें. जेव्हां कोणी अधिकारी योग्य ज्ञाता त्यांच्याकडे येई त्याकाळीं ते वेदांतांत अत्यंत सुरस भाषण करीत असत. त्यावेळीं त्यांना वेडे कोणी ह्मणत नसत. अन्य वेळीं ते वेड दाखवीत असत. हा अलीकडील प्रत्यक्षानुभव आहे.

**गोष्ट २** वाईचे गोपाळ बोवा अनेकांनीं पाहिलेले आहेत. त्यांचे असेच बालोन्मत्त पिशाचवत् वर्तन असे; परंतु एकांतीं ते जेव्हां भजन करीत असत त्यावेळीं त्यांना वेडे कोणी ह्मणत नसत. एरवीं वेडे दिसत.

**सूचना**—ज्या परमहंसाच्या वैराग्यांत सत्वांश कमी पडतो व तमांशाची वृद्धी होते त्याचा परिणाम असा होतो. आणि सत्वाच्या आधिक्यानें असें होत नाहीं. अनगांव कवाडचे सखाराम बोवा व नाशिकचे रघुनाथ बोवा व खेडचे चंडीराम बोवा असें वेड दाखवीत नव्हते.

## ॥ प्रकरण १४. ॥

॥ अथ साक्षात्कार निरूपण प्रारंभः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
॥ गुरुचरण धरी, जीव प्राणे ॥ गुरुवचनीं, तत्पर राहणें ॥
॥ न लाभे ब्रह्म, तयाविणे ॥ ० तेंचि द्वार, सत्य कीं ॥१ ॥
॥ ० गुरु शिष्य देह, दिसती भिन्न ॥ ० कृपा होतां, अविच्छिन्न ॥
॥ गुरूचे गुण, शिष्यांगीं भरून ॥ ०आपणाहूनी, श्रेष्ठ इच्छी ॥२॥
॥ गुरुकृपेनें, चि, ब्रह्म प्राप्ती ॥ साक्षात्कारेंचि होय, प्रदीप्ती ॥
॥ प्रेमभावें होतसे, तृप्ती ॥ अनुभवें, महिमा, कळेल कीं ॥ ३ ॥
॥ शेंदाडें पिकोनी, देठीं तुटती ॥ तैशीं दृष्टांत, भुतें उठती ॥
॥ जीव देहीं, ऐसेच होती ॥ ० तरीच त्राता, गुरु राज ॥ ४ ॥
॥ब्रह्म चिकित्सा, श्रवण करी ॥ मननें निदिध्यासें, अंतरीं ॥
॥ सदा सर्वदा, लक्ष धरी ॥ परमात्म्याच्या, ठायीं तें ॥५ ॥
॥ याविषयीं जो, महा आळशी ॥ तयाप्राप्ती, होय कैशी ॥
॥ सद्गुरूचा तो, उपदेशी ॥ ह्मणोंचि नये, सर्वथा ॥ ६ ॥
॥ ०प्रथमारंभीं, मूर्ति, पूजन ॥ ०उपरांत धरावें, स्मरण ध्यान ॥
॥ ०सगुण मूर्तिचें, मानसें पूजन ॥ उपरांत जावें, निर्गुणपदीं ॥ ७ ॥
॥ केशरी भात, उत्तम खरा ॥ ०परी साध्याविणें, तो न, खरा ॥
॥ ०ऐशा पायरीनें, करी त्वरा ॥ ०अभ्यासें जाणें, ब्रह्मानुभव ॥ ८ ॥
॥ ०मोक्षा साठीं, ज्ञान श्रेष्ठ ॥ ०संपादी ब्रह्म, विद्या ज्येष्ठ ॥
॥ ०राहूंच नये, कधींही कनिष्ठ ॥ ०हाची अंत, ज्ञानाचा ॥ ९ ॥
॥ ऐसा क्रमावा, कर्म मार्ग ॥ अभ्यासें, तोच वाटे, सुमार्ग ॥
॥ नचि धरावा, अन्य कुमार्ग ॥ ०आयुष्य वृथा, दवडूं नये ॥ १० ॥
॥ ०मूर्ती कल्पितां, साक्षात्कार ॥ होतसे सत्य हा, निर्धार ॥
॥ ०केव्हां होईल तें, साचार ॥ ०सांगताच येत, नसे कीं ॥ ११ ॥
॥ ०ज्ञानी चेष्टा, देव दाविती ॥ ०ऐशीच आहे, यांची रिती ॥
॥ ०सांगावें हें तरी, कवणा किती ॥ ०अनुभवानुसार, कळेल कीं ॥१२॥
॥ ०आवडत्या देवाचे, ध्यान धरी ॥ ०तया देखोनी, ऐकाग्र करी ॥
॥ मानसे पूजेनें, उपचारी ॥ ०लक्ष, न, दवडी, दुसरीकडे ॥ १३ ॥

॥ ०ऐसें होतां, दिसें ध्यान ॥ ०धर सोडीचे तें, अपुरे जाण ॥
॥ ०प्रारंभीं ऐसेंचि तें, अधिष्ठान ॥ ०सर्वही योग्या होतसे ॥ १४ ॥
॥ अभ्यासानें, स्थिरता स्थिरतां ॥ ध्यानावधीची, वृद्धिंगता ॥
॥ होता जाणा, अनुभवितां ॥ लक्ष न सुटे, साधकाचें ॥ १५ ॥
॥ ऐशा ध्यानीं, तंद्रा लागून ॥ सजीवत्व भासें, मूर्तीतून ॥
॥ खुणा मुद्रा, संज्ञे कडून ॥ देवता हेतू, दर्शवितें ॥ १६ ॥
॥ कोटि यज्ञ फल, निमिष ध्यानें ॥ ऐशी पुण्यराशी, अमुप होणें ॥
॥ तदनंतर साक्षात्कार, होणें ॥ तो सुखानंद, स्वतार्शी ॥ १७ ॥
॥ हें सौख्य तूंची, अनुभवी ॥ गुप्त ठेवानंद, साठवी ॥
॥ सत्पात्रतेनें, देवता आठवी ॥ साक्षात्कार, भराभर ॥ १८ ॥
॥ हा द्वैतानंद, ज्याचा त्याशीं ॥ हें गुज न सांगे, कवणाशीं ॥
॥ • गुरु मित्र, यांच्या पाशीं ॥ तेंही क्वचितच, सांगावें ॥ १९ ॥
॥ मूर्तांत अमूर्त, सगुणी निर्गुण ॥ द्वैताद्वैत, एकचि गुण ॥
॥ तरी भासताति, द्विगुणी गुण ॥ ऐशी माया, तेथें असे ॥ २० ॥
॥ द्वैता वांचुनी, प्रेम नाहीं ॥ हस्तपादादि, द्वैत पाही ॥
तरी एकच देह, लवलाही ॥ ऐसेच द्वैताचें, अद्वैत ॥ २१ ॥
॥ ऐशा भावें, भक्त देव ॥ द्वैत अद्वैत, स्वयमेव ॥
॥ भिन्न भासे, वृथा सदैव ॥ तीच भ्रांती, टाकिजे ॥ २२ ॥
॥ भ्रांती जातां तो, तूं मीच ॥ नुरे तूं मी, एकटाच ॥
॥ रहातो केवळ, ब्रह्मस्वरूपच ॥ तीच मुक्ती, सायुज्यता ॥ २३ ॥
॥ भजावे सगुण, निर्गुणा प्रती ॥ ऐसे पावावे, ब्रह्मा प्रती ॥
॥ पापाची होय, समूळ निष्कृती ॥ ऐसा मार्ग मुक्तीचा ॥ २४ ॥
॥ हें ब्रह्म गौप्य, गुप्त ठेवणें ॥ अनुभव कोणा, न सांगणें ॥
॥ देवतांचें, गुप्त रहाणें ॥ स्वस्वभावें, करोनिया ॥ २५ ॥
॥ साक्षात्कार, उघडे करिशी ॥ अपात्र ह्मणोनि, वृथा ठरशी ॥
॥ उत्तम लाभ, बुडेल सर्वस्वी ॥ हानी होईल, तत्काळ ॥ २६ ॥
॥ ०मंत्र तंत्र कारस्थान ॥ ०उघडे करतां, जातो मान ॥
॥ ०न ठेवी हें जो, अनुसंधान ॥ ०पावे हानी, सर्वथा ॥ २७ ॥
॥ भोळ्या भाविकां, भजन पूजन ॥ ज्ञान्या साठीं, आत्म ज्ञान ॥

॥ विज्ञान्यासाठीं, ब्रह्मोपासन ॥ ऐशा उपासना, जाणिजे ॥ २८
॥ अपात्राशीं, पात्र करितां ॥ गुरू शीणतो, सर्वथा ॥
॥ कधीं यशाची, नसेच वार्ता ॥ ऐसा शिष्य, नसावा ॥ २९ ॥
॥ हें ब्रह्म गौप्य, मूढाशीं ॥ सांगू नको, अलभ्य त्याशीं ॥
॥ गुज ऐकोनी, चाहाटळपणाशीं ॥ वृथा मूर्ख, उठवूं नको ॥ ३०
॥ हृदयांतरीं हें, गुप्त राखीं ॥ परमामृत हें, तूंचि चाखीं ॥
॥ न देई तुज कोणी, पालखी ॥ व्यर्थ कासया, वटवटावें ॥ ३१
॥ ०निर्गुण ब्रह्माचें, ज्ञान झालें ॥ ०त्या भावें सगुणीं, लक्ष ठेविलें
॥ ०तरी दोन्ही स्थानीं, पाउलें ॥ ०घसरोनि न पडती, सर्वथा ॥
॥ ध्यान ध्याइजे, परम प्रीतीं ॥ तरच होईजे, भगवत् प्राप्ती ॥
॥ होता होतां, ज्ञान दीप्ती ॥ तेणें मोक्ष, सहजच कीं ॥ ३३ ॥
॥ नित्य करावा, ऐसा नेम ॥ पडो न द्यावा, संसार भ्रम ॥
॥ धरावा, आत्मानंदीं, क्रम ॥ ब्रह्मपदीं, पोंचावया ॥ ३४ ॥
॥ ग्रंथ असे हा, परमामृत ॥ परमार्थाचें, सत्य कथित ॥
॥ सावधानें, ठेवी चित्त ॥ कैवल्य मुक्ती, मिळवावया ॥ ३५ ॥

॥ इति श्री परमामृतें मुकुंदराजविरचिते साक्षात्कार निरूपण नाम चतुर्दश प्रकरणं संपूर्णम् ॥ श्रीब्रह्मार्पणमस्तु ॥

मुकुंदराजांच्या ओंव्या २५ त्यांत शिष्यानें समस्या पूर्ण केल्या ९ त्या शिवायही फेरफार थोडासा केला. } शिष्याच्या सबंध ओंव्या १० त्या २।७।८।११।१२।१३।१४।२७।३

**सूचना.**

( १ ) ध्यान योग सरासरी सांगता येतो परंतु समाधी योग लिहून पूर्तता होत नाहीं. गुरुद्वारेंच साध्य होतो.

( २ ) ऐकाग्रता साधणें हें पहिलें महत् विकट कर्म आहे.

( ३ ) मनाला मूर्ती सभोंवते फिरते राखून त्याचें स्थैर्य करावें.

( ४ ) मन हें आरशाच्या कवडशासारखें उड्डाणें करणारें आहे.

( ५ ) यासाठीं तें सांचीव पाण्याच्या कवडशाप्रमाणें स्थिरावलें पाहिजे.

---



## ॥ प्रकरण १५ ॥

॥ श्री परब्रह्म परमेश्वरास आरती. ॥

॥ पालोपद ॥

यदेव, जयजगन्निवासा, अज्ञानातें दवडुनि सज्ञानी व्हावे
दे दासा ॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें १ ॥

मुच्या देहीं, साक्षी ब्रह्मात्मा, नेणिव बुद्धी नेणो, ऐसा
॥ माया भ्रांती घेऊनि झाला जीवात्मा, मीमी ह्मणऊ-
बुडवी गुप्तात्मा ॥ जयदेव जयदेव०॥

॥ कडवें २ ॥

सृष्टी, उदयातें आली तेणें भ्रम झाला हा, सर्वांअंतरीं ॥
ी तिजला, विलयाते लावीं, निर्भ्रम होतां ब्रह्म, झळके
जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ३ ॥

वलब्रह्मा, ज्ञाने समदृष्टी होतां गुप्तात्मातें अंतरि तो प्रग-
ाही त्याची, निश्चलता वृत्ती, स्वानंदाते भोगुनि, पावे
॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ४ ॥

जेव्हां, अनुकंपा केली, स्वयमेवे आवस्था, जागृत तीं
मीच स्वयें ब्रह्म, ऐशी वृत्ती ठेली, तेव्हां द्वैतबुद्धि, सहज-
॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ५ ॥

नुरले, जणु कांहीं नाहीं, झालों रूपीं एक ऐसा लवलाही ॥
ा जाणा, नुरलेची कांहीं, ब्रह्मीं रत होऊनिया, माझा
॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ६ ॥

नें करूनी, अनुभविता होईल, साक्षात्कारे प्रेमही, संपादुनि
केद्वारा माझी, पाउल हें ठेवीं, ॥ सद्गुरुनाथा पायीं, शरणा-
जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ७ ॥

॥ अज्ञानानें वेडे, मानव हे जहाले, साधूसंत ऐसें, द्
योगें कोणी, जागे जरि झाले, पुनरपि भ्रांती यो
के ॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ८ ॥

॥ माया भ्रांती पासुनि, सुटका विश्वाला, नसतां
ताची घाला, ॥ ब्रह्मीं रत होऊनिया, सोडूं कर्मा
ध्दारें, पावूं मानाला ॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें ९ ॥

॥ ब्रह्मीं रत झाले ते, ब्रह्मची होती, त्यांना नलगे
मुक्ती, ॥ संते ज्ञानें केली प्रीतीनें भक्ति ॥ ऐका सा
ची ही युक्ती ॥ जयदेव जयदेव० ॥

॥ कडवें १० ॥

॥ गणपत नामें कडूनी, देहीं हा आला, वावानामें की
पाला ॥ अडनांवानें माटे मिरवी देहाला, तारी सत
घाला ॥ जयदेव जयदेव० ॥

---

आरतीच्या ओंव्या २२ धरल्या व एकंदर ओंव्यांत

---

॥ ॐ श्री परब्रह्म परमेश्वरार्पणमस्तु ॥ ॐ तत्सत् ब्रह्म

---

॥ यदक्षर पदभ्रष्टं मात्राहीनं च यत् भवेत् ॥
॥ तत्सर्वं क्षम्यतां देव प्रसीद परमेश्वर ॥ १ ॥

---

॥ श्री मुकुंदरायजीस क्षमा भाकून आभार प्रदर्श
॥ केला तुह्मीं ग्रंथ, दयार्द्रबुध्या ॥ स्पष्टार्थ केला तैसाचि
॥ आभार मानून, विनवीत सध्या ॥ क्षमा करावी परमा

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३४ | २२ | अपि | अप |
| ४३ | २३ | २० | ४५ |
| ४४ | ३२ | जते | जाते |

समाप्त.

| पान | ओळ |
|---|---|
| ४५ | २२ |
| ४७ | १२ |